पूनम इलेक्ट्रॉनिक्स & फर्निचर
Only for स्वरत 2000/-
फ्रीज, इनवर्टर, मिक्सर, ओवन, टीव्ही, फ्रीज, वॉशिंग मशिन, अल्मारी, सोफा, बेड
COMPANY DEALER SAMSUNG Philips Panasonic
ALSO AVAILABLE LG Haier INTEX realme
मोती नगर, अमरावती. 0721-2540397 | 99216-02388

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
✦ अमरावती, बुधवार ९ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

couch puffy
THE BIG MONSOON SALE
FLAT 50% OFF
ON DISPLAY / LAST PIECE
BUY 1 GET 1 FREE On Home Decor
B5, ब्रिज्लैंड, खापर्डे नगर, अमरावती | 99300-94691 8585-9552-85

भारताचा फिनटेक प्रवास आर्थिक क्रांतीचा मोठा आधारस्तंभ

'ग्लोबल फिनटेक फेस्टिव्हल 2026' मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींचे प्रतिपादन

मुंबई/प्रतिनिधी : भारताचा फिनटेक क्षेत्रातील प्रवास हा वित्तीय सर्वसमावेशकता आणि तंत्रज्ञानातील परिवर्तनाचा प्रमुख चालक ठरला आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. मुंबईत आयोजित 'ग्लोबल फिनटेक फेस्टिव्हल २०२६' चे उद्घाटन करताना ते बोलत होते. नवोन्मेष, तरुणांचा सहभाग आणि जोखीम पत्करण्याची वृत्ती यांमुळे विस्तारत असलेली भारताची फिनटेक परिसंस्था देशाला 'विकसित भारत' बनवण्याच्या संकल्पाला अधिक बळ देत असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. जागतिक पातळीवर सुरू असलेले संघर्ष, व्यापारी तणाव आणि पुरवठा साखळीवरील दबावाचा उल्लेख करताना पंतप्रधान म्हणाले की, अशा अनिश्चिततेच्या काळातही भारताने चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल-जून तिमाहीत ७.८ टक्के विकासदर नोंदवून आपली ताकद दाखवून दिली आहे. याशिवाय, एका जपानी क्रेडिट रेटिंग एजन्सीने तीन दशकांनंतर भारताचे सार्वभौम मानांकन 'A-' श्रेणीत सुधारणे, हे देशाच्या आर्थिक धोरणांचे आणि स्थैर्याचे मोठे यश असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

UPI मुळे देशात डिजिटल क्रांती; जागतिक मानके उभारण्याचे आवाहन

भारताच्या फिनटेक यशाच्या केंद्रस्थानी युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस असल्याचे सांगत पंतप्रधान म्हणाले की, गेल्या २५ ऑगस्ट रोजी UPI च्या प्रवासाला १० वर्षे पूर्ण झाली आहेत. केवळ ऑगस्ट महिन्यातच UPI द्वारे २४ अब्जांपेक्षा अधिक व्यवहार झाले आहेत. UPI हा केवळ तांत्रिक बदल नसून एक सभ्यताविषयक परिवर्तन आहे, या फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रान यांच्या वक्तव्याचा त्यांनी दाखला दिला. सध्या ११ देशांमध्ये कार्यरत असलेल्या छ्रक्ष्ला आता जगभरातील देशांतर्गत पेमेंट नेटवर्कशी जोडून आंतरराष्ट्रीय व्यवहारांचा खर्च कमी करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच परदेशी मानकांवर अवलंबून न राहता भारतीय फिनटेक उद्योगाने स्वताची जागतिक मानके आणि प्रोटोकाल विकसित करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

'केवळ पेमेंट्सपुरते मर्यादित न राहता सर्वसमावेशकतेवर भर द्या'

फिनटेक क्षेत्राला केवळ डिजिटल व्यवहारांपुरते मर्यादित न राहता कर्ज, विमा, बचत, गुंतवणूक आणि निवृत्तीवेतन (पेन्शन) उत्पादनांच्या विस्तारावर भर देण्याचा सल्ला पंतप्रधानांनी दिला. 'पीएम स्वनिधी' योजनेची मुदत २०३० पर्यंत वाढवण्यात आली असून, यामुळे लाखो पथविक्रेते औपचारिक बँकिंग व्यवस्थेशी जोडले गेले आहेत व त्यांच्या उत्पन्नात २० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. याच धर्तीवर डिलिव्हरी पार्टनर्स आणि गिग वर्कर्स यांसारख्या असंघटित कामगारांसाठी विमा आणि पेन्शनच्या सुविधा क्यूआर कोड स्कॅन करून पैसे देण्याइतक्याच सुलभ कराव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

भविष्यातील तंत्रज्ञान आणि चार सूत्री अजेंडा- आगामी काळात एर्जेटिक एआय, टोकनायझेशन आणि क्वांटम काम्प्युटिंग ही तंत्रज्ञाने आर्थिक क्षेत्रात क्रांती घडवतील, असे सांगताना तंत्रज्ञानाचा वापर सर्वसामान्यांच्या हितासाठी झाला पाहिजे यावर त्यांनी भर दिला. यासाठी पंतप्रधानांनी फिनटेक क्षेत्रासमोर चार सूत्री अजेंडा मांडला. जागतिक दर्जाची सायबरसुरक्षा, डेटा संरक्षणाची नैतिक मानके, नियामक आणि उद्योग यांच्यातील मजबूत सहकार्य, फिनटेक ग्राहक संरक्षण निर्देशांक तयार करणे, असे ते म्हणाले. विश्वास, सुरक्षितता आणि मोठ्या प्रमाणावर सेवा देण्याची क्षमता या तत्त्वांवर पुढे जात भारतीय फिनटेक क्षेत्राने जागतिक संधींचे प्रवेशद्वार बनावे, असे आवाहन करत पंतप्रधानांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.

मोदींचा जेन-झीशी संवाद, धुरंधरच्या गाण्यावर एन्ट्री

वडोदरा/वृत्तसंस्था : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वडोदरा येथे जेन-झीशी २५ मिनिटे संवाद साधला. या कार्यक्रमासाठी सहा हजार तरुणांना आमंत्रित करण्यात आले होते. मोदींनी तरुणांना खोटे दावे आणि दिशाभूल करणा-या प्रचारापासून दूर राहण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, 'लोक 'झूट की गूंज'द्वारे तुमची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतील, पण तुम्ही सत्याच्या बाजूने ठामपणे उभे राहिले पाहिजे.' मोदींचे हे विधान राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाच्या 'छात्रों की गूंज' (विद्यार्थ्यांचा प्रतिध्वनी) या मोहिमेवर केलेली टीका मानले जात आहे. पंतप्रधानांच्या कार्यक्रमासाठी खास Y आकाराचा रॅम्प बांधण्यात आला होता. भाषणापूर्वी पंतप्रधान रॅम्पवर चालत तरुणांमध्ये पोहोचले. स्टेजवर पोहोचताच राणीचे प्रसिद्ध गाणे 'वी विल राक यू' वाजले. यानंतर धुरंधर मधलं आरी आरी हे गाणंही वाजलं. जंतरमंतर आंदोलनानंतर भाजपचे संपूर्ण लक्ष जेन-झी मतदारांवर आहे. वास्तविक, पुढील वर्षी ७ राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत. यापैकी २२.७८% मतदार जेन-झी आहेत. यूपीमध्ये सर्वाधिक २.८ कोटी जनरल-जी मतदार आहेत. त्यामुळे सर्वच पक्ष त्यांना मदत करण्यात व्यस्त आहेत.

दहीहंडीत बायका नाचवणारे देशद्रोही; संभाजी भिडे

छ. संभाजीनगर / प्रतिनिधी- राज्यात डीजेबंदीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. पुण्यात प्रथम डीजेबंदीची मागणी केल्यानंतर आता राज्यातील विविध जिल्ह्यांत मागणीचा सूर पसरू लागला आहे. काही दिवसांपूर्वी नागपुरात डीजेबंदीचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर आता इतरही जिल्ह्यांत मागणी केली जात आहे. त्यात दहीहंडी उत्सवात काही आयोजकांच्या स्टेजवर डान्सर नाचल्या होत्या. त्यावरून जोरदार टीका होत आहे. यावरून आता शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक अध्यक्ष संभाजी भिडे यांनीही जोरदार हल्लाबोल केला आहे. संभाजी भिंडे यांनी टाकळीतून माध्यमांशी संवाद साधला. संभाजी भिडे म्हणाले, डीजे आणि डॉल्बी फेकून दिले पाहिजे. त्याचा काय फायदा, त्यातून देशाला काय मिळते. काही गोष्टी टाळल्या पाहिजेत, त्यात डॉल्बी आहे. सणामध्ये अश्लील डान्स करणारे, बायका नाचवणे, असले प्रकार करणारे मूर्ख आहेत. देशद्रोही आहेत. हिंदू सणांमध्ये डॉल्बी वाजले नाही पाहिजेत, डॉल्बी फेकून दिले पाहिजेत. दहीहंडी सणांमध्ये बायका नाचवणारे देशद्रोही आहेत. त्यांनी चुकीचे काम केले आहे. संभाजी भिडे यांनीही आता डीजेबंदी विरोधात भूमिका घेतली आहे.

पंतप्रधान मोदींच्या सुरक्षेत चूक

मुंबई : येथील वांद्रे-कुर्ला संकुल येथील नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटर परिसरात एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक घटना समोर आली असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा कार्यक्रम ज्या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता, त्याच कार्यक्रमाच्या आवारातून मुंबई पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. यातील एका संशयिताकडे बंदूक मिळून आल्याने आणि तो स्वतःला थेट पंतप्रधान कार्यालयाचा (पीएमओ) वरिष्ठ अधिकारी सांगत असल्याने सुरक्षा यंत्रणांचे धाबे दणाणले आहेत.मुंबई पोलिसांनी एनएमएसीसी सेंटरमधून रोहन पारेख नावाच्या २४ वर्षीय युवकाला ताब्यात घेतले आहे. रोहन पारेख हा एनएमएसीसी परिसरात अत्यंत रु बाबात वावरत होता आणि स्वतःला पीएमओ कार्यालयाचा अधिकारी असल्याचे सांगत होता. मात्र, कार्यक्रमाच्या सुरक्षेवर तैनात असलेल्या विशेष सुरक्षा रक्षकांनी आणि पोलिसांनी जेव्हा त्याच्या संशयास्पद हालचाली पाहून तपासणी केली, तेव्हा त्याने दाखवलेले पंतप्रधान कार्यालयाचे ओळखपत्र पूर्णपणे बनावट असल्याचे उघडकीस आले. सुरक्षा यंत्रणांना सर्वात मोठा धक्का तेव्हा बसला जेव्हा त्यांना समजले की, २४ वर्षांचा रोहन पारेख हा एकटा नाही तर स्वतःसोबत एका खासगी बाडीगार्डला घेउन फिरत होता. त्याच्यासोबत असलेल्या या बाडीगार्डकडे एक बंदूक देखील मिळून आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या व्हीव्हीआयपी सुरक्षा आणि एसपीजी प्रोटोकालच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारे बंदुकधारी व्यक्ती आणि बनावट अधिकारी थेट कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचल्याने सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रुग्णाला २० ते २२ वेळा सुया टोचल्या?

नागपूर/प्रतिनिधी : पोटदुखीमुळे मध्यरात्री रुग्णालयात आणलेल्या महिलेला २० ते २२ वेळा सुया टोचण्यात आल्या आणि ऊचार करणारे कर्मचारी मद्यप्राशन करून होते, असा आरोप करणारा व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाला. या व्हिडीओनंतर लता मंगेशकर रुग्णालयाने चौकशी केली. महिलेला दोनच इंजेक्शन देण्यात आली आणि कर्मचारी मद्यप्राशन करून असल्याचा आरोप चुकीचा आहे, असा दावा रुग्णालय प्रशासनाने केला आहे. नेमक्या त्या रात्री काय घडले? याबाबत आपण जाणून घेउ या. घटना कधी आणि कुठे घडली? ही घटना ६ सप्टेंबर २०२६ रोजी मध्यरात्रीनंतर नागपूरच्या हिंगणा मार्गावरील लता मंगेशकर रुग्णालयाच्या आकस्मिक ऊचार विभागात घडली. इसासनी परिसरातील एका महिलेला पोटदुखीचा त्रास होत असल्याने तिच्या नातेवाईकांनी तपासणीसाठी रुग्णालयात आणले होते. नातेवाईकांनी नेमका काय आरोप केला? महिलेला इंजेक्शन देण्यासाठी २० ते २२ वेळा सुया टोचण्यात आल्या आणि तेथील कर्मचारी मद्यप्राशन करून कर्तव्य बजावत होते, असा आरोप नातेवाईकांनी केला.

गणेशभक्तांसाठी टोलमाफी

मुंबई - गणेशोत्सवासाठी कोकणात जाणा-या गणेशभक्तांना यावर्षीही टोलमाफीची भेट शासनाने दिली आहे. गणेशोत्सवाच्या कालावधीत कोकणाकडे जाणा-या गणेशभक्तांच्या वाहनांना टोल सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. ११ सप्टेंबर २०२६ ते २७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मुंबई-बंगळूरु राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील कोकणाकडे जाणा-या संबंधित मार्गांवरील पथकर नाक्यांवर ही टोलमाफी लागू राहणार आहे. याशिवाय नगरविकास विभागाच्या अखत्यारीतील अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूमार्गे कोकणात जाणा-या गणेशभक्तांच्या वाहनांनाही पथकरमाफीचा लाभ मिळणार आहे. गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनातील अत्यंत महत्त्वाचा सण आहे. मुंबई, ठाणे, पुणे आणि राज्यातील इतर शहरांमध्ये वास्तव्यास असलेले हजारो कुटुंबीय गणेशोत्सवासाठी आपल्या मूळ गावी जात असतात. या काळात मुंबई-गोवा महामार्गासह कोकणाकडे जाणा-या प्रमुख मार्गांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढते. गणेशभक्तांचा हा प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि आनंददायी व्हावा तसेच त्यांना प्रवासादरम्यान अनावश्यक आर्थिक भार सहन करावा लागू नये यासाठी शासनाने टोलमाफीचा निर्णय घेतला आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोंसले यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबत ८ सप्टेंबर २०२६ रोजी शासन परिपत्रक जारी केले आहे.

दिल्लीचे माजी मुख्य सचिव राकेश मेहता यांची आत्महत्या

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : दिल्लीचे माजी मुख्य सचिव आणि १९७५ च्या बॅचचे ज्येष्ठ आयएएस अधिकारी राकेश मेहता यांनी रविवारी नोएडातील सेक्टर-८२ मधील 'केंद्रीय विहार-२' सोसायटीतील आपल्या राहत्या घरी गळफास घेउन कथितरीत्या आत्महत्या केली. रविवारी दुपारच्या सुमारास त्यांचा मृतदेह आढळून आला. त्यांच्या निधनाने प्रशासकीय वर्तुळात मोठी हळहळ व्यक्त होत असून, सोमवारी लोधी स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. राकेश मेहता हे २००७ ते २०१० या काळात दिल्लीचे मुख्य सचिव म्हणून कार्यरत होते. २०१० मध्ये दिल्लीत पार पडलेल्या ऐतिहासिक राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेदरम्यान संपूर्ण दिल्ली प्रशासनाची धुरा आणि यशस्वी आयोजनात त्यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका होती. १९७५ च्या बॅचचे आयएएस अधिकारी असलेल्या मेहता यांनी तीन दशकांपेक्षा जास्त काळ दिल्ली सरकार आणि दिल्ली महानगरपालिकेत विविध ऊच्च पदांवर काम केले. २००७ मध्ये त्यांनी मुख्य सचिवपदाची सूत्रे हाती घेतली आणि नोव्हेंबर २०१० मध्ये ते या पदावरून निवृत्त झाले. त्यांच्या सहका-यांनी आणि राजकीय नेत्यांनी त्यांना नव्या कल्पना आणि धाडसी प्रशासकीय सुधारणा तत्परतेने राबवणारे एक कुशल प्रशासक म्हणून आठवण काढली आहे. दिल्लीच्या पायाभूत सुविधा आणि प्रशासकीय बदलांमध्ये त्यांचे योगदान मोलाचे राहिले.

'जेन झी'चा नाशिक ते मुंबई 'लाँग मार्च'

नाशिक : आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांनी राजीनामा द्यावा, प्रधान सचिव, आदिवासी आयुक्त हटाव या मागणीसाठी आदिवासी विद्यार्थी जेन झी मुंबईला धडकणार हे निश्चित झाले असून, नाशिक ते मुंबई असा लाँग मार्च (पायी मोर्चा) असणार आहे. दि. १६ ते २० म्हणजे गणेशोत्सव काळात हा मोर्चा मुंबईला जाणार आहे. मोर्चाची राज्यभर व्यापती वाढवण्यासाठी आंदोलक जिल्हानिहाय बैठका घेउन गावागावांत, वसतिगृह, आश्रमशाळांवर जाउन जनजागृती करणार आहेत. सकल आदिवासी विद्यार्थी आंदोलन कृति समितीची महत्त्वाची बैठक नाशिक येथे झाली. बैठकीस विद्यार्थी, विद्यार्थी प्रतिनिधी, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी तसेच विविध सामाजिक कार्यकर्ते ऊपस्थित होते. बैठकीत आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यात आली. आंदोलनाची धग कायम ठ्रावी यासाठी लवकरात लवकर मोर्चा काढण्यात यावा, अशी मागणी झाली. त्यावर १६ ते २० सप्टेंबर याच कालावधीतील तारीख निश्चित केली जाईल, ही तारीख राज्यभरातील समन्वयकांची बैठक घेउन अंतिम केली जाणार आहे. नाशिक येथून हा मोर्चा मुंबईला निघेल.

ट्रक-पिकअपच्या धडकेत 6 ठार, 7 गंभीर

■ गोंदिया-बालाघाट मार्गावर भीषण अपघात ■

गोंदिया / प्रतिनिधी- गोंदिया-बालाघाट मार्गावरील नागरा-मोहरानटोली येथे ट्रक आणि पिकअप वाहनाची समोरासमोर धडक होउन भीषण अपघात झाला. या अपघातात पिकअपमधील सहा जणांचा जागीच मृत्यू, तर सात जण जखमी झाले आहेत. अपघातातील सर्वजण मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील रहिवासी आहेत. मजुरीच्या कामानिमित्त हैदराबादकडे निघालेल्या मजुरांच्या पिकअप वाहनाला नागरा-मोहरानटोली परिसरात पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाला. गोंदिया-बालाघाट मार्गावर भरधाव ट्रक आणि पिकअप वाहनाची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की पिकअप वाहनाचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. या दुर्घटनेत सहा जणांचा जागीच मृत्यू झाला, तर सात जण गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातातील मृतांची नावे अद्याप कळू शकली नाहीत, कारण सर्व वेगवेगळ्या ठिकाणचे रहिवासी असल्यामुळे एकमेकांना अनोळखी होते.मृतांना गोंदिया जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यात आले आहे. गोंदिया ग्रामीण पोलिसांकडून त्यांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. ऊचार घेत असलेल्या जखमींपैकी कोणी त्यांना ओळखत असल्यास त्यांची नावे कळू शकतात. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि गोंदिया ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. वाहनात अडकलेल्या जखमींना बाहेर काढून तातडीने ऊचारासाठी गोंदिया येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. जखमींपैकी काहींची प्रकृती गंभीर आहे. दरम्यान, हे सर्वजण मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील असून रोजगाराच्या कामासाठी हैदराबादकडे जात असल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघाताची नोंद गोंदिया ग्रामीण पोलिसांनी केली असून पुढील तपास सुरू आहे.

बेकायदा औषधे-सौंदर्यप्रसाधने विक्रीला 'एफडीए'चा दणका

पुणे : औषधांची गुणवत्ता, सुरक्षितता आणि नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) औषध विभागाने कारवाईला वेग दिला आहे. जून ते ऑगस्ट दरम्यान राज्यातील औषध ऊत्पादन आणि विक्री आस्थापनांच्या तब्बल २ हजार ९०२ तपासण्या करण्यात आल्या. नियमांचे उल्लंघन करणा-या ८८० परवानाधारक आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. तसेच १०४ शोध व जप्तीच्या कारवायांमध्ये ११ कोटी ४१ लाख रु पयांचा बेकायदा औषधे आणि सौंदर्यप्रसाधनांचा साठा जप्त करण्यात आला.या कालावधीत औषध ऊत्पादन आस्थापनांच्या ६०७, तर विक्री आस्थापनांच्या २ हजार २९५ तपासण्या करण्यात आल्या. ऊत्पादन क्षेत्रातील १४० आणि विक्री क्षेत्रातील ७४०, अशा एकूण ८८० आस्थापनांवर नियामक कारवाई झाली. यामध्ये ६७७ परवाने निलंबित, तर २०३ परवाने रद्द करण्यात आले.औषध ऊत्पादन आस्थापनांच्या तपासणीत सक्षम तांत्रिक कर्मचा-यांचा अभाव, मंजूर नसलेल्या कर्मचा-यांकडून बॅच मॅन्युफॅक्चरिंग रेकर्ड्समध्ये नोंदी करणे, गुणवत्ता नियंत्रण विभागात सक्षम तांत्रिक व्यक्तीच्या अनुपस्थितीत चाचण्या घेणेचा समावेश आहे.

अपात्र शिक्षकांच्या नियुक्तीवर 'सर्वोच्च' बंदी

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : शिक्षक भरतीबाबात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा अंतरिम आदेश दिला असून राइट टू एज्युकेशन (आरटीई), नॅशनल कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन (एनसीटीई) आणि युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशन (यूजीसी) कायद्यांतर्गत निर्धारित पात्रता नसलेल्या व्यक्तींना शाळा किंवा महाविद्यालयांमध्ये शिक्षक म्हणून नियुक्तकरण्यास किंवा कामावर ठेवण्यास सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम स्वरूपात बंदी घातली आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठाने राजेश चौहान यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर केंद्र सरकार, राज्य सरकारे आणि यूजीसी यांना नोटीस बजावत हा आदेश दिला. या जनहित याचिकेत खासगी किंवा तात्पुरत्या स्वरूपाच्या शिक्षण संस्थांमधील शिक्षक व कर्मचा-यांना निष्पक्ष, पारदर्शक आणि स्पर्धात्मक भरती प्रक्रिया न राबवता थेट सरकारी सेवेत सामावून घेण्याची परवानगी देणारी कोणतीही कायदेशीर योजना असंवैधानिक घोषित करण्याची मागणी करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे एनसीटीई किंवा यूजीसी कायद्यांतर्गत आवश्यक पात्रता नसलेल्या शिक्षकांच्या नोकरीवर संकट निर्माण झाले आहे. आरटीई कायद्याच्या कलम २३ अंतर्गत एनसीटीईकडून शिक्षकांसाठी किमान पात्रता निश्चित केली जाते.

शैक्षणिक पात्रता अनिवार्य

इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत शिकवण्यासाठी डी.एल.एड./बी.एड.सह शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) ऊत्तीर्ण असणे आवश्यक आहे. एनसीटीईच्या निकषांनुसार इयत्ता पहिली ते पाचवीसाठी बारावीमध्ये किमान ५० टक्के गुणांसह डी.एल.एड./बी.एल.एड. आणि टीईटी, तर सहावी ते दहावीसाठी पदवी, बी.एड. आणि टीईटी आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. इयत्ता अकरावी आणि बारावीसाठी पदव्युत्तर पदवी आणि बी.एड. आवश्यक असल्याचे या मजकुरात म्हटले आहे.

शिकवणी संबधीत विषयांत किमान ५५ टक्के गुण अनिवार्य

महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील शिक्षकांच्या पात्रतेचे निकष यूजीसीकडून निश्चित केले जातात. यूजीसी कायद्यानुसार असिस्टंट प्रोफेसर पदासाठी संबंधित विषयात किमान ५५ टक्के गुणांसह पदव्युत्तर पदवी आणि यूजीसी-नेट किंवा एसएलसीटी/एसईटी परीक्षा ऊत्तीर्ण असणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

पीएच.डी धारकांना नियमांत सूट

पीएच.डी. धारकांना एनईटीमधून सूट मिळते. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने पात्रता नसलेल्या शिक्षकांना नियुक्ती किंवा सेवेत ठेवण्यास अंतरिम बंदी घातल्याने अशा शिक्षकांच्या नोकरीबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे.

सणांचे पावित्र्य राखा, गोंगाट नको

डीजे बंदीच्या मागणीवरून ठाकरेंचा सरकारला सल्ला

मुंबई /प्रतिनिधी- सणांचे पावित्र्य राखले पाहिजे. सणांमध्ये गोंगाट असणे गरजेचे नाही. स्वातंत्र्य चळवळीत अधिकाधिक जनतेने सहभागी व्हावे म्हणून लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. या चळवळीचे रु पांतर ऊत्सवात झाले. मात्र आता या ऊत्सवाचे रू पांतर गोंगाटात होता कामा नये. नुसता दणदणाट करणे त्यापेक्षा झांज, मंदिरातील घंटेचा आवाज बरा वाटतो. जनतेच्या आनंदासाठी ऊत्सव असावेत, त्रासासाठी नव्हे असे सांगत माजी मुख्यमंत्री ऊद्धव ठाकरे यांनी डीजे बंदीच्या मागणीवर प्रतिक्रिया दिली.मातोश्रीत झालेल्या पत्रकार परिषदेत ऊद्धव ठाकरे म्हणाले की, डीजे बंदीवर सर्व पोलिस आयुक्तांची बैठक घेउन त्यांच्यात एकवाक्यता करावी. सरकार चर्चा का करत नाही? कोण बरोबर हे चर्चेतून ठरवा. लोकांना ऊत्सव हवेत पण त्यातून होणारा जाच नको. मुद्दे ऊपस्थित करणा-या संतोष पंडित यांना रात्री १-१.३० वाजता अटक केली जाते. दहिहंडीच्या सणात महिलांना नाचवले जाते हे नव हिंदुत्ववादी आहेत त्यांना चालते का? असा टोला त्यांनी नाव न घेता भाजपाला लगावला.

तसेच प्रत्येक ठिकाणी डेसिबल मोजले जाते. कायदे अंमलबजावणी करायला हवी. सरकारने गणेशोत्सव मंडळांसोबत चर्चा करायला हवी. मी मुख्यमंत्री असताना गणेशोत्सव मंडळांशी संवाद साधायचो. त्यांच्याशी तुम्ही चर्चा केली तर वादग्रस्त गोष्टी टोकापर्यंत ताणल्या जात नाहीत. प्रत्येकाचे घर समाजातच आहे. एवढ्या स्पीकरची गरज काय? त्यातून होणारा त्रास याबाबत चर्चा करा असा सल्ला ऊद्धव ठाकरे यांनी सरकारला दिला. दरम्यान, एमपीएससी आंदोलनाला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. आज पेपर फुटताहेत, आमदार फुटतात. ते सुरत, गुवाहाटीला जातात पण पेपर फुटल्यावर आम्ही कुठे जायचे असा प्रश्न आंदोलनात विद्यार्थी ऊपस्थित करत आहेत. हा प्रश्न हसण्यावर सोडण्यासारखा नाही.

शिंदेसेनेवरही प्रहार- आमच्याकडे निवडणूक आयोग घटना आहे की नाही हे तपासते, पण जे ६ राजकीय पक्ष बोगस निघाले. अहमदाबादच्या नरोडा भागात या पक्षांचे ऑफिस आहेत, त्यांना कोट्यवधीची देणगी मिळते. या देणगीत निवडणूक आयोग भागीदार आहे का? सगळीकडे अंदाधुंद कारभार सुरू आहे. तारीख पे तारीख दिली जाते. मागील ४ वर्षांत अनेक महत्त्वाच्या निवडणुका झाल्या. आमचा पक्ष, नाव आणि चिन्ह हे चोरासकट पकडले गेले पण निकाल लागेपर्यंत चोरीचा माल त्यांना वापरू देउ नका ही आमची मागणी आहे.

जरांगे पाटलांची तब्येत खालावली

जालना / प्रतिनिधी- मराठा आरक्षणाबाबत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे गेल्या १० दिवसांपासून ऊपोषणाला बसले आहेत. अशामध्ये मंगळवारी (८ सप्टेंबर) ऊपोषणाच्या अकराव्या दिवशी त्यांची तब्येत जास्तच खालावल्याची माहिती समोर आली. सततच्या ऊपोषणांमुळे त्यांचे वजन हे तब्बल ७ किलोंनी घातले आहे. तसेच, त्यांची शुगर लेव्हल आणि रक्तदाबदेखील कमी झाला आहे. अशामध्ये, त्यांच्या तब्येतीची बातमी कळताच सरकारकडील काही नेत्यांनी त्यांना ७ सप्टेंबर रोजी मध्यरात्री फोन केल्याची माहितीही समोर आली आहे.८ सप्टेंबर रोजी पहाटे मनोज जरांगे पाटलांची तब्येत अचानक खालावल्याचे समोर आले. त्यांचे वजन कमी झाले असून शुगर आणि बीपी देखील कमी झाला. जालना येथील सिव्हिल सर्जन यांनी सोमवारी (७ सप्टेंबर) मध्यरात्री २.३० वाजता तपासणी केली. तसेच त्यांना वारंवार चक्कर येत असल्याचेही तपासानंतर समोर आले आहे. अशामध्ये, सोमवारी दुपारी त्यांनी पत्रकार परिषद घेतली होती.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

डिव्हायडरवर आदळून कार पलटी

राजापेठ ते इर्विन चौक मार्गावरील घटना

अमरावती/प्रतिनिधी:- राजापेठहून इर्विन चौकाच्या दिशेने जाणाऱ्या उड्डाणपुलावर मंगळवारी रात्री पुन्हा एकदा अपघाताची घटना घडली. भरधाव कार डिव्हायडरवर आदळून पलटी झाली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. एमएच २७ एसी ७१०४ क्रमांकाची कार राजापेठकडून इर्विन चौकाच्या दिशेने जात असताना उड्डाणपुलावरील डिव्हायडरवर आदळली. धडक इतकी जोरदार होती की कार पलटी झाली. अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पलटी झालेली कार उड्डाणपुलावरून हटविण्यासाठी क्रेन मागविण्यात आली. त्यानंतर कार बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. विशेष म्हणजे, याच ठिकाणी यापूर्वीही तीन वेळा अशाच स्वरूपाचे अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे हा चौथा अपघात असल्याने उड्डाणपुलाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

या उड्डाणपुलावर वाहनचालकांना इशारा देण्यासाठी पुरेसे दिशादर्शक किंवा चेतावणी फलक नसल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. डिव्हायडरवर आवश्यक त्या प्रमाणात रेडियम मार्किंग नसणे, रात्रीच्या वेळी पुरेशा प्रकाशव्यवस्थेचा अभाव तसेच अन्य सुरक्षाविषयक उपाययोजनांची कमतरता असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात येत आहे. वारंवार अपघात होत असतानाही संबंधित प्रशासनाकडून प्रभावी उपाययोजना केल्या जात नसल्याची नाराजी नागरिक व्यक्त करीत आहेत. मोठी जीवितहानी होण्यापूर्वीच प्रशासनाने या उड्डाणपुलावरील सुरक्षेच्या त्रुटी दूर करून आवश्यक चेतावणी फलक, रेडियम मार्किंग, प्रकाशव्यवस्था आणि इतर सुरक्षा उपाय तातडीने करावेत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. एकाच ठिकाणी वारंवार अपघात होऊनही प्रशासन कधी जागे होणार? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

१० वरिल उर्वरित

त्या वाघीणचा कार्डिओ रेस्पिरेटरी

परतवाडा येथील केंद्रात मृत वाघिणीचे शवविच्छेदन केले. शवविच्छेदन अहवालानुसार, प्रथमदर्शनी वाघिणीच्या मृत्यूचे कारण 'कार्डिओ रेस्पिरेटरी फेल्युअर' असल्याचे समोर आले आहे. वाघिणीला बेशुद्ध करण्या साठी मारण्यात आलेला डार्ट आणि औषधाच्या तीव्रतेबाबत चर्चा व तर्कवितर्क लावले जात आहेत. या पार्श्वभूमीवर वन विभागाने स्पष्ट केले आहे की, मृत्यूचे नेमके व अचूक कारण स्पष्ट व्हावे, यासाठी वाघिणीच्या अवयवांचे नमुने 'हिस्टोपॅथॉलॉजी' आणि 'टॉक्सिकॉलॉजी' चाचणी साठी न्यायवैद्यक प्रयोग शाळेकडे पाठविण्यात येत आहेत. या प्रयोगशाळेचा अंतिम अहवाल आल्यानंतरच वाघिणीच्या मृत्यूचे मूळ कारण स्पष्ट होईल, असे उपवनसंरक्षक अर्जुना के.आर. यांनी सांगितले आहे.

गोपीनाथ रेड्डी कंपनीला मनपाचा

लक्ष लागले आहे. महापालिकेने घर -घर कचरा संकलन आणि कचरा परिवहन साठी जुलै- ऑक्टोबर २०२४ मध्ये निविदा काढली होती. या प्रक्रियेत पी. गोपीनाथ रेड्डी कंपनी आणि कोणार्क कंपनी या दोन्ही प्रमुख स्पर्धक म्हणून सहभागी झाल्या होत्या. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्या नंतर महापालिकेने कोणार्क कंपनीला ठेका देण्याचा निर्णय घेतला आणि २८ नोव्हेंबर २०२४ रोजी त्यांच्याशी करार केला. या निर्णयाविरोधात पी. गोपीनाथ रेड्डी कंपनीने पात्रता आणि निविदा प्रक्रियेत मुद्दे उपस्थित करत नागपूर खंडपीठात रिट याचिका दाखल केली होती. यावर निर्णय देताना न्यायालयाने कोणार्क कंपनी सोबतचा करार रद्द केला

आहे आणि महापालिकेला पी. रेड्डी कंपनीच्या निविदा प्रस्तावावर नव्याने विचार करण्याचे आदेश दिले आहेत. कोर्टाचा आदेश प्राप्त झाल्याच्या तारखेपासून तीन आठवड्याच्या आत निर्णय घ्यावा लागणार आहे. कोर्टाने थेट रेड्डी कंपनीला ठेका देण्याचा आदेश दिलेला नाही. महापालिकेला पहिल्यांदा रेड्डी कंपनीच्या निविदेची पात्रता आणि सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी करावी लागेल. जर तपासणीत रेड्डी कंपनीची निविदा सर्व अटी-शर्ती पूर्ण करत असल्याचे आणि ठेका देण्यात कोणताही कायदेशीर अडथळा नसल्याचे आढळले, तर मनपाला त्यांनाच ठेका द्यावा लागेल.मात्र, काही कारणास्तव रेड्डी कंपनीला ठेका देणे शक्य न झाल्यास, संपूर्ण नवीन निविदा प्रक्रिया राबवावी लागेल. आता मनपाच्या निर्णयाकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

पिकांचे पंचनामे करा, अन्यथा

नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. काँग्रेसच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन जिल्ह्यातील विविध गंभीर प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. जिल्हा स्त्री रुग्णालयातील व्हेंटिलेटर दुर्घटनेत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर चौकशी समितीचा अहवाल सात दिवसांत सादर करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, पंधरा दिवस उलटूनही अहवाल जाहीर झालेला नसल्याने काँग्रेसने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दोषींना वाचविण्यासाठी अहवाल दडपला जात आहे का, असा सवालही करण्यात आला. संबंधित व्हेंटिलेटर कंपनीच्या उपकरणांची राज्यभर सुरक्षा तपासणी करावी आणि दोष आढळल्यास त्या कंपनीचा पुरवठा तातडीने बंद करावा, अशी मागणीही करण्यात आली. दरम्यान, पावसाचा खंड पडल्याने खरीप पिकांची स्थिती गंभीर झाली असून उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पिकांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करून तातडीने पंचनामे करावेत, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी आणि पीक विम्याचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी काँग्रेसने केली.

वाघिणीच्या हल्ल्यांवरून वन विभागाला धारेवर- जिल्ह्यात वाघिणीच्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात प्रशासन अपयशी ठरल्याचा आरोप काँग्रेसने केला. वाघिणीच्या हल्ल्यांप्रकरणी वन विभागाच्या कारभाराची स्वतंत्र चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली.

गुन्हेगारी रोखण्यात सरकार अपयशी- जिल्ह्यात दिवसाढवळ्या खून, अल्पवयीन मुलींवरील अत्याचार यांसारख्या गंभीर घटना घडत असल्याचा आरोप करीत काँग्रेसने वाढत्या गुन्हेगारीवरही सरकारला लक्ष्य केले. पोलिसांचा गुन्हेगारांवर वचक निर्माण करून कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. गृहखात्याची जबाबदारी असलेल्या मुख्यमंत्र्यांनी कायदा-सुव्यवस्था राखण्यात अपयश आल्यास नैतिक जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास जिल्हा काँग्रेसच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. आंदोलनात माजी मंत्री सुनीलभाऊ देशमुख, जिल्हा शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी आमदार वीरेंद्रभाऊ जगताप, माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, हरिभाऊ मोहोड, जयंत देशमुख, रामेश्वर अभ्यंकर, प्रदीप देशमुख, डॉ. रवींद्र वाघमारे, मुकद्दर पठाण, शैलेश गवई, पंकज देशमुख, गजानन देशमुख, कांचनमाला गावंडे, जयश्री वानखडे, श्रीकांत बोंडे, समाधान दहातोंडे, गिरधर राठोड, दीपक पडळकर, सेतू देशमुख, प्रणव गौरखेडे, राहुल येवले, वैभव देशमुख, विपुल भडांगे, भूषण कोकाटे, यशवंत मंगरोळे, वैभव वानखडे, राहुल गवई, प्रवीण मनोहर यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**शेतकरी, नागरिक आणि रुग्णांच्या सुरक्षेच्या प्रश्नांवर सरकारने तातडीने निर्णय घ्यावा.': जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख** 'जिल्ह्यात एकीकडे शेतकरी पावसाच्या खंडामुळे संकटात आहे, तर दुसरीकडे वाघिणीच्या हल्ल्यांमुळे नागरिक भयभीत आहेत. रुग्णालयातील दुर्घटनेचा अहवालही अद्याप समोर आलेला नाही. प्रशासनाने सर्व मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी. अन्यथा जिल्हा काँग्रेसच्या वतीने आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल.'

विभागीय आयुक्तालयावर रविकांत

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विदर्भात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची मदत करावी, शेतकऱ्यांना २४ तास वीज पुरवठा उपलब्ध करून द्यावा, शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळाली पाहिजे, निकृष्ट बियाणे पुरवणाऱ्या कंपन्यांच्या विरोधात कठोर कारवाई झाली पाहिजे,कृषी विभागाचे अधिकारी बियाणे कंपनी कडून हप्ते घेतात, त्यांच्यावरही कारवाई झाली पाहिजे, शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी झाली पाहिजे या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले. यानंतरही जर आमच्या मागण्या पूर्ण नाही झाल्या तर पुढील काळात या पेक्षा मोठे आंदोलन करण्याचा इशारा रविकांत तुपकर यांनी दिलेला आहे. हे सरकार इंग्रजांप्रमाणे वागत आहे, शेतकऱ्यांसाठी आवाज उठवल्याबद्दल आम्हाला तुरूंगात डांबले जाते. पण, येणाऱ्या काळात आम्ही शेतकऱ्यांसाठी मोठे आंदोलन उभारू. जातीच्या आंदोलनाच्या ठिकाणी तुम्हाला भेट द्यायला वेळ आहे पण शेतकऱ्यांकडे लक्ष द्यायला सरकारजवळ वेळ नाही, अशी टीका रविकांत तुपकर यांनी केली. शेतकऱ्यांसाठी संपूर्ण विदर्भात आता आंदोलन करू, त्याची सुरुवात आज अमरावती पासून होत आहे, हे आंदोलन राज्यभर होणार आहे. रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले.

७२ किलो गांजा सह तस्कराला

स्थानका वर उतरला होता. तो रेल्वे स्थानका बाहेर आल्यानंतर त्याच्या दोन महिला साथी दारांसह त्याला अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सच्या पथकाने रंगेहात पकडले. शहरात मोठ्या प्रमाणावर विक्रीकरिता आणला जाणारा हा अवैध गांजा बाजारात पोहोचण्यापूर्वीच जप्त करण्यात आल्याने तस्करांचे मोठे जाळे उद्ध्वस्त झाले आहे. आरोपीविरुद्ध बडनेरा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक खंडेराव रंजवे, अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, अमरावती हे करत आहेत. अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षक ज्योतोप्रिया सिंह, पोलीस उपमहानिरीक्षक प्रविणकुमार पाटील व पोलीस अधीक्षक अजित टिके, अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, नागपूर यांचे मार्गदर्शनखाली व पोलीस उप-अधीक्षक गजानन विखे यांचे देखरेखीखाली पोलीस निरीक्षक प्रदिप परदेशी, सह. पोलीस निरीक्षक समाधान मचाले, पूनम जगताप व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी यशस्वीरिते पार पाडली.

विलास नगरमध्ये मध्य

मृतदेह ताब्यात घेतला. ओळख पटवण्यासाठी प्रयत्न केले असता मृताची ओळख परमानंद रामजीप्रसाद उईके, (रा. रामजीपुरा, भैंसदेही, जि. बैतूल, मध्य प्रदेश) अशी झाली आहे. माहिती नुसार, परमानंद हा काही दिवसां पूर्वीच रोजगाराच्या शोधात अमरावतीत आला होता. तो विलास नगर परिसरातच वास्तव्यास होता. या प्रकरणी गाडगे नगर पोलिसांनी मर्ग दाखल केला असून आत्महत्येमागील नेमके कारण शोधण्यासाठी पुढील तपास सुरू केला आहे. पोलिसांकडून परिसरातील नागरिकांकडे आणि नातेवाईकांकडे चौकशी केली जात आहे.

वेतनवाढीच्या मागणीसाठी

प्रस्तावावर अद्याप कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. सेकंडरी कोर्टाच्या कर्मचाऱ्यांना हायकोर्टाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे पे- स्केल नुसार वेतनवृद्धी द्यावी, ही मुख्य मागणी आहे. सरकार कडून दखल घेतली जात नसल्याने आता टप्प्याटप्प्याने आंदोलन छेडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.बैठकीत स्पष्ट करण्यात आले की, जिल्ह्यातील न्यायालयीन कर्मचारी श्रेणी-२, महाराष्ट्र स्टेनोग्राफर असोसिएशन, बेलीफ कर्मचारी संघटना आणि चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेसह सर्व न्यायिक कर्मचारी या आंदोलनात सहभागी होतील.१६ सप्टेंबर रोजी सर्व न्यायिक कर्मचारी काळी फित बांधून एक दिवस शांततापूर्ण पद्धतीने काम करतील. यानंतरही मागणी पूर्ण न झाल्यास १६ आणि १७ ऑक्टोबर दोन दिवस काळी फित बांधून काम केले जाईल.५ नोव्हेंबर रोजी राज्यातील सर्व सेकंडरी कोर्टाचे कर्मचारी सामूहिक रजा घेऊन शांततापूर्ण निदर्शने करतील.६ नोव्हेंबर धनत्रयोदशी आणि ७ नोव्हेंबर रोजी न्यायिक कर्मचारी भोजन करणार नाहीत, मात्र शांततापूर्णपणे आपले काम सुरू ठेवतील.१९ नोव्हेंबर पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. बैठकीचे नेतृत्व जिल्हा न्यायालयीन कर्मचारी श्रेणी-३ चे अध्यक्ष मधुसूदन देशमुख, उपाध्यक्ष पवन लिहिले, लघु लेखक संघटनेचे उपाध्यक्ष आशीष धामणकर, संघटनेचे मार्गदर्शक प्रमोद तंवर, बेलीफ संघटनेचे अध्यक्ष शंकर हनवटे, चतुर्थ श्रेणी संघटनेचे सचिव प्रमेश आंबेकर, जितेंद्र कारोकर, बोरोकार, इंगोले, आंबेडकर, चौखे, मेश्राम, चोळवादे, गजरे, चेतन राऊत आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

दिशा समितीत लोकप्रतिनिधींचा

वीजपुरवठा होत असताना रस्त्यावरील दिव्यांसाठी वीज का नाही, असा सवाल त्यांनी केला.यवतमाळ मतदार संघाचे बाळासाहेब मांगूळकर यांनीही भारी परिसरातील राष्ट्रीय महामार्गावर उड्डाणपूल उभारण्याची मागणी केल्याचे नमूद करण्यात आले. चिंचोली-दिग्रस येथील आदिवासी विद्यार्थ्यांचे ऑनलाइन सर्वेक्षण न झाल्याने एससी, एसटी व मुस्लिम विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याचा मुद्दा खासदार संजय देशमुख यांनी उपस्थित केला. ग्रामसेवकांच्या कथित भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणीही करण्यात आली. नरेगा कामांमध्ये प्रत्यक्ष काम करणाऱ्या लाभार्थ्यांऐवजी अन्य व्यक्तींच्या खात्यात पैसे जमा झाल्याच्या तक्रारीही पुढे आल्या. ग्रामीण पाणीपुरवठ्यासाठी आलेल्या २८ कोटींच्या जलजीवन निधीचा प्रभावी वापर करून टँकरवर अवलंबून असलेल्या गावांमध्ये पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश देण्यात आले. वीजपुरवठ्याअभावी रखडलेली जलजीवन मिशनची कामे पूर्ण करण्यासाठी महावितरणला पत्र देण्याचेही ठरले. सौरऊर्जेचा पर्याय म्हणून वापर करण्याची सूचना खासदारांनी केली.आर्णी रोड बायपास परिसरातील अपघातांचाही मुद्दा गाजला. दहा नागरिकांचा मृत्यू होऊनही योग्य दिशादर्शक फलक, रेडियम व सूचना फलक नसल्याबद्दल प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. सामाजिक संस्थांना हे काम करावे लागत असेल तर प्रशासन नेमके काय करते, असा सवाल करण्यात आला. याच परिसरातील काही हॉटेलमध्ये कथित अवैध दारूविक्री होत असल्याची माहिती आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी देत संबंधितांवर कारवाईचे निर्देश दिले. बैठकीस आमदार बाळासाहेब मांगुळकर, आमदार संजय देरकर, आमदार किसनराव वानखेडे, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल खत्री यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बडनेरा येथील हरिदास पेठे

पोलीस आणि विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. त्यांच्या तत्परतेमुळे काही मिनिटांतच फायर ब्रिगेड, पोलीस आणि वीज विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले.दमकल कर्मचाऱ्यांनी आणि परिसरातील नागरिकांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवले. वेळेवर आग विझवण्यात आल्याने आग आजूबाजूच्या घरांमध्ये पसरली नाही, अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती. सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस आणि वीज विभागाच्या पथकाने विद्युत पुरवठा खंडित करून परिस्थिती हाताळी.ही आग शॉर्ट सर्किटमुळेच लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या आगीत नंदेश्वर यांच्या घरातील फर्निचर, फ्रीज, धान्य आणि इतर सर्व संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले आहे.आगीत सुमारे अडीच लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र अचानक लागलेल्या आगीमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

हैदरपुरा हत्याकांडातील चार

रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी मृतकाचे वडील शेख फारुक शेख अहमद यांच्या तक्रारीवरून खोलापुरी गेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखा युनिट-१च्या पथकाने घटनास्थळी धाव घेत समांतर तपास सुरू केला. प्रत्यक्षदर्शींकडून माहिती घेतल्यानंतर पूर्ववैमनस्यातून हल्ला झाल्याचे समोर आले. पोलिसांनी आरोपींची ओळख पटवून गुप्त बातमीदारांचे जाळे सक्रिय केले. तांत्रिक तपासाच्या आधारे चार आरोपींना काही तासांत ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेण्यात आलेल्यांमध्ये सैयद शोऐब सैयद चांद (२६), अब्दुल नावेद अब्दुल सत्तार (२२), अब्दुल आसिफ उर्फ आशिक अब्दुल शहीद (३४) आणि सैयद जुनेद सैयद जफर (२२) यांचा समावेश आहे. पुढील तपासासाठी त्यांना खोलापुरी गेट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त शाम घुगे, पोलीस उपायुक्त प्रांजली सोनवणे आणि सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा व सायबर पोलिसांच्या पथकाने केली.

इलेक्ट्रिक वायर चोरी प्रकरणातील

किमतीची, चोरी केली. याप्रकरणी राजापेठ पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असताना सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे व डीबी पथकाला मिळालेल्या माहितीच्या आधारे जहीर खान उर्फ नाडा जमीर खान (वय २२, रा. अकबर नगर, अमरावती) याला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांच्या तपासात आरोपीने राजापेठ हद्दीतील साई गजानन कॉलनी, शक्ती हाइट्स, चंदननगर, विदर्भ प्रीमियम सोसायटी आदी ठिकाणी, तसेच गाडगेनगर हद्दीतील जिजाऊनगर, अभिनव कॉलनी, प्रकाशनगर, त्रिमूर्ती विहार, डॉक्टर कॉलनी आणि कठोरा रोड परिसरातील सुरू असलेल्या बांधकामांमधून इलेक्ट्रिक वायर चोरी केल्याचे समोर आले. आरोपी चोरी केलेल्या वायर जाळून त्यातील तांबे वेगळे करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी विविध गुन्ह्यांशी संबंधित एकूण सुमारे ६५ हजार रुपये किमतीचे ६१ किलो तांबे जप्त केले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे व सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, पोलीस निरीक्षक उमेश मुंढे, सपोनि नितीन शिंदे तसेच राजापेठ पोलिसांच्या डीबी पथकाने केली.

अवैध दारू-जुगारावर ग्रामीण

चांदूर रेल्वे पोलिसांनी जुगार अड्ड्यांवर छापे टाकून एकूण १४ जणांविरुद्ध कारवाई केली. त्यांच्या ताब्यातून वरली-मटका जुगाराचे साहित्य व रोख रक्कम असा १ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. येवदा पोलिसांनी ईटकी येथील सुनील गजानन वाळसे (३७) याच्यावर कारवाई करून बॉबी संत्रा देशी दारूच्या बाटल्या जप्त केल्या. मंगरूळ दस्तगीर पोलिसांनी भातकुल येथील मदन रूपलाल जयस्वाल (३५) याच्याकडून सहा देशी दारूच्या पावट्या जप्त केल्या. तर धारणी पोलिसांनी झापल येथील तोताराम गंगाराम जावलकर (३८) आणि साद्राबाडी येथील रमोती साबुलाल पटोरकर (५६) यांच्याकडून नऊ देशी दारूच्या पावट्या जप्त केल्या. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित पोलीस ठाण्यांच्या पथकांनी केली.

CHANGE IN NAME

OLD NAME :-
IBRAHIM NIZAM SHAH
NEW NAME :-
IBRAHIM NIJAM SHAH
ADDRESS :-
TAJ NAGAR,
CHANDUR BAZAR,
DIST.AMRAVATI -
444704

MAHAVITARAN

NOTICE FOR INVITING QUOTATION

Quotations are invited from regular, reputed, and experienced agencies for the following works. The quoted rates should be reasonable, justified, and in line with prevailing market rates.

Sr.No.	Enquiry No. & Date	Particulars	Last Date for Submission	Estimated Amount (in ₹ Lakh)
1	EE/Amt/R/Tech./No.3909 Dt: 07.09.2026	Quotation for labour contract for watering for Badnera Sub division of Rural Division.	15.09.2026	₹ 1.00 Lakh
2	EE/Amt/R/Tech./No.3910 Dt: 07.09.2026	Quotation for labour contract for watering for Nandgaon Kh Sub division of Rural Division.	15.09.2026	₹1.00 Lakh
3	EE/Amt/R/Tech./No.3911 Dt: 07.09.2026	Quotation for labour contract for watering for Tiwasa Sub division of Rural Division.	15.09.2026	₹ 1.00 Lakh
4	EE/Amt/R/Tech./No.3912 Dt: 07.09.2026	Quotation for labour contract for watering for Dhamangaon Rly Sub division of Rural Division.	15.09.2026	₹ 1.00 Lakh
5	EE/Amt/R/Tech./No.3913 Dt: 07.09.2026	Quotation for labour contract for watering for Chandur Rly Sub division of Rural Division.	15.09.2026	₹ 1.00 Lakh
6	EE/Amt/R/Tech./No.3914 Dt: 07.09.2026	Quotation for labour contract for watering for Amravati Rural office.	15.09.2026	₹ 1.00 Lakh
7	EE/Amt/R/Tech./No.3816 Dt: 07.09.2026	Enquiry for supply of Tinned copper fuse wire 12 SWG for Amravati Rural Dn.	15.09.2026	₹ 1.00 Lakh
8	EE/Amt/R/Tech./No.3817 Dt: 07.09.2026	Enquiry for supply of Tinned copper fuse wire 14 SWG for Amravati Rural Dn.	15.09.2026	₹ 1.00 Lakh
9	EE/Amt/R/Tech/No.3818 Dt: 07.09.2026	Enquiry for supply of Aluminium tabular Lugs of size 70/95 sq.mm for Amravati Rural Dn.	15.09.2026	₹ 1.00 Lakh
10	EE/Amt/R/Tech./No.3820 Dt:07.09.2026	Enquiry for supply of Aluminium tabular Lugs of size120/185/240 sq.mm for Amravati Rural Dn.	15.09.2026	₹ 1.00 Lakh
11	EE/Amt/R/Tech./No.3821 Dt: 07.09.2026	Enquiry for supply of best quality LT discharge rod for Amravati Rural Dn.	15.09.2026	₹ 1.00 Lakh
12	EE/Amt/R/Tech./No.3822 Dt: 07.09.2026	Enquiry for supply of HT paratape for Amravati Rural Dn.	15.09.2026	₹ 1.00 Lakh
13	EE/Amt/R/Tech./No.3823 Dt: 07.09.2026	Enquiry for supply of digital clamp meter /tonge teter & Megger for Amravati Rural Dn.	15.09.2026	₹ 1.00 Lakh

For more details, please contact O & M Division, MSEDCL, Amravati Rural, Near Welcome point, Amravati.
Contact Person: Dy. Executive Engineer (O), Amravati Rural Division.
Mobile No.: 7875763743.
PR No-180 dt.07.09.2026
Executive Engineer,
O&M Division MSEDCL, Amravati Rural.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. **128/19/2026**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री महारुद्र संस्थान रोंदलपुर, ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री विवेक गणेश इंगळे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३ अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) जंगम मिळकत - निरंक
(ब) स्थावर मिळकत (वर्णन) :- मौजे रोंदलपुर, भुमापन क्र.४ मधील २५.५ x २५.५ एकुण क्षेत्रफळ ६५०.२५ चौ.फुट, या जागेवर दगडी बांधकाम बांधलेले मंदिर १०x १०=१०० चौ.फुट खुली जागा ५५०.२५ चौ.फुट
उत्तरेस :- उत्तमराव पवार यांचे शेत
दक्षिणेस :- गावठाण शेत
पुर्वेस :- रोंदलपुर गावाची जमीन
पश्चिमेस :- सुधाकर शंकल येवले यांचे शेत
प्रत्येक स्थावर मालमत्तेची अंदाजे किंमत १,००,००/- रुपये

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर पुरावरा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १३.०८.२०२६ रोजी दिली.

सही/-
अधीक्षक, न्याय शाखा
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१८०८/२०२६
प्रविण + १ वि निरंक
पुढील ता.३०.०९.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार
1. **Mr. Pravin Gajanan Rudrakar**
Age 33 years. Occu.: Private Service
R/o. Ravi Nagar, Amravati
2. **Mr. Akash Gajananrao Rudrakar**
Age 31 years. Occu.: Private Service
R/o. Ravi Nagar, Amravati

विरुध्द

NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Usha Krushnarao Boradkar alis Usha Gajanan Rudrakar (after marriage)** हे **दि.१८.०२.२०२६** रोजी अमरावती येथे मयत झाले. **Mr. Pravin Gajanan Rudrakar + 1** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Mr. Pravin Gajanan Rudrakar + 1** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०४.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२४७/२०२६ **ने.ता.०३.१०.२०२६**

१. करुना रविंद्र चवरे
२. सलोनी रविंद्र चवरे
३. आदर्श रविंद्र चवरे
सर्व रा.कंझरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

// वि //
निरंक

ज्याअर्थी, **मयत

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, ९ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

शिक्षण विभागाच्या मनमानीविरोधात १९ शिक्षक संघटनांचे धरणे

शिक्षण विस्तार अधिकारी गजानन डाबेराव यांना मूळ पदावर कार्यमुक्त करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील शिक्षण विभागाच्या कथित मनमानी व अन्यायकारक कारभाराच्या निषेधार्थ जिल्ह्यातील सर्व १९ जि.प. प्राथमिक शिक्षक संघटनांच्या वतीने जिल्हा परिषद कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी शेकडो शिक्षकांनी सहभागी होत शिक्षण विस्तार अधिकारी गजानन डाबेराव यांना तत्काळ त्यांच्या मूळ पदावर कार्यमुक्त करावे, तसेच त्यांच्या कारभाराची चौकशी करावी, अशी मागणी केली. विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले.

शिक्षण विभागातील गजानन डाबेराव यांच्या कथित अवाजवी हस्तक्षेपामुळे शिक्षकांमध्ये नाराजी निर्माण झाली असल्याचा आरोप शिक्षक संघटनांनी केला. डाबेराव यांना त्यांच्या मूळ पदावर, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून मंगरूळपीर येथे पाठविण्यात यावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. शिक्षकांचे विविध प्रश्न व प्रलंबित मागण्यांकडे शिक्षण विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.

चुकीच्या शिक्षक समायोजन आदेशांच्या दडपशाहीचा निषेध करत पदोन्नती प्रक्रियेत झालेल्या कथित अनियमिततेची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. तसेच निवड श्रेणी व चटोपाध्याय श्रेणीचे प्रलंबित प्रस्ताव तातडीने निकाली काढावेत, अशी मागणीही करण्यात आली. शिक्षकांच्या वैद्यकीय बिलांच्या फाईली मागील तीन महिन्यांपासून शिक्षण विभागात प्रलंबित असल्याचा आरोप करत त्या तातडीने निकाली काढण्याची मागणी करण्यात आली. शिक्षकांकडून वारंवार मागविण्यात येणाऱ्या अनावश्यक माहितीला आळा घालावा आणि विनाकारण लादण्यात येणाऱ्या ऑनलाइन कामांचा अतिरिक्त भार कमी करावा, अशी मागणी शिक्षक संघटनांनी केली. याशिवाय संच मान्यतेचे निकष तातडीने बदलण्यात यावेत, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

शिक्षकांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनाला शिक्षक प्रतिनिधी, अन्यायग्रस्त शिक्षक तसेच विविध स्तरातून पाठिंबा मिळाला. आता जिल्हा परिषद प्रशासन या मागण्यांबाबत कोणती भूमिका घेते आणि संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई करते, याकडे जिल्ह्यातील शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

जिल्ह्यातील १४९ तांड्यांच्या विकासाला गती देण्यासाठी मुंबईत महत्त्वपूर्ण आढावा बैठक

■ प्रतिनिधी | वाशिम ■

संत सेवालाल महाराज बंजारा-लबाना तांडा समृद्धी योजनेच्या माध्यमातून वाशिम जिल्ह्यातील तांड्यांच्या सर्वांगीण विकासाला अधिक गती देण्यासाठी वाशिम जिल्ह्यातील १४९ तांड्यांच्या विकासकामांचा मुंबई येथे महत्त्वपूर्ण आढावा घेण्यात आला.

बैठकीत तांड्यांच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध मूलभूत सुविधांसह महसुली दर्जा, ग्रामपंचायत निर्मिती व विभाजन, स्मशानभूमी तसेच शैक्षणिक सुविधांबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

वाशिम जिल्ह्यातील १५ ग्रामपंचायत विभागाचे प्रस्ताव तसेच महसुली दर्जा मिळण्यासाठीचे २२ प्रस्ताव पुढील प्रशासकीय कार्यवाहीद्वारे लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्याबाबत चर्चा झाली.

स्मशानभूमीसाठी निधी उपलब्ध असलेल्या तांड्यांमध्ये जागेची उपलब्धता हा प्रश्न सोडविण्यासाठी गावातील ई-क्लास व सी-क्लास जमीन उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

तांड्यांमधील जिल्हा परिषद शाळांच्या दुरुस्ती व मूलभूत सुविधांबाबत देखील चर्चा करण्यात आली. तांड्यातील विद्यार्थ्यांना सुरक्षित व चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यावर भर देण्यात आला.

या बैठकीस योजनेचे समन्वयक डॉ. जगदीश सकवान, प्रशासकीय अधिकारी रविंद्र राठोड, सचिन पानझाडे, निलेश जाधव, अक्षय राठोड तसेच माजी अशासकीय सदस्य विलास राठोड, रामेश्वर पवार, गणेश जाधव, सुनील राठोड, रमेश पवार, रामेश्वर राठोड, अनुभव चव्हाण, अर्जुन साबळे, करण जाधव उपस्थित होते. जिल्ह्यातील प्रत्येक तांड्याला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रलंबित प्रशासकीय बाबींना गती देणे, मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी लाभ तांड्यांपर्यंत पोहोचविणे, यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला.

क्षयरोग तपासणी शिबिरात १३० संशयितांची एक्स-रे तपासणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा क्षयरोग केंद्राच्या वतीने मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र कुपटा तसेच आयुर्वेदिक दवाखाना दापुरा येथे संशयित क्षयरुग्णांसाठी तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात संशयित रुग्णांची क्ष-किरण तपासणी करून क्षयरोगाचे निदान करण्यासाठी आवश्यक नमुने संकलित करण्यात आले.

तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शंकर नांदे, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत वाघमारे, डॉ. ढाले व डॉ. खराटे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्षयरोग केंद्राचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी शिबिराचे नियोजन केले. कुपटा येथील शिबिरात क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी सैबेवार यांनी ६२ संशयितांची एक्स-रे तपासणी केली. यावेळी ३३ संशयितांचे थुंकीचे नमुने (स्पुटम) संकलित करण्यात आले. दापुरा येथील आयुर्वेदिक दवाखान्यात टेक्निशियन स्वप्नील बोरकर व चेतन लादे यांनी ६८ संशयितांची एक्स-रे तपासणी केली, तर ३० संशयितांचे स्पुटम नमुने घेण्यात आले.

धुमका-तोंडगाव टोल प्लाझावरील कथित रोख वसुली घोटाळ्याची चौकशी करा

डिजिटल पुराव्यासह जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ वरील धुमका - तोंडगाव टोल प्लाझावर वाहनधारकाकडून विनापावती बेकायदेशीर रोख रक्कम उकळून केंद्र सरकारचा कोट्यवधी रुपयांचा महसूल हडपल्याचा खळबळजनक आरोप समोर आला आहे. या प्रकरणी तोंडगाव येथील तक्रारदार शरद तुळशीराम गोटे यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडे डिजिटल पुराव्यासह अधिकृत निवेदन सादर करून सखोल चौकशीची मागणी केली आहे.

सदर निवेदनानुसार, धुमका-तोंडगाव टोल नायावर कंत्राटदार कंपनी 'मेसर्स रोडलिंक इन्फ्राटेक' मार्फत केंद्र शासनाचे १०० टक्के फास्टॅगचे नियम धाब्यावर बसवले जात आहेत. हा प्रकार केवळ काही दिवसापुरता मर्यादित नसून १ एप्रिल ते ४ ऑगस्ट दरम्यान सलग चार महिने अव्याहतपणे सुरू होता. या गैरप्रकाराचा पर्दाफाश करण्यासाठी केलेल्या पाहणीत टोल कर्मचाऱ्याने कॅमेऱ्यासमोर कबूल केले होते की, ही विनापावती रोख वसुली टोल मॅनेजमेंट आणि कॅशियर यांच्या थेट सांगण्यावरून सुरू आहे. हा संपूर्ण डिजिटल व्हिडिओ पुरावा सादर केल्यानंतरही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अमरावती प्रकल्प संचालक कार्यालयाने कंत्राटदारावर कोणतीही कायदेशीर किंवा दंडात्मक कारवाई केली नाही. उलटपक्षी, संबंधित अधिकाऱ्यांनी अधिकृत पत्राद्वारे (क्र. १५०९) कर्मचाऱ्याने पैसे घेतलेच नाहीत, केवळ ओळखपत्र पाहून गाडी सोडली असा खोटा बचाव मांडून कंत्राटदाराला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारदाराने निवेदनात केला आहे.

जिल्हा प्रशासनाने विशेष तपासणी पथक नेमून टोल प्लाझाचे मागील चार महिन्यांचे सीसीटीव्ही फुटेज, हँडहेल्ड मशिन्स आणि सर्व्हर डेटा तात्काळ जप्त करावा. प्रवाशांची आर्थिक लूट करणाऱ्या टोल कंत्राटदारावर तसेच त्यांना पाठीशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर भारतीय न्याय संहितेनुसार फौजदारी कारवाई करावी. या निवेदनात मूळ व्हिडिओ पुराव्याची डिजिटल लिंक व यूआर कोड जोडण्यात आला.

जिल्ह्यात एकाचवेळी ११ ठिकाणी रोजगार मेळावे

अकोला : कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे 'रोजगार महाकुंभ – महाराष्ट्र' दि. २९ सप्टेंबरला होणार असून, जिल्ह्यात एकाचवेळी ११ ठिकाणी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. नामांकित कंपन्यांबरोबरच स्थानिक उद्योगांच्या समावेशासह होणाऱ्या या मेळाव्यांमध्ये शेकडो पदांची भरती होणार आहे.

या मेळाव्याचे वैशिष्ट्य असे की, नोंदणी करणाऱ्या उमेदवारांचे पूर्व प्रशिक्षण, व मुलाखतीची तयारी संबंधित तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत करून घेण्यात येणार आहे. अकोला येथे अकोला इंडस्ट्री असोसिएशन हॉल, (औद्योगिक वसाहत), शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, गौरक्षण रस्त्यावरील प्रोफेशनल कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट येथे मेळावा होईल.

एएसआयपदी पदोन्नतीबद्दल राजू कोकणे यांचा सत्कार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पोलीस मुख्यालय, वाशिम येथे कार्यरत असलेले राजू राजाराम कोकणे यांची पोलीस सहाय्यक उपनिरीक्षक (एएसआय) पदावर पदोन्नती झाल्याबद्दल वाशिम जिल्ह्यासह राज्यातील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या वतीने आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी सह्याद्री विश्राम भवन, वाशिम येथे एएसआय राजू कोकणे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या सत्कार समारंभास डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त गोपाळराव आटोटे गुरुजी, महाराष्ट्र राज्य साहित्यिक शेषराव धांडे सर, सत्यमेव जयते फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष परमेश्वर अंभोरे, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे महामंत्री सरकार इंगोले, पोलीस सेवानिवृत्त संघटनेचे पदाधिकारी माधव जमधाडे, डॉ. राहुल आटोटे सर, अखिल भारतीय धम्म सेवक सुभाष वाठोरे, ॲड. संघनायक मोरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

बालविकास मंदिर प्राथमिक शाळेत शिक्षक दिन स्वयंशासन दिन म्हणुन साजरा

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव येथील तहसील कार्यालया जवळ बोरगाव रोड वरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथ शाळा मालेगांव येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या निदा फिरदोस यांनी भूषवले तर प्रमुख उपस्थितीत ईश्वरी भुसारी, गणेश गवळी, शेख जियान उपस्थित होते. सदर कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करून करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ व पुस्तक भेट देऊन स्वागत करण्यात आले. आज शाळेमध्ये शिक्षक दिन स्वयंशासन दिन म्हणून साजरा करण्यात आला. शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले शुभेच्या पत्र शिक्षकांना दिले. या निमित्ताने शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात एक संस्मरणीय क्षण निर्माण झाला. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अध्यापनाचा अनुभव येण्यासाठी विविध विद्यार्थ्यांनी शिक्षक वेशभूषा मध्ये आज शाळेमध्ये सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये मुख्याध्यापक पद निदा फिरदोस, ईश्वरी भुसारी यांनी भूषविले. पर्वेक्षक व तथा सेवक इत्यादी भूमिका विद्यार्थ्यांनी दिवस भर उत्साह पार पाडल्या. यावेळी शाळेतील शिक्षकांचा विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार केला. सदर स्वयंशासन दिनाचे कार्य वेळापत्रकानुसार राबविण्यात आले. व विद्यार्थ्यांनी त्यांना आलेल्या अनुभवाचे कथन सुद्धा यावेळी केले.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी शाळेत शाडू मातीच्या गणपती मूर्ती बनविण्याची कार्यशाळा उत्साहात संपन्न

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव येथील तहसील कार्यालयाजवळ बोरगाव रोडवरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळा मालेगाव येथे शाडू मातीपासून गणपती मूर्ती तयार करण्याची विशेष कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना शाडू मातीचा वापर करून पर्यावरणपूरक गणपती मूर्ती कशी तयार करावी, याचे प्रात्यक्षिक करून मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत आकर्षक व सुंदर गणपती मूर्ती तयार केल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीऐवजी शाडू मातीच्या मूर्तीचा वापर करण्याचे महत्त्वही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. सदर कार्यशाळेला मार्गदर्शन व मूर्ती कशा पद्धतीने तयार करायची याची माहिती प्रसिद्ध मूर्तिकार चंद्रकांत मुंढरे यांनी विद्यार्थ्यांना दिली.

सोयाबीन-कापूस पिकांच्या एकात्मिक व्यवस्थापनावर प्रशिक्षण

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कृषी विज्ञान केंद्र, वाशिमच्या वतीने मुख्य खरीप पिकांमध्ये सोयाबीन व कापूस पिकांचे एकात्मिक पीक व्यवस्थापन या विषयावर शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि. ८ सप्टेंबर रोजी सुकांडा, ता. मालेगाव, जि. वाशिम येथे करण्यात आले. बदलत्या हवामान परिस्थितीत पिकांची उत्पादकता, संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि शाश्वत शेती उत्पन्न वाढविण्यासाठी वेळेवर आणि शास्त्रीय पीक व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा प्रशिक्षणाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमास कृषी विज्ञान केंद्र, वाशिमचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. आर. एल. काळे, प्रगतशील शेतकरी चंद्रकांत घुगे तसेच कृषीशास्त्र विषयतज्ज्ञ तुषार देशमुख उपस्थित होते.

तांत्रिक सत्रामध्ये तुषार देशमुख यांनी सोयाबीन व कापूस पिकांमध्ये सध्याच्या पिकांच्या अवस्थेनुसार आवश्यक आंतरमशागत, जमिनीतील उपलब्ध ओलाव्याचे संवर्धन, तण व्यवस्थापन, अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि पाणीटंचाईच्या परिस्थितीत पीक व्यवस्थापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच पिकांवरील प्रमुख किडींचे एकात्मिक कीड व्यवस्थापन, कीड सर्वेक्षण, आर्थिक नुकसान पातळीच्या आधारे कीटकनाशकांचा वापर आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत शेतकऱ्यांना तांत्रिक सल्ला देण्यात आला.

डॉ. आर. एल. काळे यांनी बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर एकात्मिक शेती प्रणाली स्वीकारण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

भारत प्राथमिक मराठी शाळेत शिक्षक दिन उत्साहात साजरा

■ प्रतिनिधी | रिसोड ■

येथील भारत प्राथमिक मराठी शाळेत ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन उत्सहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका किरणताई दुबे या होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ शिक्षिका जयश्री दुबे, शिक्षक कैलास खाडे, परमेश्वर देशमुख, गौरव पतंगे यांची विशेष उपस्थिती लाभली . कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता माता सरस्वती आणि माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. यानंतर कार्यक्रमाच्या अध्यक्षा मुख्याध्यापिका किरणताई दुबे तथा सेवाज्येष्ठतेनुसार सत्कारमूर्ती शिक्षक मुकुंद लोखंडे यांचा शाल श्रीफळ व भेटवस्तू देऊन शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच उपस्थित सर्व शिक्षकवृंदांचे पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी अध्यक्षीय भाषणात बोलताना मुख्याध्यापिका किरणताई दुबे यांनी शिक्षकांचे समाजातील स्थान अधोरेखित केले.

सोयाबीन सुकले, शेतकऱ्यांचे स्वप्नही करपले!

पावसाने दडी मारल्याने सोयाबीन पिकाला मोठा फटका

■ प्रतिनिधी | वाशिम ■

रिसोड : खरीप हंगामातील प्रमुख नगदी पीक असलेल्या सोयाबीनवर यंदा पावसाच्या लहरीपणाचा मोठा परिणाम होताना दिसत आहे. सुरुवातीला झालेल्या समाधानकारक पावसानंतर शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने सोयाबीनची पेरणी केली. मात्र, पिकाच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाने दडी मारल्याने अनेक शेतांमध्ये सोयाबीनचे पीक सुकून करपण्याच्या मार्गावर आहे.

पावसाअभावी जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असून सोयाबीनच्या झाडांची पाने पिवळी पडत आहेत. काही ठिकाणी झाडांची वाढ खुंटली असून शेंगा भरण्याच्या अवस्थेत असलेल्या पिकाला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. परिणामी सोयाबीनच्या उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. यंदाच्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी बियाणे, खत, औषधे, मशागत आणि मजुरीवर मोठा खर्च केला आहे. पीक चांगले येईल आणि उत्पादनातून खर्च भरून निघेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र, पावसाने साथ सोडल्याने त्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

उत्पादन घटण्याची भीती, बळीराजा चिंतेत

'पिकासाठी केलेला खर्च वाढला आहे. आता पाऊस झाला नाही तर हातातोंडाशी आलेले पीकही वाया जाण्याची शक्यता आहे,' अशी चिंता परिसरातील शेतकरी व्यक्त करीत आहेत.

शंकर पाटील सदार, शेतकरी

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २८३ ■ बुधवार, ९ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

निमंत्रण केचेंचे, दांडी नेत्यांची; कोणाच्या सांगण्यावरून आर्वीचे राजकारण पेटले

गांधी चौकात जनसागर, पण राजकीय दिग्गजांच्या खुर्च्या रिकाम्या

दहीहंडीच्या उत्सवाला राजकीय ग्रहण; आर्वीच्या भाजप गोटात चर्चांना उधाण

आर्वी, विरुळ जनमाध्यम : गांधी चौकात दहीहंडी फुटली पण तिच्या आवाजापेक्षा आर्वीच्या राजकारणात उमटलेला राजकीय स्फोट अधिक मोठा ठरला. माजी विधानपरिषद आमदार दादाराव केचे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या देवाभाऊ दहीहंडी सांस्कृतिक महोत्सवा'ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मात्र पक्षातील प्रमुख नेत्यांना मानसन्मानाने निमंत्रित करूनही त्यांची उपस्थिती न दिसल्याने राजकीय वर्तुळात कुजबुजेला सुरुवात झाली. हा केवळ योगायोग की पडद्यामागच्या राजकारणाचा संकेत हा प्रश्न आता आर्वीत चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

गोकुळाष्टमीच्या पर्वावर गांधी चौकात आयोजित या भव्य कार्यक्रमाला शहर आणि ग्रामीण भागातून नागरिकांची मोठी गर्दी झाली. उत्सवाचा माहोल रंगला असताना राजकीय मंचावरील काही महत्त्वाच्या खुर्च्या मात्र रिकाम्याच राहिल्या. निमंत्रण असूनही प्रमुख पाहुण्यांनी कार्यक्रमाला पाठ फिरवल्याने उपस्थितांच्या नजरा त्या रिकाम्या खुर्च्यांवर खिळल्या होत्या.

आणि याच मुद्द्याला माजी आमदार दादाराव केचे यांनी पत्रकारांशी बोलताना थेट हात घातला.

'कुठेतरी एक वेगळे राजकारण यामध्ये दिसून येत आहे. ज्यांना आमंत्रित करूनही ते प्रमुख पाहुणे आले नाहीत, ते कोणाच्या सांगण्यावरून आले नाहीत का असा प्रश्न केचे यांनी उपस्थित केला. केचे यांच्या या वक्तव्याने आर्वीतील पक्षांतर्गत राजकारणाची दारे पुन्हा

उघडली आहेत. पक्षाच्या कार्यक्रमात कोण उपस्थित राहणार, कोण गैरहजर राहणार, कोणाच्या कार्यक्रमाला कोण जाणार आणि कोणत्या कार्यक्रमापासून कोण अंतर ठेवणार, या राजकीय हालचालींनाही आता अर्थ लावला जात आहे.

निमंत्रण होते, मग गैरहजेरी का

राजकीय कार्यक्रमांमध्ये उपस्थिती ही केवळ औपचारिक बाब नसते. विशेषतः सार्वजनिक कार्यक्रमात पक्षातील वरिष्ठ नेत्यांना सन्मानपूर्वक निमंत्रित केले जाते आणि त्यांची उपस्थिती राजकीय ऐक्याचा संदेश देत असते. त्यामुळे निमंत्रण असूनही नेत्यांची अनुपस्थिती आर्वीच्या राजकीय पटावर वेगळीच चर्चा निर्माण करणारी ठरली आहे. केचे यांनी थेट कोणाचेही नाव घेतले नसले तरी कोणाच्या सांगण्यावरून या त्यांच्या एका प्रश्नाने राजकीय चर्चेचे वर्तुळ मात्र मोठे केले आहे.

तडस मुंबईत बाकींचे काय

माजी खासदार रामदास तडस यांच्या अनुपस्थितीबाबत विचारणा केली असता त्यांनी स्पष्ट केले की, मुलगी आजारी असल्यामुळे आपण मुंबईत आहोत आणि आपल्यावर कुणाचाही दबाव नाही. बाकी नेतेमंडळी का आली नाहीत, याची माहिती नसल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे तडस यांच्या अनुपस्थितीचे कारण स्पष्ट झाले असले तरी इतर नेत्यांच्या गैरहजेरीचे गूढ कायम आहे. यामुळे केचे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला आणखी राजकीय वजन मिळाले आहे.

गांधी चौकातील रिकाम्या खुर्च्या बोलू लागल्या

एकीकडे जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद, दुसरीकडे अपेक्षित राजकीय उपस्थितीचा अभाव आणि त्यावर केचे यांचा प्रश्न या तिन्ही घटनांनी आर्वीच्या राजकारणात चर्चेचे नवे वादळ उठवले आहे.

दहीहंडीचा उत्सव जनतेने गाजवला पण राजकीय मंचावरच्या रिकाम्या खुर्च्यांनी पक्षातील समीकरणांचा प्रश्न ऐरणीवर आणला.

आता प्रश्न केवळ नेते दहीहंडीला का आले नाहीत, एवढाच राहिलेला नाही. आर्वीच्या राजकारणात कोण कोणाच्या सोबत आहे, कोण कोणापासून अंतर राखत आहे, आणि कोणाच्या राजकीय छत्राखाली कोणती समीकरणे जुळत आहेत, यावरून राजकीय तर्कवितर्क सुरू झाले आहेत.

दहीहंडीच्या निमित्ताने झालेल्या या घटनेने आगामी काळातील आर्वीच्या राजकारणाची दिशा कितपत बदलते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. मात्र एवढे निश्चित की, गांधी चौकात दहीहंडी फुटली असली तरी तिच्या निमित्ताने आर्वीच्या राजकारणातील प्रश्नांची हंडी अजून फुटायची बाकी आहे,

पवनगावात दोन वाघांची दहशत; शेतकऱ्यांचा जीव मुठीत

वाघाच्या झडपेतून विशाल मुन थोडक्यात बचावले

अतुल वांदिले यांच्या पाठपुराव्यानंतर रोहित पवारांची जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा

समुद्रपूर जनमाध्यम : तालुक्यातील पवनगाव (करूळ) परिसरात दोन वाघांचा वावर असल्याने शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतात जनावरे चारत असताना विशाल मुन (३२) यांच्यावर वाघाने अचानक झडप घातल्याची धक्कादायक घटना घडली. सुदैवाने मुन या हल्ल्यातून थोडक्यात बचावले. मात्र या घटनेने परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

गेल्या काही दिवसांपासून परिसरातील शेतकरी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)चे वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांच्याशी संपर्क साधून वाघांच्या वावराबाबत चिंता व्यक्त करीत होते. गोंदिया जिल्हा दौऱ्यावर असलेल्या आमदार रोहित पवार यांना वांदिले यांनी परिस्थितीची माहिती दिली. त्यानंतर रोहित पवार यांनी तातडीने वर्धा जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला.

वाघांचा वावर वाढत असताना वनविभागाने आता केवळ पाहणीपुरती कारवाई न करता ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. वाघांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी संवेदनशील भागात कॅमेरे बसवावेत, वनविभागाची गस्त वाढवावी आणि नागरिकांना सतर्कतेच्या सूचना द्याव्यात, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केली.

वाघांच्या भीतीमुळे शेतकऱ्यांना रात्री शेतात जाणे धोकादायक ठरत आहे. त्यामुळे शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा देण्याची मागणीही करण्यात आली आहे. दिवसा वीज उपलब्ध झाल्यास रात्रीच्या वेळी शेतात जाण्याची गरज कमी होईल आणि वन्यप्राण्यांच्या हल्ल्याचा धोका टाळता येईल.

पवनगाव परिसरातील नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होण्यापूर्वी वनविभागाने तातडीने हालचाल करावी, वाघांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवावे आणि कायमस्वरूपी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

बैलांच्या सन्मानात वर्ध्यात गुरुवारी 'ग्रामीण संस्कृतीचा उत्सव'

कृषी प्रदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रमांतून शेतकरी संस्कृतीचा जागर

शिवेंद्रराजे भोसले यांची उपस्थिती

वर्धा जनमाध्यम : शेतकऱ्याच्या कष्टाला खांदा देणाऱ्या बैलांच्या ऋणाची जाणीव जागवणारा पारंपरिक बैलपोळा यंदा वर्ध्यात दिमाखात साजरा होणार आहे. गुरुवार, १० सप्टेंबर रोजी रामनगर येथील शहीद भगतसिंग मैदानावर 'ग्रामीण संस्कृतीचा उत्सव' या उपक्रमातून बैलपोळा व कृषी प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ४ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत रंगणाऱ्या या सोहळ्यात ग्रामीण संस्कृतीचा जिवंत आविष्कार पाहायला मिळणार आहे.

सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या सहकार्याने होणाऱ्या या कार्यक्रमाला सार्वजनिक बांधकाममंत्री

शिवेंद्रराजे भोसले उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशीष शेलार अध्यक्षस्थानी, तर कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल विशेष उपस्थित राहणार आहेत. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर स्वागताध्यक्ष आहेत.

कृषी तंत्रज्ञान, ग्रामीण हस्तकला, शेतीपूरक उद्योगांसह सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे पोळा केवळ सण न राहता शेतकरी, बैल आणि मातीतल्या संस्कृतीचा सन्मान करणारा उत्सव ठरणार आहे.

राजकीय नेते, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार असल्याने या सोहळ्याला विशेष राजकीय महत्त्वही प्राप्त झाले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

वाघिणी आली रस्त्यावर, लालपरी थांबली, बछड्यांसह तासभर थरार

आष्टी-थार मार्गावर बछड्यांसह वाघिणीचे दर्शन

आष्टी शहीद जनमाध्यम : आष्टी तालुक्यातील जंगल परिसरातून जाणाऱ्या आष्टी-थार मार्गावर मंगळवारी दुपारी वाघिणीसह तिच्या बछड्यांचे दर्शन झाल्याने प्रवाशांची अक्षरशः भंबेरी उडाली. दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास आष्टीहून थारकडे जाणाऱ्या एसटी बससमोर अचानक वाघिणीचा वावर दिसून आला. रस्त्याच्या अगदी कडेला वाघिणी बछड्यांसह फिरताना दिसताच चालकाने प्रसंगावधान राखत लालपरी जागेवरच थांबवली.

बस थांबताच आतील महाविद्यालयीन विद्यार्थी आणि प्रवाशांचे लक्ष वाघिणीकडे गेले. काही क्षणांतच बछडेही दिसल्याने प्रवाशांमध्ये उत्सुकतेसोबतच भीतीचे वातावरण निर्माण झाले. वाघिणीने रस्ता आणि परिसर सोडण्याऐवजी तब्बल एक तास तेथेच ठिय्या मांडल्याने बसमधील प्रवाशांना बराच वेळ बसमध्येच थांबावे लागले.

वाघिणी आणि बछडे रस्त्यालगत फिरत असल्याने या मार्गावरील वन्यजीवांच्या वाढत्या वावराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. जंगल आणि शेतशिवाराला लागून असलेल्या या मार्गावर विद्यार्थी, शेतकरी, दुचाकीस्वार तसेच एसटी प्रवाशांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. त्यामुळे वन्यप्राण्यांचा वावर आता नागरिकांच्या सुरक्षेसाठी धोक्याची घंटा ठरत आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह प्रवाशांचा थरार, तब्बल तासभर वाहतूक खोळंबली

वाघिणीचा रस्त्यालगत वावर पाहून लालपरीतील प्रवाशांचा काही काळ अक्षरशः श्वास रोखला गेला. काही प्रवाशांनी सुरक्षित अंतरावरून या थरारक दृश्याचे मोबाईलमध्ये चित्रीकरण केल्याची माहिती आहे.

आष्टी-थार मार्गावर वाघिणीचा बछड्यांसह वाढता वावर लक्षात घेता वनविभागाने तातडीने या मार्गावर गस्त वाढवावी. वाघिणीच्या हालचालींवर लक्ष ठेवून नागरिकांना सतर्क करावे आणि संभाव्य अनुचित घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

गणरायाच्या स्वागताला प्रदूषणाला दारातच रोखा

'मूर्ती छोटी अन् मातीचीच' घेण्याचे आवाहन

नगराध्यक्ष सुधीर पांगूळ : पर्यावरण रक्षणासाठी नागरिकांनी दक्ष प्रहरी बनावे

वर्धा जनमाध्यम : गणरायाचा उत्सव भक्तिभावाने साजरा करताना निसर्गाचा गळा घोटला जाऊ नये, यासाठी यंदा पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा जागर करण्यात येणार आहे. गणेशोत्सवादरम्यान जलप्रदूषण रोखण्यासाठी पालिका प्रशासन शहरात ११ ठिकाणी कृत्रिम विसर्जनकुंड उभारणार आहे. नागरिकांनी नदी, तलाव किंवा जलस्रोतांऐवजी या कुंडांमध्येच मूर्ती विसर्जित करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्ष सुधीर पांगूळ यांनी केले.

पीओपीच्या मूर्ती पाण्यात पूर्णपणे विरघळत नसल्याने जलस्रोतांचे प्रदूषण होते. त्यामुळे नागरिकांनी मूर्ती खरेदी करतानाच मातीच्या मूर्तीला प्राधान्य द्यावे. 'मोठी मूर्ती म्हणजे मोठी भक्ती' या मानसिकतेला फाटा देत छोटी आणि मातीची मूर्ती घेण्याची गरज आहे. पर्यावरण रक्षण ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे पांगूळ यांनी स्पष्ट केले.

गणेशोत्सवाच्या दुसऱ्या दिवसापासून विविध भागांत कृत्रिम विसर्जनकुंड तसेच निर्माल्य कुंड उपलब्ध करून दिले जाणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक, आर्वी नाका चौक, धुनिवाले मठ चौक, राष्ट्रपिता महात्मा गांधी पुतळा चौक, बढे चौक, सर्कस मैदान, भगतसिंग पुतळा चौक, शास्त्री पुतळा चौक, साईनगर चौक आणि सोशालिस्ट चौक येथे ही व्यवस्था राहणार आहे.

निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे यांनी गणेश मंडळांनी समाजप्रबोधनात्मक कार्यक्रम घेऊन ध्वनिप्रदूषण टाळावे, असे आवाहन केले. वैद्यकीय जनजागृती मंचचे अध्यक्ष डॉ. सचिन पावडे यांनी त्यांच्या संस्थेच्या पर्यावरणपूरक विसर्जन चळवळीला नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत असल्याचे सांगितले. मागील वर्षी हनुमान गड येथील कृत्रिम कुंडात सुमारे चार हजार मूर्तींचे विसर्जन झाले होते. ही माती स्थानिक मूर्तीकारांना पुन्हा उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे भक्तीबरोबर पर्यावरणाचेही संवर्धन होत आहे.

स्वच्छ आणि सुंदर वर्ध्यासाठी सण-उत्सवही पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे व्हावेत, असे डॉ. राजेश आसमवार यांनी सांगितले. मोठ्या आवाजाचा लहान मुले आणि वृद्धांवर परिणाम होत असल्याने ध्वनीमर्यादेचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले.

नाल्याच्या काठावर गावठी दारूची भट्टी; ४.६१ लाखांचा मुद्देमाल जप्त

सेलू जनमाध्यम : गावठी मोहा दारू तयार करण्यासाठी नाल्याच्या काठावर सुरू असलेल्या भट्टीवर सेलू पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण पथकाने छापा टाकून तब्बल ४ लाख ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांची चाहूल लागताच संशयित पसार झाला असून त्याच्याविरुद्ध दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ सप्टेंबर रोजी सेलू पोलिसांचे डीबी पथक परिसरात गस्त घालत असताना देवनगर हिंगणी येथील संदीप ठाकरे हा जुनेवानी शेतशिवारातील नाल्याच्या काठावर झाडाझुडपांच्या आड गावठी मोहा दारूसाठी कच्चा सडवा तयार करीत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी पंचांसमक्ष घटनास्थळी धाड टाकली.

पोलिस पथकाची चाहूल लागताच संदीप ठाकरे झाडाझुडपांचा फायदा घेत पसार झाला. घटनास्थळावर पोलिसांना ११ मोठे लोखंडी ड्रम आढळून आले. प्रत्येक ड्रममध्ये सुमारे २०० लिटर याप्रमाणे तब्बल २२०० लिटर मोहा सडवा रसायन आढळले. त्याची किंमत ४ लाख ४० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

याशिवाय ११ लोखंडी ड्रमची किंमत ११ हजार रुपये असून दारूभट्टीसाठी लागणारे अन्य साहित्य सुमारे १० हजार रुपयांचे आहे. असा एकूण ४ लाख ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी संदीप ठाकरे याच्याविरुद्ध सेलू पोलिस ठाण्यात दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पसार आरोपीचा शोध सुरू आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार पंकज वाघोडे यांच्या नेतृत्वात पोलिस अंमलदार अनिल केकतपुरे, रामकिसन इप्पर व गजानन कमठाणे यांनी केली.

सेलडोह येथे 'लाडकी बहीण'च्या नावाखाली महिलांची लूट

अपात्रांना पुन्हा लाभाचे आमिष; ५० रुपये वसुली, आधारकार्डांची मागणी; पोलिसांच्या धडाकेबाज हस्तक्षेपाने प्रकार उधळला

सेलू जनमाध्यम : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या नावाखाली महिलांकडून पैसे उकळण्याचा धक्कादायक प्रकार सेलडोह येथे उघडकीस आला. अपात्र ठरलेल्या महिलांना पुन्हा योजनेचा लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखवत प्रत्येकी ५० रुपये घेतले जात असल्याने गावात खळबळ उडाली. मात्र सतर्क नागरिकांनी वेळीच पोलिसांना माहिती दिल्याने महिलांची आर्थिक फसवणूक टळली.

सोमवारी ७ सप्टेंबर रोजी रात्री महिलांना एकत्र करून बैठक घेण्यात आली. मंगेश रंगारी, राहुल लाडीस्कर, चंद्रशेखर शेवडे, सतीश लाडीस्कर आणि कान्हा धोंगडे यांनी महिलांकडून ओळखपत्रे मागितल्याचे समोर आले. यावेळी मुंबईचा पत्ता असलेल्या 'अखिल भारतीय जनवादी महिला संघटना महाराष्ट्र राज्य कमिटी'च्या नावाच्या २० रुपयांच्या पावत्याही देण्यात आल्या.

प्रकाराची माहिती मिळताच योगराज कोरते यांच्या पत्नीने सिंदी (रे.) पोलिसांना कळविले. बिट जमादार धनराज सयाम यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत चौकशी केली. त्यानंतर महिलांकडून घेतलेले पैसे परत करण्यात आले, भरलेले अर्ज फाडण्यात आले आणि संबंधितांना तेथून रवाना करण्यात आले.

दरम्यान, अनोळखी व्यक्ती किंवा संस्थेला आधारकार्ड अथवा वैयक्तिक कागदपत्रे देऊ नयेत, तसेच शासकीय योजनांची माहिती केवळ अधिकृत कार्यालयातूनच घ्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले.

सावंगी मेघे येथे जुगार अड्ड्यावर धाड; १४ जुगाऱ्यांना पकडले

वर्धा जनमाध्यम : सावंगी मेघे पोलिसांनी अवैध जुगाराविरोधात धडक कारवाई करत गिट्टीखदान, बोरगाव मेघे परिसरातील एका घरावर छापा टाकला. या कारवाईत १४ जणांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल आणि ताशाची पाने असा एकूण १ लाख ५९ हजार ९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाला गिट्टीखदान बोरगाव मेघे येथील टेकडी परिसरात विजय वासनीक याच्या घरी काही जण पैशांचा डाव लावून ताशावर जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सोमवारी रात्री १० ते ११ वाजताच्या सुमारास पोलिसांनी छापा टाकला. यावेळी विजय रामभाऊ वासनीक याच्यासह गणेश निकोडे, दिपेश सेवलानी, नितेश वनकर, अक्षय मेश्राम, आदित्य वासनीक, जुबेर खान, नरेश हडोळे, नदिम सयद, रितेश सुखदेवे, संजय आयलानी, विशाल मुन, सलमान पठाण आणि पंकज कैथवास यांना जुगार खेळताना पकडण्यात आले. कारवाईत २१ हजार ५४० रुपये रोख, १ लाख ३७ हजार ५०० रुपयांचे मोबाईल आणि ५२ ताशाची पाने जप्त करण्यात आली. याप्रकरणी सावंगी मेघे पोलिस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल संजय पंचभाई करीत आहेत.

जू वाहणाऱ्या बैलांच्या ऋणातून उतराई; पोळ्याच्या पूर्वसंध्येला खांद शेकणीची परंपरा

आज आवतन घ्या, उद्या जेवायला या म्हणत शेतकऱ्यांकडून मुक्या सवंगड्यांना मानाचा मुजरा

वर्धा जनमाध्यम : आधुनिक शेतीत यांत्रिकीकरणाचा बोलबाला वाढला असला तरी शेतकऱ्याच्या काळजात बैलाचे स्थान आजही अढळ आहे. वर्षभर शेताच्या मातीत राबणाऱ्या आणि खांद्यावर जू घेऊन शेतकऱ्याच्या कष्टात खांद्याला खांदा लावणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा पोळा हा ग्रामीण संस्कृतीतील जिवंत सोहळा आहे. गुरुवार, १० सप्टेंबर रोजी पोळा साजरा होणार असून त्याच्या आदल्या दिवशी बुधवार, ९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ग्रामीण भागात पारंपरिक खांद शेकणी केली जाणार आहे.

बैलांच्या खांद्याला तूप आणि हळद चोळून त्यानंतर पळसाच्या पानाचे देठ दिव्यावर धरून त्याची उष्णता खांद्याला दिली जाते. वर्षभर जू वाहताना बैलांच्या खांद्याला आलेला थकवा आणि वेदना दूर व्हाव्यात, या श्रद्धेतून ही प्रथा आजही जपली जाते. खांद शेकणी करताना शेतकरी 'आज आवतन घ्या, उद्या जेवायला या. एक नमन गौरा पार्वती, हर हर महादेव' अशी साद घालत बैलांना पोळ्याच्या जेवणाचे निमंत्रण देतात. मुक्या जीवाला कुटुंबातील सदस्याचा मान देणारी ही परंपरा ग्रामीण महाराष्ट्राच्या कृषी संस्कृतीचे वेगळेपण अधोरेखित करते.

पोळ्याच्या दिवशी बैलांना अंघोळ घालून त्यांना रंगरंगोटी, सजावट आणि गोंडे बांधून मिरवणुकीने पोळ्यात नेले जाते. शेतकरी आपल्या या कष्टकरी साथीदाराला गोडधोड खाऊ घालून त्याचा सन्मान करतो. विशेष म्हणजे अनेक शेतकरी आपल्या वर्षभराच्या कष्टात साथ देणाऱ्या सालगड्यालाही नवीन कपडे भेट देऊन सन्मानित करतात. त्यामुळे पोळा हा केवळ बैलपूजेचा दिवस नसून शेतकरी, बैल आणि शेतमजूर यांच्या कष्टांना सलाम करणारा ग्रामीण महाराष्ट्राचा अस्सल उत्सव ठरतो.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

प्राविण्यप्राप्त खेळाडूंच्या नोकर भरतीसाठी सुधारित आरक्षण धोरण

तीन महिन्यांत क्रीडा प्रमाणपत्राची वैधता पडताळणी बंधनकारक

मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५ऽ आरक्षणाबाबत सुसूत्रता व एकसंधता आणण्यासाठी सुधारित धोरण लागू करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या सुधारित धोरणानुसार आरक्षणासाठी पात्र खेळाडूंना तीन महिन्यांच्या मुदतीत क्रीडा प्रमाणपत्राची वैधता पडताळणी करून घेणे आवश्यक आहे.

क्रीडा क्षेत्रात जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर आपला ठसा ऊमटविणा-या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षिततेसाठी प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षणाबाबतचे सुधारित धोरण लागू करण्यात येत आहे. हे आरक्षण मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायती व महानगरपालिका, शासकीय ऊपक्रम, मंडळे, महामंडळे व विद्यापीठे, शासकीय अनुदानित शैक्षणिक संस्था, आश्रमशाळा व सहकारी संस्था (बँका, साखर कारखाने इ.), याशिवाय सहायक अनुदान मिळणा-या शासनमान्य स्वेच्छा संस्था यांच्यासह अन्य ज्या-ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालयांना राज्य शासनाकडून निधी अथवा अनुदान मिळते अशा सर्व प्रकारच्या संस्था, मंडळांच्या आस्थापनेवर गट-अ, ब, क आणि ड मधील सरळसेवेच्या पदांसाठी खेळाडूंना पाच टक्के समांतर आरक्षण लागू राहणार आहे. ऑलिम्पिक (समर) स्पर्धांमधील २००५ नंतर सलग तीन ऑलिम्पिक गेम्समध्ये समाविष्ट असलेले खेळ आणि स्थानिक खेळांना प्रोत्साहन देण्याकरिता कबड्डी, खो-खो, बुद्धीबळ, मल्लखांब व क्रिकेट हे देशी खेळ आरक्षणासाठी पात्र असतील. त्याचबरोबर पात्र खेळांची अट ऑलिम्पिक, पॅरालिम्पिक गेम्स, एशियन गेम्स, पॅरालिम्पिक एशियन गेम्स व कामनवेल्थ गेम्स या स्पर्धांना लागू राहणार नाही. ज्या-ज्या वर्षी ऑलिम्पिक, पॅरालिम्पिक गेम्स, एशियन गेम्स, पॅरालिम्पिक एशियन गेम्स व कामनवेल्थ गेम्स होतील त्या-त्या वर्षात या स्पर्धांमध्ये आयोजित होणारे खेळ आरक्षणासाठी पात्र राहतील.

मान्यताप्राप्त संघटनांमार्फत आयोजित होणा-या स्पर्धांसाठी वरिष्ठ, युवा व कनिष्ठ वयोगटातील खेळाडू आरक्षणासाठी पात्र असतील. शालेय (१९ वर्षाखालील वयोगट) व खेलो इंडिया क्रीडा स्पर्धांमधील युथ, युनिव्हर्सिटी आणि पॅरा गेम्समधील खेळ, अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धांमधील खेळ पात्र ठरतील.

या सुधारित धोरणात क्रीडा ई-प्रमाण स्वयंचलित डिजिटल कार्यप्रणालीमुळे लागू करण्यात येत आहे. यामुळे बोगस प्रमाणपत्रांना चाप बसणार आहे. या प्रणालीत स्पर्धा संपल्यानंतर ७ दिवसांच्या आत निकाल डिजिटल स्वाक्षरीने अपलोड करणे बंधनकारक होणार आहे. ब्लाकचेन तंत्रज्ञानामुळे डेटा कायमस्वरु पी जतन करण्यात येत असून त्यात कोणताही फेरफार करणे शक्य नसून ऑटोमेटेड क्रिप्टोग्राफिक हॅशद्वारे तत्काळ सत्यता पडताळणी होणार आहे.

नोकरीसाठी ५% आरक्षणाबाबत धोरणात सुसूत्रता व एकसंधता आणण्यासाठी यापूर्वीचे सर्व शासन निर्णय रद्द करण्यात आले असून एकत्रित सुधारित धोरणासंबंधीचा शासन निर्णय लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल. यापूर्वीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाकरिता पात्र होत असलेल्या खेळाडू ऊमेदवारांना देखील सुधारित शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये त्यांच्या क्रीडा प्रमाणपत्राची वैधता पडताळणी करून घेणे आवश्यक राहील.

गट अ पदासाठी अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, ऑलिम्पिक गेम्स, एशियन्स गेम्स, वरिष्ठ गटाच्या जागतिक चॅम्पियनशीप/कप, वरिष्ठ गटाच्या एशियन चॅम्पियनशीप/कप, कामनवेल्थ गेम्स, वरिष्ठ गटाच्या कामनवेल्थ चॅम्पियनशीप/कप, ग्रँडमास्टर (बुध्दीबळ), टेनिस ग्रॅन्डस्लॅम स्पर्धा तसेच पॅरालिम्पिक गेम्स, पॅरा एशियन गेम्स या क्रीडा स्पर्धांचा समावेश असून प्रथम, द्वितीय आणि तृतीय स्थान मिळवणारे खेळाडू पात्र असतील.

गट-ब (राजपत्रित) पदासाठी युवा/कनिष्ठ गटातील जागतिक चॅम्पियनशीप, एशियन चॅम्पियनशीप/कप, कामनवेल्थ चॅम्पियनशीप/कप, युथ ऑलिम्पिक /एशियन/कामनवेल्थ गेम्स, आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारे आयोजित जागतिक तसेच आशियाई शालेय क्रीडा स्पर्धा (फक्त १९ वर्षाखालील गट मुले/मुली), जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा, आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा (बुध्दीबळ), पॅरा जागतिक / एशियन / कामनवेल्थ चॅम्पियनशीप या स्पर्धांतील पदकप्राप्त खेळाडू पात्र असतील.

गट-ब पदासाठी (अराजपत्रित) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा/राष्ट्रीय फेडरेशन कप स्पर्धा (अधिकृत एकविध खेळ संघटनेमार्फत आयोजित वरिष्ठ / युथ / कनिष्ठ क्रीडा स्पर्धा), पॅरा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (पॅरा ऑलिम्पिक कमिटी द्वारा आयोजित), राष्ट्रीय शालेय खेळ महासंघाव्दारा आयोजित, राष्ट्रीय शालेय (१९ वर्षाखालील वयोगटाची) क्रीडा स्पर्धांतील पदकप्राप्त खेळाडू पात्र असतील.

गट-क पदासाठी खेलो इंडिया स्पर्धा (साईद्वारे आयोजित), अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा, राज्य स्तर वरिष्ठ / युथ / कनिष्ठ क्रीडा स्पर्धा (अधिकृत एकविध खेळ संघटनेमार्फत आयोजित), राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा (फक्त १९ वर्षाखालील गट मुले/मुली), राज्यस्तर आंतर विद्यापीठ स्पर्धा (अश्वमेध)/(क्रीडा महोत्सव) / पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धा आणि राज्यस्तर पॅरा ऑलिम्पिक व मान्यता प्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या राज्यस्तर पॅरा क्रीडा स्पर्धांतील पदकप्राप्त खेळाडू पात्र असतील.

गट-ड पदासाठी खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू अथवा वरिष्ठ गटातील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा/वरिष्ठ गटातील राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा, वरिष्ठ गटातील पॅरा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील खेळाडू पात्र असेल.

आरक्षणात या खेळांचा समावेश -धनुर्विद्या, अथलेटिक्स / मैदानी व धावण्याचे खेळ, बॅडमिंटन, बास्केटबाल, मुष्टियुद्ध, कॅनोइंग व कयाकिंग, क्रिकेट, सायकलिंग, तलवारबाजी, फुटबाल, जिम्नॅस्टिक्स / कसरतपटूंचे खेळ, हँडबाल, हाकी, ज्यूडो, कबड्डी, खो-खो, मल्लखांब, नौकानयन, रग्बी, नेमबाजी, जलतरण, टेबल टेनिस, तायक्वांदो, ट्रायथलान, व्ह?लीब?ल, आधुनिक पंचक्रीडा, वेटलिफ्टिंग / भारोत्तोलन, कुस्ती, स्केटबोर्डिंग, सर्फिंग, क्रीडा गिर्यारोहण, गोल्फ, बुद्धिबळ, अश्वारोहण, नौकानयन / सेलिंग, टेनिस.

(सार्वजनिक आरोग्य विभाग)

सार्वजनिक आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी 'प्रगती प्रकल्प'

राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी प्रगती प्रकल्प राबविण्यास झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

प्रगती (प्रायमरी हेल्थकेअर रिइमॅजिन्ड विथ अडव्हान्स गव्हर्नन्स अँड अस्सेसिब्स टेक्नालाजी इंटीग्रेशन) प्रगती प्रकल्पाची अंमलबजावणी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत केली जाणार आहे. या प्रकल्पाचा कालावधी २०२६ ते २०३१ असा असणार आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आशियाई विकास बँकेकडून कर्ज स्वरूपात आर्थिक सहाय्य घेण्यासही मान्यता देण्यात आली.

राज्यातील प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय स्तरावरील आरोग्य सेवा एकात्मिक स्वरू पात बळकट करण्यासाठी प्रगती आरोग्य सुधारणा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. यामुळे प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, वेळेवर व अचूक निदान, मानक ऊपचार, प्रभावी संदर्भ व्यवस्था, ऊपचार सातत्य, डिजिटल प्रशासन आणि आरोग्य व्यवस्थेची कार्यक्षमता यामध्ये लक्षणीय सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावरील खर्च कमी होउन सार्वत्रिक आरोग्य संरक्षणाच्या ऊद्दिष्टास चालना मिळणार आहे. हा प्रकल्प शाश्वत विकास ऊद्दिष्टे, सार्वत्रिक आरोग्य संरक्षण, आयुष्यमान भारत डिजिटल मिशन, राष्ट्रीय आरोग्य धोरण, जागतिक आरोग्य संघटनेची हेल्थ सिस्टीम फ्रेमवर्क यांच्याशी सुसंगत आहे. या प्रकल्पामुळे राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला प्रतिबंधात्मक, तंत्रज्ञानाधारित, नागरिक केंद्रे आणि परिणामाभिमूख स्वरूप प्रदान करण्यास ऊपयुक्त ठरणार आहे.

या प्रकल्पासाठी एकूण ४ हजार २५० कोटी रू पये खर्च अपेक्षित आहे. यापैकी आशियाई विकास बँकेकडून २ हजार ९७५ कोटी कर्ज स्वरू पात घेण्यासही मान्यता देण्यात आली आणि राज्याच्या हिश्श्यापोटी १ हजार २७५ कोटी रू पये अर्थसंकल्पात टप्प्याटप्याने ऊपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पासाठी महसुली व भांडवली लेखाशीर्ष करण्यासही मान्यता देण्यात आली. या प्रकल्पात कोल्हापूर आणि नांदेड येथे प्रत्येकी ५०० खाटांचे जिल्हा रू ग्णालय आणि नागपूर व लातूर येथे ३०० खाटांचे जिल्हा रू ग्णालय तसेच पुणे जिल्ह्यासाठी २०० खाटांचे विशेषोपचार संदर्भ सेवा रु ग्णालय सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. या रु ग्णालयांसाठी २ हजार ४३० पदे निर्माण करण्यास व त्यासाठीच्या वेतनावरील खर्च म्हणून वार्षिक १४७ कोटी ७ लाख रू पयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली. या प्रकल्पासाठी राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष तसेच आयुक्त आरोग्य सेवा यांच्या स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, खरेदी प्रक्रिया व्यवस्थापन व अंमलबजावणी कक्ष, डिजिटल आरोग्य अंमलबजावणी कक्ष आणि तांत्रिक प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्थापन करण्यात येणार आहे.

(वस्त्रोद्योग विभाग)

ह्योसंग इंडियाला भांडवली अनुदान देण्यास मंजुरी

ऑरिक सिटी शेंद्रा (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील ह्योसंग इंडिया प्रा.लि. यांना एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अंतर्गत विशेष बाब म्हणून भांडवली अनुदान देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

ह्योसंग इंडिया प्रा.लि. यांनी सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत इलेस्टोमेरिक यार्न्स (स्पॅन्डेक्स) निर्मितीचा प्रकल्प ऊभा केला आहे. या उद्योगाने या विभागात ऊभा केलेला हा पहिला प्रकल्प असल्यामुळे ५०० कोटीपेक्षा जास्त खर्चाच्या अनुषंगाने ५ टक्के आणि त्यापुढील ५०० कोटींपेक्षा अधिक गुंतवणुकीवर पुन्हा ५ टक्के अनुदान देण्याची विनंती केली आहे. त्यानुसार विदर्भ व मराठवाड्यात एक विशाल प्रकल्प म्हणून उद्योगाने केलेली गुंतवणूक व रोजगार निर्मिती लक्षात घेउन मंत्रिमंडळ ऊपसमितीने त्यांना एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अंतर्गत अनुदान देण्याची शिफारस केली आहे. या शिफारशीला अनुसरू न विशेष बाब म्हणून अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली.

(विधि व न्याय विभाग)

माढा येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय होणार

सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

ऊच्च न्यायालयाच्या न्यायालय स्थापना समितीने माढा तालुक्यासाठी माढा येथे जिल्हा व अतिरिक्त न्यायालय स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. सध्या या प्रस्तावित न्यायालयाची प्रकरणे बार्शी येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय येथे चालविण्यात येतात. या ठिकाणी सुमारे २ हजार ९८५ दिवाणी प्रकरणे त्यापैकी माढा येथील ३३४ प्रकरणे आहेत. तसेच बार्शी येथील ३ हजार २२४ फौजदारी प्रकरणांपैकी माढा येथील ७८८ प्रकरणे आहेत. ही सर्व प्रकरणे माढा येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात चालविण्यात येतील. त्यामुळे विधिज्ञांसह, अशिल नागरिक यांना दिलासा मिळणार आहे. या न्यायालयासाठी २० नियमित पदे व ६ बाह्य यंत्रणेद्वारे मनुष्यबळ ऊपलब्ध करून देण्यासाठी तसेच अनुषंगिक खर्चाच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली.

(महसूल विभाग)

मुंबईतील कैवल्यधाम ईश्वरदास चुन्नीलाल योगिक सेंटरच्या भाडेपट्ट्याचे सवलतीच्या दराने नुतनीकरणास मंजुरी

मुंबईतील भुलेश्वर येथील कैवल्यधाम ईश्वरदास चुन्नीलाल योगिक सेंटरच्या भाडेपट्ट्याचे सवलतीच्या दराने नूतनीकरणास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. कैवल्यधाम ईश्वरदास चुन्नीलाल योगिक सेंटर ही संस्था आरोग्यविषयक क्षेत्रात कार्यरत असून ती योग, प्राणायम, निसर्गोपचार, आयुर्वेद यांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि ऊपचार पुरवते. येथे वैज्ञानिक दृष्ट्या योग संशोधन, पदव्युत्तर डिप्लोमा अभ्यासक्रम आणि दैनंदिन योगसत्रे घेतली जातात. या संस्थेच्या जमिनीच्या भाडेपट्ट्याची मुदत संपल्याने पुढील ३० वर्षांसाठी वार्षिक १२ रू पये या दराने भाडेपट्टा नुतनीकरण करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आला. या संस्थेचे लोकहितार्थ कार्याची दखल घेत या प्रस्तावास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

(महसूल विभाग)

चेंबूर येथील भिक्खू संघ युनायटेड बुद्धिस्ट मिशन संस्थेला त्यांच्या वहिवाटीतील जमीन देण्यास मंजुरी

चेंबूर (ता.कुर्ला) येथील भिक्खू संघ युनायटेड बुद्धिस्ट मिशन संस्थेला त्यांच्या वहिवाटीतील १ हजार ७३५ चौ.मी. जमीन देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. संस्था सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कारणासाठी ही जमीन वापरत असून ती सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अंतर्गत नोंदणीकृत आहे. या संस्थेच्या वहिवाटीतील या जमिनीवर मुलांचे वसतिगृह, स्वयंपाकगृह तसेच काही भाग धार्मिक कार्यासाठी वापरात आणला जातो. संस्थेने ही जमीन नियमानुकूल करण्याबाबत कोकण विभागीय आयुक्त यांच्या माध्यमातून विनंती केली होती. त्यानुसार या संस्थेला भाडेपट्ट्यावर नाममात्र दराने ही जमीन देण्यास मान्यता देण्यात आली.

(महसूल विभाग)

कोराडीतील श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानाला शासकीय जमीन

नागपूर येथील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात विकसित करण्यात आलेल्या शासकीय जमिनी श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानला नाममात्र दराने भाडेतत्त्वावर देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.कोराडीतील या जमिनीवर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यानुसार बांधकामे करण्यात आली असून या सर्वांचे व्यवस्थापन श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान यांच्याकडून केले जाते. या ठिकाणी भाविकांना सोयी-सुविधा ऊपलब्ध करून देण्यासह स्वच्छता, वीज, पाणी, सुरक्षा आदी बाबींसाठी संस्थानला खर्च करावा लागतो. या जमिनी शासनाकडे असल्याने त्यावर होणारा खर्च संस्थेला ताळेबंदात दाखविणे अशक्य होते. यास्तव, संस्थानाने प्रभावी व नियोजनबध्द व्यवस्थापन तसेच देखभाल दुरू स्तीसाठी या जमिनी ३० वर्षांच्या कालावधीकरिता भाडेतत्त्वावर मिळाव्यात, अशी मागणी केली होती. त्यानुसार शासनाच्या प्रचलित वार्षिक भाडेपट्टा आकारणी तत्त्वानुसार या जमिनी देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

कूलरमध्ये पाणी भरताना मामा-भाचीचा; विजेच्या धक्क्याने मृत्यू

गोंदिया: घरातील कूलरमध्ये पाणी भरताना विद्युत प्रवाहाचा धक्का बसून मामा आणि भाचीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना मंगळवारी (८ सप्टेंबर) दुपारी तिरोडा तालुक्यातील गुमाधावडा येथे घडली.या घटनेत भाग्यवान हरीचंद बावणे आणि त्यांची भाची कु. सुप्रिया सुरेश सोनटक्के यांचा मृत्यू झाला. सुप्रिया ही गुमाधावडा येथील जिल्हा परिषद ऊच्च प्राथमिक शाळेतील इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी होती. या घटनेने गावावर शोककळा पसरली आहे.तिरोडा पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी दीडच्या सुमारास सुप्रिया आणि तिचे मामा भाग्यवान बावणे हे घरातील कूलरमध्ये पाणी भरत होते. वेळी कूलरच्या लोखंडी भागामध्ये विद्युत प्रवाह आल्याने दोघांना विजेचा धक्का बसला. घटनेत दोघांचाही घटनास्थळीच मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत परिस्थिती हाताबाहेर गेली होती. तिरोडा पोलिसांनी पंचनामा केला. घटनेमागील नेमके कारण आणि विद्युतप्रवाह कूलरमध्ये कसा आला, याबाबत तपास सुरू आहे. सुप्रिया ही गुमाधावडा येथील जि. प. ऊच्च प्राथमिक शाळेत इयत्ता पाचवीत शिकत होती. घटनेच्या दिवशी ती शाळेत ऊपस्थित नव्हती. तिच्या निधनाची माहिती मिळताच मुख्याध्यापक संतोष ठाकरे यांनी पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिका-यांना लेखी कळविले. विद्यार्थिनीच्या आकस्मिक निधनाने शाळा परिवारातही हळहळ व्यक्त होत असून, शिक्षक व विद्यार्थ्यांनी कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या. ऐन सणासुदीच्या काळात घडलेल्या या दुर्घटनेने कुटुंबीयांवर दुःखाचा आघात झाला आहे. घरातील विद्युत ऊपकरणे हाताळताना सुरक्षिततेची काळजी घेण्याची गरज या घटनेने पुन्हा स्पष्ट केली आहे.

'शेख हसीना बांगलादेशात परतल्या की थेट फाशीच

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना भारतातून परत आणण्यासाठी ढाका सरकारने पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेतला आहे. 'भारताने संबंध सुधारायचे असतील तर शेख हसीना यांना त्वरित बांगलादेशकडून प्रत्यार्पित करावे,' अशी थेट अट बांगलादेश सरकारचे माहिती सल्लागार जाहेद ऊर रहमान यांनी ठेवली आहे. तसेच, बांगलादेशात हसीना यांची 'फाशीची शिक्षा' वाट पाहत असून, परत येताच त्यांना शिक्षेला सामोरे जावे लागेल आणि त्यांना पुनर्विचाराची कोणतीही संधी मिळणार नाही, असा दावाही त्यांनी केला आहे.ढाका येथील सचिवालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत जाहेद ऊर रहमान यांनी स्पष्ट केले की, सरकार हसीना यांच्या स्वतःहून परत येण्याची वाट पाहणार नसून त्यांना कायदेशीर प्रक्रियेद्वारे आणि 'कॅप्चर' करून देशात परत आणण्याच्या तयारीत आहे. हसीना यांची शिक्षेविरोधात अपिल करण्याची मुदत संपल्याचे त्यांनी जाहीर केले. हसीना यांच्या प्रत्यार्पणाच्या मागणीचा वापर भारत सरकारवर दबाव आणण्यासाठी केला जात असल्याचा आरोप फेटाळून लावताना रहमान म्हणाले, 'काही लोक असा अंदाज लावत आहेत की सरकार केवळ दबावाचे तंत्र वापरत आहे, पण हे पूर्णपणे चुकीचे आहे. आम्ही हा मुद्दा थेट भारत सरकारसमोर एक स्पष्ट अट म्हणून ठेवला असून यावर भारताने गांभीर्याने विचार करण्याचे आवाहन केले आहे. भारताने शेख हसीना यांना परत पाठवून द्विपक्षीय संबंध सुधारण्याच्या दिशेने तत्काळ पाउल ऊचलावे.' बांगलादेशच्या 'द डेली स्टार' या वृत्तपत्राचा आणि इंटरनॅशनल क्राईम्स ट्रिब्युनलच्या मुख्य सरकारी वकिलांचा दाखला देत जाहेद ऊर रहमान यांनी सांगितले, 'शेख हसीना या आरोपी, फरार आणि मृत्युदंडाची शिक्षा झालेल्या गुन्हेगार आहेत.

सदावर्ते गाढविणीचे दूध पितात-रोहित पवार

नागपूर/प्रतिनिधी : ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी शुक्रवारी जोरदार टीका केली. सदावर्ते हे ऊमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शूटर असल्याचा आरोप करताना पवार यांनी त्यांच्या वक्तव्यशैलीवरही आक्षेप घेतला. नवीन कपडे आणि वेगवेगळ्या रंगांचे ग?गल घालून फिरणारे सदावर्ते गाढविणीचे दूध पितात. त्यामुळे त्याचा त्यांच्या डोक्यावर काय परिणाम होत आहे, हे पाहूनच त्यांची लायकी लक्षात येते, अशा शब्दांत पवार यांनी सदावर्ते यांच्यावर टीका केली. सदावर्ते हे देवेंद्र फडणवीस यांच्या जवळचे असून, त्यांच्यामार्फत राजकीय आरोप-प्रत्यारोप केले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.मोठ्या नेत्यांनी स्वतःहून बोलण्यापेक्षा अशा शूटरना पुढे करून बातम्या होत राहतील, याची काळजी घेतली जाते. सदावर्ते बोलतात म्हणजे फडणवीस बोलतात, असे राजकीयदृष्ट्या म्हणता येईल, असा दावाही पवार यांनी केला. सरकार आणि मनोज जरांगे यांच्यातील विषयातही सदावर्ते यांची भूमिका असल्याचे ते म्हणाले.माझी सुरक्षा खासगी, सरकारी नाही.आपल्या सुरक्षेवरून होत असलेल्या टीकेलाही पवार यांनी प्रत्युत्तर दिले. सामान्य जनतेचा पैसा मी सुरक्षेसाठी वापरत

नाही. माझ्यासोबत असलेली सुरक्षा ही माझ्या सहका-यांची आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. मोठमोठे नेते मोठ्या प्रमाणावर पोलीस सुरक्षा घेत असल्याने नागरिकांच्या सेवेसाठी पोलीस ऊपलब्ध राहत नसल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे आपण खासगी सुरक्षा सोबत ठेवली असल्याचे पवार म्हणाले. सरकारने आपले काम करावे आणि आपण जनतेचे प्रश्न समजून घेउन त्यासाठी आंदोलन करत राहू, असेही त्यांनी स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वडोदरा येथील कार्यक्रमाच्या अनुषंगाने पवार यांनी भाजपवर निशाणा साधला. कार्यक्रमासाठी तिकीट किंवा नोंदणीच्या माध्यमातून नागरिकांचा डेटा गोळा करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. हा डेटा भाजपच्या हाती गेल्यानंतर त्याचा राजकीय वापर केला जाउ शकतो, असा दावाही त्यांनी केला. युवकांना आकर्षित करण्यासाठी नवनवीन पद्धती वापरण्याऐवजी नेत्यांनी थेट जनतेत जावे. अशा ऊपक्रमांमुळे जेन झी पिढी फारशी प्रभावित होईल, असे वाटत नसल्याचे पवार म्हणाले.

राष्ट्रपतींचा कार्यक्रम गुजरातला का ?- राष्ट्रपती प्रमुख असलेल्या पुरस्कार सोहळ्याचा प्रोटोकाल राष्ट्रपतींचा असतो. त्यामुळे असा कार्यक्रम राष्ट्रपती भवनात होणे अपेक्षित असताना तो गुजरातला नेला जात असल्याची टीका पवार यांनी केली. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर देशात भाजपचे सरकार येणार नसल्याची जाणीव त्यांच्या नेत्यांना झाली आहे. त्यामुळे गुजरातमध्ये अधिकाधिक कार्यक्रम आयोजित केले जात असल्याचा दावा त्यांनी केला. गुजरातला प्राधान्य देण्याच्या या धोरणात बदल झाल्याशिवाय राहणार नाही, असेही पवार म्हणाले.

राज्यात 70 टक्के सोयाबीन ऊध्द्वस्त

मुंबई/प्रतिनिधी : राज्यात गेल्या ३० ते ३५ दिवसांपासून पावसाने ओढ दिल्याने सोयाबीनसह इतर खरीप पिके पूर्णपणे करपून गेली आहेत. जवळपास ७० टक्के सोयाबीन पीक नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याने बळिराजा मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.राज्यात पावसाने ओढ दिल्याने सोयाबीनसह खरीप पिकांवर संकट आले आहे. सोयाबीन, मूग, उडीद, मका, बाजरी, तूर खरीप पिके करपून गेली आहेत. तर मराठवाड्यातील पाणीसाठा पिण्यासाठी राखून ठेवा असा आदेश विभागीय आयुक्तांनी दिला आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, राज्यातील सोयाबीन ऊत्पादक शेतकरी सध्या अत्यंत गंभीर संकटात सापडला असून, जवळपास ७० टक्के सोयाबीनचे पीक नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे हजारो शेतक-यांचे आर्थिक गणित कोलमडून ते पुन्हा कर्जबाजारी होण्याची भीती आहे. शेतक-यांना या संकटातून वाचवण्यासाठी सरकारने युद्धपातळीवर ऊाययोजना कराव्यात, असे आवाहन त्यांनी केले.एमपीएससी परीक्षांमधील गैरप्रकारांवर बोलताना वडेट्टीवार यांनी सत्ताधा-यांवर निशाणा साधला. एमपीएससी अध्यक्ष स्वच्छ असल्याचे सांगत आहेत. पण त्यांच्या काळात परीक्षा वारंवार रद्द झाल्या आहेत, त्याची जबाबदारी कोणाची आहे? केवळ मी स्वच्छ आहे असे सांगून प्रश्न सुटणार नाही, जेव्हा पेपर फुटले त्यासाठी जे जबाबदार होते त्यांच्यावरही कारवाई करावी, असे वडेट्टीवार म्हणाले.ते पुढे म्हणाले की, एमपीएससीच्या परीक्षांना भ्रष्ट स्वरू प देण्याचे काम सत्ताधा-यांनी केले असून, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ सुरू आहे. पुण्यात विद्यार्थ्यांचा झालेला आक्रोश हाच या परिस्थितीचा पुरावा आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांपासून सरकार पळू शकत नाही.अहेरीतील कोसनपल्ली गावातील शेतक-यांचा प्रश्न गंभीर आहे. येथील शेतक-यांना जमिनीचे पट्टे मिळाले आहेत. मात्र गावाची डिजिटल नोंद ऊपलब्ध नसल्यामुळे सातबारा उत्ता-यावर मालकी हक्काची नोंद होत नाही. या प्रश्नासाठी शेतकरी आंदोलन करत आहेत. या प्रकरणी संबंधित अधिका-यांशी चर्चा केली असून, हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. कोणत्याही परिस्थितीत कोसनपल्लीतील शेतक-यांना त्यांच्या जमिनीचा सातबारा आणि कायदेशीर मालकी हक्क मिळालाच पाहिजे यासाठी सातत्याने पाठपुरावा करत राहणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शालेय आणि अंगणवाडी स्तरावर बालकांना पोषण आहार मिळावा यासाठी शासन कोट्यवधींचा निधी खर्च करते. मात्र, कुकरच्या तब्बल १० ते १२ शिट्ट्या करूनही वाटाणा कच्चाच राहत असल्याने हा वाटाणा आहे की दगड? असा संतापजनक सवाल आता ऊपस्थित केला जात आहे. पनवेल परिसरातील एकूण २७२ पैकी ११४ अंगणवाड्यांची पर्यवेक्षकांनी नुकतीच पाहणी केली.

विजय वडेट्टीवार यांनी सोशल मीडियावर एक पोस्टही केली आहे. त्यात ते म्हणतात, गरीब चिमुकल्यांच्या ताटात पोषण आहाराच्या नावाखाली निकृष्ट दर्जाचे वाटाणे देण्याचे पाप हे सरकार करत आहे. कमिशनखोरीसाठी एवढ्या खालच्या थराला जाणा-या सरकारमधल्या मंत्री आणि अधिका-यांना थोडी तरी लाज वाटली पाहिजे.

100 दिवसांत 22 जणांना फाशीची शिक्षा

'मी मरण पत्करेन, पण.... न्यायाधीश रवी कुमार दिवाकर माफियांच्या धमक्यांमुळे पुन्हा चर्चेत

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : माफिया, बाहुबली किंवा गुन्हेगारांच्या दबावापुढे झुकण्यापेक्षा आणि भ्याड न्यायमूर्ती म्हणवून घेण्यापेक्षा मी मरण पत्करेन, अशा अत्य

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

पर्जन्यतुटीचे परिणाम

मान्सूनचे आगमन, त्याने व्यापलेला प्रदेश आणि चार महिन्यांतील एकूण पाऊस यावर भारतीय शेतीचे भवितव्य ठरवले जात असे; पण आता एकूण पाऊस किती पडला यापेक्षा तो कधी, कुठे पडला, दोन पावसांमध्ये किती मोठा खंड होता आणि त्याचे समान वितरण झाले का ही बाब अधिक महत्त्वाची ठरत आहे. यंदाच्या मान्सूनने महाराष्ट्राला हाच धडा दिला. जुलैअखेर राज्यात पाऊस सरासरीपेक्षा ६ टक्के अधिक होता. ऑगस्टमध्ये चित्र पालटले आणि या महिन्यात सरासरीपेक्षा तब्बल ४६ टक्के कमी पाऊस झाला. ३१ ऑगस्टपर्यंत संपूर्ण हंगामातील तूट १२ टक्क्यांवर पोहोचली. राज्यातील १७ जिल्हे २० ते ५९ टक्के तुटीच्या वर्गात गेले. देशभरातील स्थिती फार वेगळी नाही. जूनमध्ये कमकुवत सुरुवातीनंतर १४ जुलैपर्यंत देशात सरासरीपेक्षा २१ टक्के कमी पाऊस झाला.ऑगस्टमध्ये पुन्हा १६ टक्क्यांहून अधिक तूट पडली. ४ सप्टेंबरपर्यंत देशातील पर्जन्यतूट सुमारे १३ टक्के होती. एप्रिलमध्ये मान्सून सुमारे ९२ टक्के राहण्याची शक्यता व्यक्त केली होती. त्यामागे 'अल निनो'चा धोका नमूद केला होता. तो आता दृश्यरूपाने समोर आला आहे. महाराष्ट्रात कोकण आणि घाटमाथ्यावरील पावसाचे आकडे राज्याची सरासरी सावरतात; पण मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रातील कोरडवाहू पट्ट्याचे वास्तव त्यातून दिसत नाही. ३१ ऑगस्टपर्यंत कोकण-गोवा उपविभागात ८ टक्के तूट होती, तर मराठवाड्यात ती ३० टक्के होती. ऑगस्टच्या उत्तरार्धात विदर्भातील तूटही तीव्र झाली. लातूरमध्ये पर्जन्यतूट ४०.५ टक्के, तर परभणीत ३२.२ टक्के होती. मराठवाड्यातील ११ मोठ्या प्रकल्पांमध्ये त्यावेळी ६९.०६ टक्के पाणीसाठा होता. सप्टेंबरमध्ये पावसात खंड पडल्यास संकटाची तीव्रता वाढणार आहे. महाराष्ट्रात ३१ ऑगस्टपर्यंत खरिपाची पेरणी १.३६ कोटी हेक्टरवर झाली. हे प्रमाण ९५.१ टक्के आहे. गतवर्षी १.४२ कोटी हेक्टर क्षेत्र पेरणीखाली होते. कापसाचे क्षेत्र ३८.३७ लाख हेक्टरवर स्थिर असले, तरी ते पाच वर्षांच्या सरासरीपेक्षा १० टक्के कमी आहे. मका, डाळींचे क्षेत्रही घटले. पेरणी होणे आणि पीक हातात येणे भिन्न गोष्टी आहेत.पेरणीनंतर उगवण, फुलोरा, शेंगा किंवा बोंडे भरण्याच्या अवस्थेत पुरेसा ओलावा नसेल तर उत्पादन घटते. महाराष्ट्राच्या खरीप अर्थकारणातील सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका या पिकांना पावसातील दीर्घ खंडाचा मोठा फटका बसतो. सुरुवातीचा पाऊस पेरणी करवून घेतो आणि नंतर दडी मारतो तेव्हा नुकसान अधिक होते. बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी, ट्रॅक्टर, पेरणीचा खर्च झालेला असतो. पीक वाचवण्यासाठी पुन्हा खर्च होतो. विहिरी, शेततळ्यांत पाणी असले तरी वीज किंवा डिझेलचा खर्च वाढतो. पण, पाणीच नसेल तर करपत जाणारी पीके पाहावी लागतात. यामुळे यंदाचे संकट प्रतिहेक्टरी उत्पादन किती घटते, या निकषावर मोजायला हवे. अपुऱ्या पावसाचा पहिला आघात शेतकऱ्याच्या उत्पन्नावर होतो आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला झळ बसते. ग्रामीण अर्थकारणाचे चक्र कृषी उत्पन्नावर फिरते. हंगाम चांगला गेला तर दुचाकी, ट्रॅक्टर, कृषी अवजारे, बांधकाम साहित्य, कपडे, घरगुती वस्तू यांची खरेदी वाढते; पण उत्पन्नच जमा झाले नाही तर शेतकरी प्रत्येक खर्च पुढे ढकलतो. आर्थिक उलाढालीवर नकारात्मक परिणाम जाणवतात.विदर्भ आणि मराठवाड्यात पर्जन्यतूट आणि कर्जफेडीची अडचण यांचा परस्परसंबंध राज्यस्तरीय बँकर्स समितीनेही नोंदवला. येथील सिंचन कार्यक्षमता सुमारे १४ टक्के असून राज्याची सरासरी २३ टक्के असल्याचे समितीची नोंद आहे. वारंवार नुकसानीमुळे कर्ज परतफेडीची क्षमता उरत नाही. पुढील कर्ज मिळण्याची क्षमताही कमी होते. अशावेळी शेतकरी सावकार किंवा महागड्या खासगी कर्जाकडे वळण्याचा धोका वाढतो. पीक कर्जाची मुदत वाढवणे, पुनर्गठन किंवा कर्जमाफी या उपायांनी तात्कालिक दिलासा मिळतो; पण पाण्याची अनिश्चितता कायम असेल तर काही वर्षांनी तोच प्रश्न नव्या कर्जाच्या रूपाने परत येतो. पेरणी, फवारणी, काढणीचा रोजगार कमी होऊन भूमिहीन शेतमजूर अडचणीत येतो. चाऱ्याचा प्रश्न उभा राहतो. या दुष्टचक्रातून स्थलांतर सुरू होते. मराठवाडा आणि विदर्भातून अन्य शहरांकडे होणारे हंगामी स्थलांतर हे एक मोठे आव्हानच बनले आहे. मुलांचे शिक्षण विस्कळीत होते, महिलांवर घर व्यवस्थापनाचा भार वाढतो, वृद्ध गावात मागे राहतात. हा समग्र विचार केल्यास संकटाचे गहिरेपण लक्षात येते.सप्टेंबरअखेरीस मान्सून माघारीस सुरुवात होते. जमिनीत ओलावा कमी राहिल्यास गहू, हरभरा, मोहरी या रब्बी पिकांच्या पेरणीवर परिणाम होतो. सोयाबीन, भुईमूग, कडधान्ये, ऊस आणि कापूस यांचे उत्पादन घटल्यास खाद्यतेल, डाळी, साखर किंवा कापूस आयातीची गरज वाढते. महागाई दर कमी न झाल्यास आरबीआयला व्याज दरवाढ करावी लागू शकते. या संकटाला उत्तर देताना टँकर, चारा छावण्या, पीक विमा, मदतीचे पंचनामे आवश्यक आहेत; पण ते दुष्काळ व्यवस्थापनाचे अंतिम उत्तर नाही. दुष्काळाकडे पाणी आणि शेतीच्या रचनेचा प्रश्न म्हणून पाहण्याची गरज आहे. प्रत्येक तालुक्याचा जलआढावा ही त्याची सुरुवात असायला हवी. किती पाऊस पडतो, किती पाणी वाहून जाते, किती जमिनीत मुरते, भूजलाचा उपसा किती आणि उपलब्धतेच्या तुलनेत कोणती पिके किती पाणी वापरतात, याचा तपशीलवार हिशेब ग्रामपंचायत आणि तालुका पातळीपर्यंत झाला पाहिजे. त्यानुसार पिकांचे धोरण ठरवले पाहिजे.पाणलोट क्षेत्र विकास, समतल चर, लहान बंधारे, नाला पुनरुज्जीवन, शेततळी, भूजल पुनर्भरणाचे नियोजन सूक्ष्म पाणलोट क्षेत्राच्या आधारावर करावे लागेल. पुढील ३ ते ५ वर्षे जलवैज्ञानिक परीक्षण केले पाहिजे. किती खर्च झाला यापेक्षा भूजल पातळी किती वाढली आणि किती अतिरिक्त क्षेत्राला संरक्षित सिंचन मिळाले, हे यशाचे मोजमाप असायला हवे. कमी पावसाच्या पट्ट्यात कमी पाण्यावर तग धरणारी पिके घेणे, हे तत्त्वतः योग्य असेलही; पण शेतकरी अधिक पाण्याचे पीक घेत असेल तर दोष त्याचा नाही; बाजारभाव, हमी दराने खरेदी, प्रक्रिया उद्योग, कर्जव्यवस्था त्याला त्या पिकाकडे नेते. त्यामुळे बाजाराचे धोरण बदलावे लागेल. बारमाही सिंचन शक्य नसले तरी पिकाच्या निर्णायक अवस्थेत १ किंवा २ वेळा पाणी दिले तरी उत्पादनात घट टाळता येते. ठिबक आणि तुषार सिंचनासाठी अनुदान देऊन थांबण्याऐवजी देखभाल, प्रत्यक्ष कार्यक्षमता, सामुदायिक वापर यांची व्यवस्था उभी करावी लागेल. पीक विम्यातही पावसाच्या बदलत्या पॅटर्नचा विचार करावा लागेल. नुकसान निश्चितीसाठी महिनोन्महिने पंचनाम्यांची प्रतीक्षा कालबाह्य ठरते. पावसाच्या पारंपरिक सरासरीवर उभी असलेली कृषी व्यवस्था नव्या हवामानात सुरक्षित राहणार नाही. टँकर सुरू झाल्यानंतर दुष्काळाची नोंद घेणारी व्यवस्था अपुरी आहे. ती बदलून पावसात खंड दिसू लागताच पीक, पाणी, चारा, कर्ज आणि रोजगार यांचे निर्णय घेणारी यंत्रणा उभी करावी लागेल. येणारा काळ त्यादृष्टीने शासन-प्रशासनाची परीक्षा पाहणारा ठरणार आहे.

७.८% की २.६% ? जीडीपीच्या आकड्यांपलीकडील भारताच्या अर्थव्यवस्थेची खरी स्थिती

सध्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या वर्तुळात आणि राजकीय व्यासपीठांवर एका आकड्यावरून मोठी चर्चा चालू आहे. भारत खरोखरच ७.८% वेगाने प्रगती करतोय का, की तो विकास फक्त २.६% ते २.८% वर येऊन थांबला आहे? वरून पाहिल्यावर हा फक्त एका टक्केवारीचा वाद वाटतो. तरीही, या वादामुळे देशाची आर्थिक प्रतिमा, परकीय गुंतवणूक आणि धोरण करणारे निर्णय थेट बदलतात. हा वाद समजताना एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी. अर्थव्यवस्था ७.८% वेगाने वाढते आहे, याचा अर्थ प्रत्येक भारतीयाचे उत्पन्न ७.८% वेगाने वाढते आहे, असा होत नाही. हीच सांख्यिकी वस्तुस्थिती आणि सामान्य लोकांच्या आयुष्यातील फरक समजून घ्यायचा असेल, तर आपल्याला आकडे बाजूला ठेवून पाहावे लागेल.

माजी अर्थसचिव सुभाषचंद्र गर्ग आणि काही आर्थिक विश्लेषक म्हणतात की, सरकारने जुन्या आधारभूत वर्षाच्या आकड्यांशी थेट तुलना केली, तर भारताचा चालू किमतींनुसार विकासदर फक्त २.६% ते २.८% इतका येतो. या तांत्रिक गोंधळाचे कारण असे आहे की, त्यांनी नव्या सिरीजमधील २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीचा नॉमिनल जीडीपी ८८.२७ लाख कोटी घेतला आणि त्याची तुलना जुन्या सिरीजमधील मागील वर्षाच्या ८६.०५ लाख कोटी या आकड्याशी केली. पण सांख्यिकीशास्त्रानुसार, दोन वेगवेगळ्या आधारभूत वर्षांचे आकडे थेट जोडणे तांत्रिकदृष्ट्या बरोबर नसते. जेव्हा बेस इयर बदलतो, तेव्हा जुन्या वर्षांच्या डेटाचेही नव्या पद्धतीनुसार पुन्हा गणना करावी लागते. केंद्रीय सांख्यिकी मंत्रालयाने जीडीपी मोजणीचे आधारभूत वर्ष २०११-१२ वरून बदलून २०२२-२३ केले आहे. जेव्हा सरकारने नव्या पद्धतीनुसार मागील वर्षाच्या जीडीपीचे पुन्हा गणित केले, तेव्हा तो आकडा खाली येऊन ८०.४४ लाख कोटी झाला.

समान बेस इयरनुसार मोजल्यास चालू वर्षाचा नॉमिनल जीडीपी ८८.२७ लाख कोटी आहे. रिअल जीडीपी ८१.३६ लाख कोटी आहे. त्यामुळे भारताचा नॉमिनल विकासदर १०.३% येतो. महागाई कमी केल्यावर वास्तविक विकासदर ७.८% येतो. त्यामुळे २.६% हा अधिकृत विकासदर म्हणणे सांख्यिकीच्या दृष्टीने चूक ठरते. नव्या सिरीजमध्ये डबल डिफ्लेशन पद्धत वापरली आहे. जीएसटी आणि एमसीए-२१ सारख्या डिजिटल डेटा स्रोतांचा वापर केला आहे. डेंटन बेंचमार्किंग पद्धत लागू केली आहे. त्यामुळे हे तांत्रिक बदल झाले आहेत. नॉमिनल वाढ १०.३% आणि रिअल वाढ ७.८% असल्यामुळे यातला इम्प्लिसिट जीडीपी deflator सुमारे २.३% येतो. हा दर थेट ग्राहक महागाई दर नाही. यात गुंतवणूक, सरकारी खर्च, निर्यात आणि देशांतर्गत उत्पादन यांचा समावेश असतो. त्यामुळे प्रश्न '७.८% चुकीचा आहे का?' असा न राहता 'वापरलेले deflators किती पारदर्शक आहेत?' असा खरा प्रश्न बनतो.



सध्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या वर्तुळात आणि राजकीय व्यासपीठांवर एका आकड्यावरून मोठी चर्चा चालू आहे. भारत खरोखरच ७.८% वेगाने प्रगती करतोय का, की तो विकास फक्त २.६%ते २.८%वर येऊन थांबला आहे? वरून पाहिल्यावर हा फक्त एका टक्केवारीचा वाद वाटतो. तरीही, या वादामुळे देशाची आर्थिक प्रतिमा, परकीय गुंतवणूक आणि धोरण करणारे निर्णय थेट बदलतात. हा वाद समजताना एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी. अर्थव्यवस्था ७.८% वेगाने वाढते आहे, याचा अर्थ प्रत्येक भारतीयाचे उत्पन्न ७.८%वेगाने वाढते आहे, असा होत नाही. हीच सांख्यिकी वस्तुस्थिती आणि सामान्य लोकांच्या आयुष्यातील फरक समजून घ्यायचा असेल, तर आपल्याला आकडे बाजूला ठेवून पाहावे लागेल.

इथेच अर्थतज्ज्ञांची खरी चिंता सुरू होते. रघुराम राजन यांसारख्या विश्लेषकांच्या मते, प्रश्न जीडीपी आकड्याच्या वैधतेचा नाही. तो ग्रोथ पॅराडॉक्सचा आहे. जर भारताचा विकासदर ७.८% आहे, तर देशांतर्गत खासगी गुंतवणूक आणि परकीय गुंतवणूक अपेक्षेप्रमाणे वेगाने का वाढत नाही? कॉर्पोरेट नफा वाढतो आहे. तरीही ग्रामीण भागात उपभोग खर्च आणि चांगल्या रोजगारांची निर्मिती अपेक्षेप्रमाणे दिसत नाही. जीडीपी दाखवतो की एका कालावधीत देशात निर्माण झालेल्या वस्तू आणि सेवांचे मूल्य किती वाढले. पण तो थेट रोजगाराची गुणवत्ता, संपत्तीचे वितरण, ग्रामीण कुटुंबांची आर्थिक स्थिती आणि वास्तविक वेतन सांगत नाही. त्यामुळे जीडीपी हा अर्थव्यवस्थेचा थर्मामीटर आहे. तो संपूर्ण आरोग्य अहवाल नाही. एका जीडीपी आकड्याने संपूर्ण अर्थव्यवस्थेचा निकाल देणे म्हणजे क्रिकेट सामन्याचा निकाल फक्त एका खेळाडूच्या स्ट्राइक रेटवर ठरवण्यासारखे आहे.

समतोल साधताना सरकारच्या जमेच्या बाजूकडेही पाहावे लागते. जागतिक स्तरावर ऊर्जा संकट आणि अनिश्चितता असतानाही भारताने ७.८ टक्के विकासदर राखला आहे. सरकारने पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च वाढवला आहे. कॉर्पोरेट कर कपात, बँकिंग क्षेत्रातील एनपीए कमी होणे आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा यामुळे औपचारिक अर्थव्यवस्थेला मदत मिळाली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या ताज्या आकडेवारीनुसार, भारताचा नॉमिनल जीडीपी सुमारे ३८७ लाख कोटी रुपये आहे. भारत सध्या जगातील सहावी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. अमेरिका, चीन, जर्मनी, जपान आणि ब्रिटन या देशांनंतर भारताचा क्रमांक लागतो. भारत चौथ्या किंवा पाचव्या क्रमांकावरून सहाव्या क्रमांकावर गेल्याचे कारण चलन दरातील घसरण आणि डेटा पुनर्गणनेचे तांत्रिक निकष आहेत. पण आपण पर्चेसिंग पॉवर पॅरिटीने पाहिले, तर भारत मजबूत स्थितीत तिसऱ्या क्रमांकावर आहे.

भारताची अर्थव्यवस्था मोठी आहे. तरी, आपल्या प्रचंड लोकसंख्येमुळे चित्र वेगळे दिसते. भारताचा दरडोई जीडीपी फक्त सुमारे २,८१३ डॉलर आहे. या आकड्यानुसार भारत जगात १४० पेक्षा जास्त देशांच्या मागे आहे. यातून हे स्पष्ट होते की जागतिक क्रमवारीत सहावा क्रमांक मिळाला तरी, भारतीय नागरिक जगातील सहाव्या क्रमांकाचा श्रीमंत नागरिक ठरत नाही. पुढील काळात प्रत्येक नागरिकाचे उत्पन्न वाढवणे हेच सर्वात मोठे आव्हान राहील.

वरील सर्व विश्लेषणावरून हे स्पष्ट होते की, २.६% हा आकडा दोन वेगळ्या सांख्यिकी मालिका एकत्र केल्यामुळे निर्माण झालेला तांत्रिक गोंधळ आहे. अधिकृतपणे भारताची अर्थव्यवस्था ७.८% नेच वाढत आहे. ही आकडेवारी कर संकलन, पतपुरवठा आणि कॉर्पोरेट नफा या प्रत्यक्ष घटकांशी जुळते. पण, खरा प्रश्न हा नाही की हा आकडा खोटा आहे का. खरा मुद्दा असा आहे की ही वाढ किती मोठ्या प्रमाणावर आहे आणि ती तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचते का. भारताची अर्थव्यवस्था वाढत आहे, हा वस्तुस्थितीवर आधारित निष्कर्ष नाकारण्याचे काहीच कारण नाही. ७.८% हा एकाच नव्या सांख्यिकी मालिकेवर आधारित अधिकृत आणि वास्तविक जीडीपी वाढीचा दर आहे. मात्र, या तांत्रिक स्पष्टीकरणामुळे आर्थिक प्रश्न संपत नाहीत. उलट, खरे प्रश्न तेव्हाच सुरू होतात. या वाढीतून किती चांगल्या दर्जाचे रोजगार निर्माण झाले? खरे उत्पन्न किती वाढले? ग्रामीण आणि शहरी उपभोगात काय बदल झाला?

भारताच्या जीडीपी वाढीचा योग्य निष्कर्ष २.६% बरोबर आहे की ७.८% बरोबर, असा नसावा. ७.८% वाढ किती विश्वासार्ह, व्यापक आणि सर्वसमावेशक आहे, असा प्रश्न विचारायला हवा. कारण शेवटी, जीडीपीचा आकडा मोठा असणे ही आर्थिक शक्तीची सुरुवात होते. त्या वाढीचे रूपांतर नागरिकांच्या उत्पन्नात, रोजगारात आणि जीवनमानात होते का, हाच तिचा खरा कस लागतो.

राहूल इंगळे पाटील
मोबाईल
९८९०५७७१२८

'घटं भिन्द्यात् पटं छिन्द्यात् कुर्याद् रासभरोहणम्। येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत् ?'

प्रसिद्धीसाठी माणूस कोणत्याही थराला जाऊ शकतो, असा या सुभाषिताचा आशय. आजच्या समाजमाध्यमांच्या युगात त्याला फक्त 'व्हायरल होणे' असे आधुनिक नामाभिधान द्यावे लागेल! सध्या बापटांची पुणेरी शैली महाराष्ट्रभर चर्चेत आहे.त्यांच्या विधानांवर वैचारिक द्वंद्व सुरू आहे; कुणाला उपरोध भावतो, कुणाला टोमणा झोंबतो, तर कुणी त्यावर प्रतिटोमणा करतो. समाजमाध्यमांना मात्र चर्चेचे नवे खाद्य मिळाले आहे.

या सगळ्या गदारोळात एक बाब विशेष आनंद देणारी आहे.बापटांच्या भाषेमुळे मराठी पुन्हा कानावर पडत आहे. नेमके शब्द, वक्रोक्ती, मिश्कील उपहास, पुणेरी कोपरखळी आणि प्रसंगी बोचणारा विनोद ऐकताना जाणवते की आपली मराठी किती रसाळ, प्रगल्भ आणि अभिव्यक्तिसंपन्न आहे.

आजची पिढी 'हाय, हेलो, ब्रो, काय सीन?' अशा भाषिक सरमिसळीत रमली आहे.दोन वाक्यांत मराठी, हिंदी आणि इंग्रजीची अशी खिचडी होते की व्याकरणालाही स्वतःची ओळख पटवण्यासाठी गुगलची मदत घ्यावी लागावी! अशा वेळी बापटांचा एखादा अस्सल मराठी शब्द कानावर पडतो आणि हीच पिढी त्याचा अर्थ गुगलवर शोधू लागते.हीच खरी गंमत आणि त्याहून मोठा आनंद!

ज्या शब्दांना आपण व्यवहारातून हद्दपार केले,तेच शब्द पुन्हा कुतूहलाचा विषय होत आहेत. एखाद्याच्या विचारांशी सहमत-असहमत असणे हा स्वतंत्र विषय; पण त्याच्या भाषेमुळे एखाद्याला शब्दकोश उघडावासा वाटत असेल,तर त्या निमित्ताचे स्वागतच केले पाहिजे.कारण भाषा केवळ संवादाचे साधन नाही; ती संस्कृतीची स्मृती, विचारांची धार आणि अस्मितेची ओळख असते.

वादात कोण जिंकले, कोण हरले हे उद्या विसरले जाईल;पण एखादा अस्सल मराठी शब्द नव्या पिढीच्या शब्दभांडारात गेला, तर ती कायमची कमाई! विचारांवर मतभेद असू द्या; भाषेवर प्रेम अबाधित राहू द्या. कारण टोमणे क्षणभंगुर असतात, वाद विस्मरणात जातात; पण एखादा सुंदर मराठी शब्द मनात रुजला, तर तो पिढ्यान्पिढ्या टिकतो.

बापटांच्या पुणेरी फटकाऱ्यांतून जर मराठीची ही गोड, खुमासदार आणि अभिजात चव पुन्हा नव्या पिढीच्या जिभेवर आली असेल, तर हा केवळ बापटांचा विषय राहात नाही.तो मराठीचा उत्सव ठरतो. आणि म्हणूनच, या सगळ्या वैचारिक कल्लोळात मराठीचा एक शब्द जरी जिंकला, तरी म्हणावे..बाकी काहीही होवो, 'पुणे तिथे काय उणे!'

ॲड.धनंजय देशमुख

हवामान बदलाचा नवीन चेहरा

सप्टेंबरमधील पाऊस कमी राहिला, तर त्याचा परिणाम केवळ उभ्या खरीप पिकावर होणार नाही. जमिनीतील ओलावा कमी झाल्याने रब्बी हंगामातील पेरणीची शक्यता, पाण्याची उपलब्धता आणि जनावरांच्या चाऱ्याची परिस्थिती यावरही परिणाम होऊ शकतो.

पूर्वार्ध

काही भागांत अतिवृष्टी, तर काही भागांत पावसाचा खंड - या टोकाच्या हवामानामुळे महाराष्ट्राच्या शेतीसमोर 'पाऊस किती?' पेक्षा 'पाऊस कधी, कुठे आणि किती काळ?' हा अधिक मूलभूत प्रश्न उभा राहिला आहे. राज्याच्या शेतीचे भवितव्य आज पुन्हा एकदा आभाळाकडे लागले आहे. मात्र, यंदाची परिस्थिती पारंपरिक दुष्काळाच्या चौकटीत बसणारी नाही. एका बाजूला कोकण, नाशिक, पुणे, सातारा यांसारख्या काही भागांत सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे, तर दुसरीकडे मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत पावसाने ओढ दिली आहे. परिणामी राज्याच्या एकूण पर्जन्यमानाची सरासरी आणि प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या शेतातील परिस्थिती यांच्यात मोठी दरी निर्माण झाली आहे. उपलब्ध राज्यस्तरीय आकडेवारीनुसार ३१ ऑगस्ट अखेर राज्यात सुमारे १ कोटी ३६ लाख ५६ हजार हेक्टरवर खरीप पेरणी झाली आहे. हे क्षेत्र गेल्या पाच वर्षांच्या सरासरी खरीप क्षेत्राच्या सुमारे ९५ टक्के आहे. म्हणजेच सरासरीच्या तुलनेत जवळपास आठ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झालेली नाही. मागील वर्षी याच कालावधीत सुमारे १ कोटी ४२ लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर पेरणी झाली होती. त्यामुळे यंदाची घट केवळ आकडेवारीतील चढ-उतार नसून, पावसाच्या अनिश्चिततेमुळे घेतलेल्या शेतकऱ्यांच्या सावध भूमिकेचे प्रतिबिंब आहे.

सप्टेंबरची चिंता अधिक गंभीर

यंदाच्या परिस्थितीचे गांभीर्य समजून घेण्यासाठी राज्याची सरासरी पुरेशी नाही. पुणे विभागात पेरणी सरासरीच्या आसपास किंवा त्यापेक्षा अधिक झाली असताना, अमरावती आणि नागपूर विभागात पेरणी मागे आहे. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत पावसातील खंडाचा परिणाम अधिक जाणवतो. त्यामुळे महाराष्ट्रात 'पेरणी ९५ टक्के झाली' असे म्हणणे आणि 'शेती सुरक्षित आहे', असे मानणे यात मोठा फरक आहे. पर्जन्यमानाच्या बाबतीतही अशीच विषमता आहे. काही जिल्ह्यांत सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला; तर सोलापूर, हिंगोली, बीड, अमरावती, नंदुरबार, जालना, अकोला, नागपूर, परभणी, चंद्रपूर, धाराशिव, अहिल्यानगर, वाशीम, नांदेड, लातूर, यवतमाळ आदी भागांत पावसाची तूट किंवा दीर्घ खंड जाणवला. म्हणूनच यंदाच्या संकटाचे योग्य वर्णन 'पावसाची राज्यव्यापी कमतरता' पेक्षा 'पावसाचे असमान वितरण आणि दीर्घ कोरडे खंड', असे करणे अधिक उचित ठरेल.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या आकडेवारीतूनही राज्याची नैसर्गिक असमानता स्पष्ट होते. राज्याचे भौगोलिक क्षेत्र ३०८ लाख हेक्टर असून लागवडीखालील क्षेत्र सुमारे २२५ लाख हेक्टर आहे. त्यापैकी सुमारे ४० टक्के क्षेत्र दुष्काळप्रवण आहे. राज्यात वार्षिक पर्जन्यमान सुमारे ४०० ते ६,००० मिमीपर्यंत बदलते आणि त्यातील बहुतांश पाऊस जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत पडतो. हीच महाराष्ट्राच्या शेतीची मूलभूत विसंगती आहे. पाणी काही भागांत मुबलक, तर गरज असलेल्या भागात अपुरे; पाऊस काही दिवसांत अतिवृष्टीच्या रूपात, तर पिकाच्या महत्त्वाच्या अवस्थेत प्रदीर्घ खंडाच्या रूपात. दुष्काळ म्हणजे पाऊस कमी पडणे, पारंपरिक समज आता अपुरी ठरत आहे. एखाद्या भागात हंगामाच्या अखेरीस सरासरीएवढा पाऊस पडला, तरी पिकाच्या वाढीच्या निर्णायक अवस्थेत १५-२० दिवस पाऊस नसेल तर शेतकऱ्यासाठी परिस्थिती दुष्काळसदृशच असते. याचे कारण पीक पावसाच्या एकूण प्रमाणावर नव्हे, तर पावसाच्या वेळेवर आणि मृआर्द्रतेवर अधिक अवलंबून असते. कापूस, सोयाबीन, तूर, मका यांसारख्या खरीप पिकांसाठी पावसातील खंडाची वेळ अत्यंत महत्त्वाची आहे. याच कारणामुळे केंद्राच्या दुष्काळनिश्चितीच्या चौकटीत केवळ पाऊस नव्हे, तर पेरणीचे क्षेत्र, वनस्पती निर्देशांक, मुद्आर्द्रता आणि पाणी उपलब्धता यांसारख्या सूचकांचा विचार केला जातो. किमान तीन प्रतिकूल सूचक एकत्र आल्यास कृषी दुष्काळाची तीव्रता अधिक स्पष्ट होते. म्हणून आज महाराष्ट्राला 'पर्जन्यमान मोजणाऱ्या प्रशासनापेक्षा' पिकांचा ताण मोजणारे प्रशासन अधिक आवश्यक आहे.

यंदाच्या परिस्थितीत सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आता सप्टेंबरच्या पावसाचा आहे. भारतीय हवामान विभागाने ३१ ऑगस्टला दिलेल्या अंदाजानुसार ऑगस्टमध्ये देशभरातील पाऊस सामान्यापेक्षा १६ टक्क्यांनी कमी राहिला असून, सप्टेंबरमध्येही पाऊस सामान्यापेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. याचा अर्थ महाराष्ट्रात तातडीने दुष्काळ जाहीर करावा, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. मात्र, दुष्काळाची पूर्वतयारी सुरू करण्यास यापेक्षा योग्य वेळ कोणती? हा प्रश्न प्रशासनाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. कारण सप्टेंबरमधील पाऊस कमी राहिला, तर त्याचा परिणाम केवळ उभ्या खरीप पिकावर होणार नाही. जमिनीतील ओलावा कमी झाल्याने रब्बी हंगामातील पेरणीची शक्यता, पाण्याची उपलब्धता आणि जनावरांच्या चाऱ्याची परिस्थिती यावरही परिणाम होऊ शकतो.

कृषी धोरणातही हवा बदल

यंदाच्या परिस्थितीला केवळ 'एक वर्षाचा पावसाचा लहरीपणा' म्हणून दुर्लक्षित करणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे एकाच राज्यात काही ठिकाणी पूर आणि काही ठिकाणी दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होणे आता अपवाद राहिलेले नाही. आर्थिक सर्वेक्षण २०२५-२६ नेही अनियमित हवामान, वाढते तापमान आणि हवामानातील टोकाच्या घटनांचा कृषी उत्पादनावर होणारा परिणाम अधोरेखित केला आहे. त्यासाठी प्रदेशनिहाय कृषी धोरण, सूक्ष्म सिंचन, हवामान-सहिष्णू वाण आणि पीकविविधीकरणाला प्राधान्य देण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे.

महाराष्ट्राच्या दुष्काळाच्या इतिहासात १९७२ हे वर्ष महत्त्वाचे वळण ठरले. त्या काळात पर्जन्यमानातील मोठी तूट, अन्नटंचाई, रोजगाराचा अभाव आणि ग्रामीण स्थलांतर यामुळे राज्याला प्रचंड संकटाचा सामना करावा लागला. त्या अनुभवातून रोजगार हमी, जलसंधारण, सिंचनविस्तार आणि दुष्काळनिवारणाच्या विविध धोरणांना चालना मिळाली. मात्र गेल्या पाच दशकांत महाराष्ट्राची जलव्यवस्था विस्तारली असली, तरी शेतीची पावसावरील असुरक्षितता पूर्णतः संपलेली नाही. भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या माहितीनुसार राज्यातील लागवडीखालील क्षेत्र सुमारे १.७४ कोटी हेक्टर असून सिंचनाखालील क्षेत्र सुमारे १७ टक्के आहे. म्हणजेच मोठा कृषी भूभाग अजूनही पावसावर अवलंबून आहे. म्हणून धरणे, कालवे आणि सिंचन प्रकल्प वाढवणे आवश्यक असले तरी ते एकमेव उत्तर नाही. पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे आणि उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब अधिक कार्यक्षमतेने वापरणे हे तितकेच महत्त्वाचे आहे.

सत्यसाई पी.एम.
७२४८९९२३२३

बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ उमरखेड बंदला प्रतिसाद!

सर्वपक्षीयांचा मुख्याधिकाऱ्यांना इशारा, अवैध बांधकामांना मूकसंमती व नागरिकांशी अरेरावीचा आरोप..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. ८ : पुसद नगरपरिषदेच्या बांधकाम तथा नगररचना विभागातील सहाय्यक रचनाकार कार्तिक पुजारी यांच्यावर तात्काळ कारवाई करून त्यांची हकालपट्टी करावी, अशी मागणी विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. याबाबत मुख्याधिकारी डॉ. किरण सुकलवाड यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात कार्तिक पुजारी नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून अरेरावीची भाषा वापरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. शहरातील विनापरवाना व अवैध बांधकाम विरोधात नगरपरिषदे कडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असतानाही त्यांची योग्य चौकशी होत नसल्याचा दावा निवेदनकर्त्यांनी केला आहे. तसेच काही बांधकामधारक व ले-आऊट धारकांना नियमबाह्य कामांसाठी सहकार्य केले जात असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. पुसद खंड-१ मधील काही ले-आऊटमध्ये नगररचना नियम व अटींचे पालन न करता नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नसल्याच्या तक्रारी असून, त्यावरही कारवाई होत नसल्याचे निवेदनात नमूद आहे. नागरिकांशी उद्धट वर्तन आणि कथित अनियमिततेमुळे प्रशासनाची प्रतिमा मलिन होत असल्याचा आरोप करत पुजारी यांच्यावर नगरपरिषद अधिनियमांतर्गत तातडीने कारवाई करावी, अन्यथा नगरपरिषदे समोर आंदोलन व उपोषण छेडण्यात येईल, असा इशारा सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. निवेदनावर विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

पावसाने २८ दिवस मारली दाडी, शेतकऱ्यांच्या पिकावर कोरडवाहुचे संकट..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ८ : जिल्ह्यात तब्बल २८ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खरीप हंगाम धोक्यात आला असून, शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर उभे पीक करपू लागले आहे. कर्ज काढून कापूस, सोयाबीनसह इतर खरीप पिकांची लागवड केलेल्या शेतकऱ्यांसमोर आता उत्पादन खर्चही निघेल की नाही, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान, पुसद तालुक्यातील काटखेडा येथील शेतकरी अनिल मधुकर जाधव यांचा मंगळवारी सकाळी हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याने शेतकरी संकटाचे गांभीर्य पुन्हा अधोरेखित झाले आहे.

अनिल जाधव यांच्याकडे अडीच एकर शेती होती. यंदा त्यांनी कर्जबाजारी परिस्थितीत कापूस व सोयाबीनची लागवड केली होती. त्यांच्यावर युनियन बँक ऑफ इंडिया आणि कोकण बँकेचे मिळून सुमारे दोन लाख रुपयांचे कर्ज असल्याची माहिती आहे. मात्र, पावसाने पाठ फिरवल्याने पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी जमीन तडकली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत्यूपूर्वी अनिल जाधव यांनी दिवसभर शेतात फिरून पिकांची पाहणी केली होती. करपणारी पिके, वाढता उत्पादन खर्च आणि डोक्यावरचे कर्ज यामुळे ते चिंतेत होते. पत्नी, दोन मुले व वृद्ध आईचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण आणि कर्जफेडीची चिंता त्यांच्या मनावर होती. या पार्श्वभूमीवर त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांचे निधन झाले.

काटखेड्यातील शेतकरी अनिल जाधव यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

पिके करपत आहेत, शेतकऱ्यांच्या आशाही मावळत आहेत

पावसाच्या दीर्घ खंडामुळे जिल्ह्यातील अनेक भागांत कापूस व सोयाबीन संकटात आले आहे. शेतकरी रोज आकाशाकडे डोळे लावून बसला आहे; मात्र पाऊस हुलकावणी देत असल्याने आर्थिक संकट अधिक गडद होत आहे. सरकारने आता केवळ आश्वासनांवर न थांबता तातडीने शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचावे, अशी मागणी शेतकरी नेते मनीष जाधव यांनी केली आहे. पीक नुकसानीचे तातडीने पंचनामे, शेतकऱ्यांना आर्थिक मदत, कर्जवसुलीला स्थगिती आणि परिस्थितीची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी त्यांनी केली. करपणाऱ्या पिकांसोबत शेतकऱ्यांच्या आशाही करपत असताना शासन आणखी किती दिवस हातावर हात ठेवून बसणार? असा संतप्त सवाल आता जिल्ह्यातील शेतकरी उपस्थित करीत आहेत.

थोडक्यात

माळकीन्ही येथे सव्वा लाख शिवलिंग निर्मिती व रुद्राभिषेक सोहळा उत्साहात

महागाव: माळकिन्ही , ता. महागाव, जि. यवतमाळ : दत्त मंदिर,

माळकिन्ही येथे सदगुरु शिवलिंग व्यंकट स्वामी महाराज यांच्या दिनांक ०६/०९/२०२६ रोज रविवारला संकल्पनेतून सव्वा लाख शिवलिंग निर्मिती, रुद्राभिषेक व विधिवत पूजाअर्चना तसेच महाप्रसादाचा भव्य धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. या धार्मिक सोहळ्यात शिवलिंग निर्मितीसाठी असंख्य महिला भाविक भक्तांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. महिलांच्या सहभागामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. महागाव येथील महिला भाविक भक्तांना या पवित्र सोहळ्यात सहभागी होता यावे यासाठी सौ. जयश्री संजय नरवाडे (नगरसेविका, न.प. महागाव तथा तालुकाध्यक्ष, महिला काँग्रेस कमिटी, महागाव) यांचेकडून माळकिन्ही येथे जाण्या-येण्यासाठी पाच मोफत ट्रॅव्हल्सची व्यवस्था करण्यात आली होती. या माध्यमातून महागाव परिसरातील अनेक महिला भाविकांना सोहळ्यात सहभागी होण्याची संधी मिळाली. सदगुरु शिवलिंग व्यंकट स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या धार्मिक सोहळ्याने भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, उपस्थित भाविकांनी या अविस्मरणीय सोहळ्याचा मनोभावे लाभ घेतला.

खापरी येथील आश्रम शाळेत शिक्षक दिन उत्साहात साजरा

खापरी : जिजाऊ माध्यमिक उच्च माध्यमिक आश्रम शाळा खापरी येथे ५ सप्टेंबर शिक्षक दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून संपूर्ण देशात साजरा करण्यात येते. शिक्षक दिनानिमित्त खापरी येथील विद्यार्थ्यांनी आपल्या सर्व शिक्षकांना सन्मानित केले व आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांनी शिक्षकांना काही भेट वस्तू दिल्या. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या कार्याविषयी आणि आपल्या जीवनात शिक्षक किती महत्त्वाचा आहे या विषयी मनोगत व्यक्त केले गुरुविना प्रगती नाही असे मत विद्यार्थ्यांनी मांडले शाळेचे मुख्याध्यापक श्री विजय राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बारावीचा विद्यार्थी कृष्णा काळे यांनी केले तर आभार विध्यार्थीनी तेजस्विनी नागरीकर व वर्ग बारावीच्या विद्यार्थ्यांनी मानले कार्यक्रमा करिता शाळेचे संपूर्ण कर्मचारीआणि विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गुरुकुल कॉन्व्हेंट विद्यालयात शिक्षक दिन व कृष्णजन्माष्टमी उत्साहात

झरी : गुरुकुल कॉन्व्हेंट विद्यालय, मुकूटबन येथे शिक्षक दिन व श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.
प्री-प्रायमरी विभागातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या बालरूपातील आकर्षक वेशभूषा करून कार्यक्रमाची शोभा वाढविली. तसेच विद्यार्थ्यांनी गीत, नृत्य आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून श्रीकृष्णाच्या जीवनातील प्रसंग प्रभावीपणे सादर केले. शिक्षक दिनानिमित्त भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत विविध उपक्रम सादर केले.कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. यावेळी मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक विलास चिदुलवार म्हणाले, "शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचे शिल्पकार आहेत, तर श्रीकृष्णाचे जीवन आपल्याला प्रेम, मैत्री आणि कर्तव्याचा संदेश देते."
कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण विद्यालयात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

मंगलमूर्ती नगरातील खड्डा ठरला 'मृत्यूचा सापळा' दोन दुचाकींची धडक, इसम बेशुद्ध

पुसद-बोरगडी मार्गावर प्रशासनाचे दुर्लक्ष, रस्ता दुरुस्त करण्याची नागरिकांची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. ८ : पुसद शहरातील वसंतराव नाईक चौक ते स्टेट बँक चौक, बोरगडी रोडमार्गे पुसद-उमरखेड-नांदेड राज्य मार्गाला जोडणाऱ्या रस्त्याची दुरवस्था वाहनचालकांसाठी जीवघेणी ठरत आहे.

मंगलमूर्ती नगरजवळ रस्त्याच्या मधोमध पडलेल्या मोठ्या खड्ड्यामुळे दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन एक दुचाकीस्वार गंभीररीत्या जखमी होऊन जागीच बेशुद्ध पडल्याची घटना रविवारी (६ सप्टेंबर) दुपारी सुमारे ४ वाजता घडली. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेत जखमी इसमाला उपचारासाठी दवाखान्यात पोहोचविले. नागरिकांच्या सतर्कतेमुळे त्याचे प्राण वाचले. मात्र, या घटनेने प्रशासनाच्या रस्ता देखभाल व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्टेट बँक चौक ते बोरगडी मार्गावर ठिकठिकाणी मोठमोठे आणि खोल खड्डे पडले आहेत. या मार्गावर एसटी बसेससह मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे. विशेषतः मंगलमूर्ती नगर, माणिनगर, नवीन पुसद तसेच बोरगडीकडे जाणाऱ्या मार्गावर वाहनचालकांना खड्डे चुकविताना मोठी कसरत करावी लागत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या दोन वर्षांपासून या मार्गाची अशीच दुरवस्था असून अनेक किरकोळ अपघात घडले आहेत. रस्ता मंजूर झाल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात काम सुरू नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. 'एखादा निष्पाप जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?' असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला असून, मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी खड्डेमय रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून कायमस्वरूपी रस्ता बांधावा, अशी आग्रही मागणी होत आहे.

बेरोजगारांना शासकीय नोकरीचे आमिष देत तब्बल ६९ लाख रुपयांची फसवणूक

तोतया न्यायाधीश व पत्नी ग्रामसेवक दाम्पत्य फरार!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

राळेगाव, दि. ८ : राळेगाव पंचायत समितीअंतर्गत आष्टोणा ग्रामपंचायतीच्या तत्कालीन ग्रामसेविका आरती ज्ञानेश्वर वडुले आणि त्यांचे पती मारोती किसन मुलुक यांच्यावर सुशिक्षित बेरोजगारांना शासकीय नोकरीचे आमिष दाखवून तब्बल ६९ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

याप्रकरणी वडकी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होऊन १० ते १२ दिवस उलटले, तरी आरोपी दाम्पत्य पोलिसांच्या हाती लागलेले नसल्याने त्यांच्या अटकेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, रिधोरा येथील दिपक पंढरीनाथ पवार आणि वाघोली, हिंगणघाट येथील सौरभ राजेश भुते यांना नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून मोठी रक्कम घेतल्याचा आरोप आहे. मारोती मुलुक यांनी स्वतःची न्यायाधीश म्हणून ओळख सांगत औरंगाबाद येथील उच्च न्यायालयात ओळख असल्याचे भासवून क्लर्क पदावर नोकरी लावून देण्याचे आश्वासन दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. ग्रामसेविका पदावर कार्यरत असल्याने आरती वडुले यांच्यावर विश्वास ठेवून बेरोजगारांनी पैसे दिल्याचा आरोप आहे. ग्रामपंचायतीच्या कारभारावरून वाद निर्माण झाल्यानंतर त्यांच्याकडील ग्रामपंचायतीचा कारभार काढून पंचायत समितीत नियुक्ती करण्यात आल्याची माहिती आहे. या प्रकरणात सध्या दोघांनी तक्रार दाखल केली असली तरी आणखी काही बेरोजगारांची फसवणूक झाली आहे का, याबाबत चर्चा सुरू आहे. त्यामुळे पोलिस तपासातून फसवणुकीची खरी व्याप्ती समोर येण्याची शक्यता आहे. फरार आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करणे आणि संपूर्ण आर्थिक व्यवहाराची चौकशी करणे, हे आता वडकी पोलिसांसमोरचे प्रमुख आव्हान ठरले आहे.

डीजेच्या दणदणाटाला महागाव पोलिसांचा लगाम!

गणेशोत्सवात पारंपरिक वाद्यांनाच प्राधान्य..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

महागाव, दि. ८ : आगामी गणेशोत्सव तसेच दुर्गोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी महागाव पोलिसांनी कंबर कसली आहे. उत्सवाच्या नावाखाली डीजेच्या कर्णकर्कश आवाजाने ध्वनिप्रदूषण करणाऱ्यांना बगल देत ढोल, ताशा, लेझीम यांसारख्या पारंपरिक वाद्यांच्या गजरात उत्सव साजरे करण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांनी केले आहे.

वृद्ध नागरिक, बालके तसेच सर्वसामान्यांना ध्वनिप्रदूषणाचा त्रास होऊ नये, यासाठी उत्सव मंडळांनी सामाजिक भान राखावे, असे पोलिसांनी स्पष्ट केले. महागाव, फुलसांगवी, सवना, हिवरा यासह तालुक्यातील विविध गावांमध्ये उत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांच्या बैठका घेऊन पोलिसांनी नियम व सूचनांची माहिती दिली. मिरवणूक, कार्यक्रम आणि विसर्जनावेळी मोठ्या आवाजातील डीजे अथवा ध्वनिप्रदूषण करणाऱ्या साधनांचा वापर टाळावा. कोणत्याही कार्यक्रमासाठी किंवा मिरवणुकीसाठी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असून, मिरवणुकीचा मार्ग, वेळ, ध्वनिक्षेपकाचा वापर तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. गणेशोत्सव व दुर्गोत्सव हे सामाजिक एकोपा आणि बंधुभाव वाढविणारे सण असल्याने धार्मिक उत्साहासोबत सामाजिक बांधिलकीही जपावी, असे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांचा स्पष्ट इशारा : नियम मोडाल तर कारवाई अटळ

कायदा व सुव्यवस्थेचा भंग करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. उत्सव मंडळांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून पोलिसांना सहकार्य करावे. अफवांवर विश्वास न ठेवता संशयास्पद बाब आढळल्यास तात्काळ पोलिसांच्या निदर्शनास आणून द्यावी.

— सेवानंद वानखडे, पोलीस निरीक्षक, महागाव पोलीस ठाणे

पुसद न.प.तील सहाय्यक रचनाकारावर कारवाईची मागणी..!

सर्वपक्षीयांचा मुख्याधिकाऱ्यांना इशारा, अवैध बांधकामांना मूकसंमती व नागरिकांशी अरेरावीचा आरोप..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. ८ : पुसद नगरपरिषदेच्या बांधकाम तथा नगररचना विभागातील सहाय्यक रचनाकार कार्तिक पुजारी यांच्यावर तात्काळ कारवाई करून त्यांची हकालपट्टी करावी, अशी मागणी विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. याबाबत मुख्याधिकारी डॉ. किरण सुकलवाड यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात कार्तिक पुजारी नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून अरेरावीची भाषा वापरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. शहरातील विनापरवाना व अवैध बांधकाम विरोधात नगरपरिषदे कडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असतानाही त्यांची योग्य चौकशी होत नसल्याचा दावा निवेदनकर्त्यांनी केला आहे. तसेच काही बांधकामधारक व ले-आऊट धारकांना नियमबाह्य कामांसाठी सहकार्य केले जात असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. पुसद खंड-१ मधील काही ले-आऊटमध्ये नगररचना नियम व अटींचे पालन न करता नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नसल्याच्या तक्रारी असून, त्यावरही कारवाई होत नसल्याचे निवेदनात नमूद आहे.नागरिकांशी उद्धट वर्तन आणि कथित अनियमिततेमुळे प्रशासनाची प्रतिमा मलिन होत असल्याचा आरोप करत पुजारी यांच्यावर नगरपरिषद अधिनियमांतर्गत तातडीने कारवाई करावी, अन्यथा नगरपरिषदे समोर आंदोलन व उपोषण छेडण्यात येईल, असा इशारा सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. निवेदनावर विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

बोगस पत्रकारितेला लगाम घाला, अनधिकृत पोर्टल-चॅनेलची पडताळणी करा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ८ : जिल्ह्यात अनधिकृत न्यूज पोर्टल, युट्यूब चॅनेल आणि 'पीडीएफ' वर्तमानपत्रांच्या माध्यमातून पत्रकारितेच्या नावाचा गैरवापर वाढल्याचा आरोप करत अशा माध्यमांची सखोल पडताळणी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी दिग्रस व यवतमाळ येथील पत्रकारांनी केली आहे.

यवतमाळ जिल्हा श्रमिक पत्रकार संघाच्या नेतृत्वाखाली पत्रकारांच्या शिष्टमंडळाने मंगळवारी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक व जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड यांना निवेदन दिले. डिजिटल माध्यम सहज उपलब्ध झाल्याने कोणतेही अधिकृत अधिष्ठान नसताना स्वतःला पत्रकार अथवा संपादक म्हणवून घेण्याचे प्रकार वाढले आहेत. काही जण पत्रकारितेच्या नावाखाली अधिकारी-कर्मचारी, राजकीय पदाधिकारी आणि सामान्य नागरिकांवर दबाव आणत असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला. संबंधित माध्यमाचे मालक, संपादक, प्रकाशक तसेच प्रतिनिधींचे अधिकृत नियुक्तीपत्र तपासावे, अशी मागणी करण्यात आली. मात्र, केवळ तक्रारीच्या आधारे कोणालाही दोषी न ठरवता वस्तुनिष्ठ चौकशी करावी, असेही पत्रकारांनी स्पष्ट केले.अनधिकृत माध्यमांची पडताळणी करून योग्य ती कारवाई केली जाईल,असे जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड यांनी सांगितले. यावेळी अभय इंगळे, रामदास पद्मावार यांच्यासह यवतमाळ व दिग्रसचे पत्रकार उपस्थित होते.

महिला सक्षमीकरणाच्या नावाखाली कोट्यवधींचा चुराडा?

अधिकारी बदलला, हिशेब कुणाचा? ई-रिक्षा, हार्वेस्टर, कृषी केंद्रांसह प्रकल्पांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ८ : महिला सक्षमीकरणाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून उभारण्यात आलेले प्रकल्प आज धूळ खात पडले असतील, यंत्रसामग्री वापराविना असेल आणि महिलांच्या हाताला अपेक्षित रोजगार मिळत नसेल, तर या निधीचा नेमका उपयोग कुठे झाला, असा सवाल उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

विशेष म्हणजे, संबंधित काळातील निर्णय प्रक्रियेशी निगडित एक अधिकारी आता 'अंबानगरी' अमरावती येथे कार्यरत असल्याची चर्चा असून, अधिकारी बदलला म्हणून जुन्या निर्णयांची जबाबदारी संपते का? असा थेट प्रश्न उपस्थित केला जात आहे. महिला आर्थिक विकास मंडळाच्या माध्यमातून बचत गट, कृषीपूरक व्यवसाय, ई-रिक्षा, हार्वेस्टर, कृषी केंद्रे, विविध यंत्रसामग्री आणि रोजगारनिर्मिती प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्यात आला. उद्घाटनावेळी मोठमोठे दावे झाले; मात्र काही वर्षांनी अनेक प्रकल्पांची प्रत्यक्ष स्थिती काय आहे, याचे मूल्यमापन झाले का, हा खरा प्रश्न आहे. ई-रिक्षांचा लाभ नेमका किती महिलांना? त्यांची खरेदी कोणत्या प्रक्रियेतून झाली? पुरवठादार कोण? दर किती? लाभार्थी निवडीचे निकष काय? आज त्या ई-रिक्षा कुठे आहेत आणि त्यातून किती उत्पन्न मिळत आहे? या प्रश्नांची उत्तरे कागदोपत्री नव्हे, तर सार्वजनिक झाली पाहिजेत. त्याचप्रमाणे हार्वेस्टर, कृषी केंद्रे आणि महागडी यंत्रसामग्रीचा हिशेबही तपासण्याची गरज आहे. कोणत्या बचत गटाला किती निधी मिळाला, यंत्रांचा प्रत्यक्ष वापर किती झाला, महिलांना किती उत्पन्न मिळाले आणि सध्या त्यांची अवस्था काय आहे, याचे स्वतंत्र लेखापरीक्षण झाले पाहिजे. महिला सक्षमीकरणाचा निधी केवळ उद्घाटने, मेळावे आणि मोठ्या कार्यक्रमांपुरता मर्यादित राहिला नाही ना, याचीही चौकशी आवश्यक आहे. वाहतूक, भोजन, साहित्य, मनुष्यबळ आणि कार्यक्रमांवरील खर्चाचा तपशील सार्वजनिक करण्याची मागणी होत आहे.उद्घाटनाच्या वेळी टाळ्यांचा कडकडाट आणि काही वर्षांनी प्रकल्पाला कुलूप, अशी अवस्था असेल तर जबाबदारी निश्चित होणार कधी? त्यामुळे मागील काही वर्षांतील ई-रिक्षा, हार्वेस्टर, कृषी केंद्रे, यंत्रसामग्री, निविदा, देयके आणि कार्यक्रम खर्चाचे स्वतंत्र विशेष लेखापरीक्षण करावे, अशी मागणी जोर धरत आहे. महिला आर्थिक विकास मंडळाने जिल्ह्यातील एकूण निधी, प्रकल्पांची संख्या, सुरू-बंद प्रकल्प आणि प्रत्यक्ष लाभार्थी महिलांची माहिती जाहीर करून श्वेतपत्रिका काढावी, अशीही मागणी आहे. अधिकारी बदलला म्हणून जबाबदारी बदलत नाही; फाईली बदलत नाहीत आणि जनतेच्या पैशांचा हिशेबही बदलत नाही. त्यामुळे अंबानगरीत गेलेल्या संबंधित अधिकाऱ्याच्या यवतमाळ कार्यकाळातील निर्णयांची चौकशी होणार का, आणि महिला सक्षमीकरणासाठी खर्च झालेल्या कोट्यवधींचा प्रत्यक्ष लाभ महिलांना किती मिळाला, याचे उत्तर आता प्रशासनाला द्यावे लागणार आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे मेट्रो ब्लड बँक व वैद्यकीय उपकरणांसाठी ९कोटी मंजूर

आ.सुलभा खोडके यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची फलश्रूती

अमरावती/का.प्र

विभागातील पाचही जिल्हातील रुग्णांसाठी आरोग्य वरदान ठरलेल्या विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय,अमरावतीच्या आरोग्य सुविधांमध्ये आता अत्याधुनिक मेट्रो ब्लड बँकेची नव्याने भर पडणार आहे. या संदर्भात अमरावतीच्या आ.सुलभा खोडके यांनी शासनाकडे पाठपुरावा केल्याने नियोजन विभागाकडून सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल,अमरावती मध्ये अत्याधुनिक मेट्रो ब्लड बँकेच्या सुविधेसह इतरही युनिट मधील वैद्यकीय साहित्य व अत्याधुनिक उपकरणांसाठी ९ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

राज्यात अमरावती आणि नाशिक या दोन जिल्ह्यामध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु असून अमरावती मधील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये किडनी रोग, किडनी प्रत्यारोपण, प्लास्टिक सर्जरी, पेडियाट्रिक्स सर्जरी, कार्डियाक युनिक, कॅंसर युनिट व मेंदूरोग सारखे युनिट सुरु आहे. त्यामुळे केवळ अमरावती विभागच नाही तर ग्रामीण भाग, धारणी -मेळघाट सारखा दुर्गम भाग तसेच मध्यप्रदेशाच्या सीमाभागांतून सुद्धा रुग्ण उपचारासाठी दाखल होत असल्याने या ठिकाणी रुग्ण संख्येचा डोलारा दिवसेंदिवस वाढतच आहे. रुग्णसेवेला केंद्रबिंदू मानून व

रुग्णांच्या उपचाराला सर्वोच्च प्राधान्य देऊन रुग्णांना आरोग्याच्या सर्व अत्याधुनिक उपचार सेवा-सुविधा उपलब्ध करण्याला घेऊन आ.खोडके यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल प्रशासनासोबत संवाद व समन्वय साधून वारंवार बैठका घेत उपाययोजना करण्यावर भर दिला आहे.दरम्यान सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये जवळपास ७-८ युनिट सुरु असतांना सुद्धा त्या ठिकाणी रक्तपेढी उपलब्ध नसल्याने शल्यक्रिया करतांना रुग्णांकरिता इतर रुग्णालयातील रक्तपेढीतून रक्त उपलब्ध करावे लागत आहे. ही बाब प्रकर्षाने समोर आल्याने सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक ब्लड बँक स्थापन करण्यासंदर्भात आ. खोडके यांच्या वतीने सूचना करण्यात आली असता रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक - डॉ. अमोल नरोटे यांनी तसा प्रस्ताव जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय,अमरावती मार्फत शासनाकडे पाठविण्यात आला.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना -सन २०२६-२०२७ योजने अंतर्गत लेखाशिर्ष - २२१० जे ५६४ मधील रुग्णालयासाठी औषधी साठा, साहित्य व वैद्यकीय संसाधने व उपकरणे खरेदी करणे या योजनेतून सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अमरावती येथे ४.९४ कोटी निधीतून अत्याधुनिक व सर्व वैद्यकीय संसाधनांनी परिपूर्ण अशी मेट्रो ब्लड बँक (पॅथॉलॉजी व लॅबोरेटरीसह) साकारण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच याच लेखशीर्षावर वर्ष २०२६-२७ करिता सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील इतर युनिट मध्ये वैद्यकीय साहित्य , संसाधने , उपकरणे व मशीन, सोलर पॅनल, तसेच रुग्णांसाठी चांगल्या उपचार सुविधा निर्माण करणार आहे.आ.खोडके यांच्या पाठपुराव्यामुळे आता सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अमरावती करिता एकंदरीत ९ कोटींचा निधी मंजूर झाल्याने रुग्णालयाला नवी आरोग्य संजीवनी प्रदान झाली आहे.

तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

अचलपूर/वार्ताहर

शहरातील एका तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे.प्राप्त माहितीनुसार शहरातील जीवनपुरा येथील गौरव मावळे (वय ३५) हा तरुण अचलपूर नाका येथे एका खाजगी पेट्रोल पंपावर काम करीत होता.

हसमुख,मनमिळावू आणि प्रेमळ स्वभावामुळे मृतक गौरव मावळे हे सर्वत्र परिचित होते.७ सप्टेंबर रोजी पेट्रोल पंपावरून काम पूर्ण करून परत आल्यानंतर घरी कोणीही नसताना गौरव मावळे या तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याने परिसरात शोककळा पसरली आहे.मृतक गौरव मावळे यांचे अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करून शोकाकुल वातावरणात त्यांचावर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी परिसरातील नागरिक,मित्र मंडळी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.त्यांच्या पश्चात आई,वडील ,भाऊ असा आप्त परिवार आहे.

अमरावतीला करा गुन्हेगारी मुक्त

शहर कृती समितीचे पोलीस आयुक्तांना साकडे

अमरावती/का.प्र.

शहरात वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर कडक पोलीसींग आणि ठोस उपाययोजना करण्याची मागणी गुन्हेगारीमुक्त अमरावती शहर कृती समितीने पोलीस आयुक्त राकेश ओला यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदनात रवी नगर येथील अल्पवयीन विद्यार्थिनीच्या हत्याकांडा पासून ते शहरातील इतर गंभीर गुन्ह्यांपर्यंत अनेक विषय मांडण्यात आले आहेत.शाळा-कॉलेजांमध्ये जनजागृती आणि समुपदेशन करावे,गुन्हेगारांवर कठोर कारवाई आणि प्रकरणे फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे,रात्रीच्या वेळी

पेट्रोलिंग वाढवावी, दामिनी पथकाची पुनर्स्थापना करा,पोलीस मित्र संकल्पनेची नव्याने स्थापना,शांतता समितीच्या नियमित बैठका घेण्यात याव्या.शहरात पाच नवीन पोलीस स्टेशन स्थापन करावे.लोकसंख्येच्या प्रमाणात पोलीस बळ आणि संसाधने वाढवावे,अंमली पदार्थांच्या तस्करीवर पूर्णपणे अंकुश लावणे,पोलीस प्रशासनात राजकीय हस्तक्षेप थांबवावे यासह इतर मागण्या करण्यात आले आहे.समितीने म्हटले आहे की, रवी नगरातील घटने मुळे संपूर्ण अंबानगरी हादरली आहे. पालक वर्गामध्ये प्रचंड चिंतेचे वातावरण आहे. त्यामुळे शहराला गुन्ह्यांपासून मुक्त करण्यासाठी वरील उपायांची तातडीने अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

निवेदन देतेवेळी राजेश वानखडे, किशोर बोरकर, अशोक डोंगरे, रितेश तेलमोरे, समीर जवंजाळ, किरण गुडधे, पंकज मेश्राम, पंकज सुरडकर, जितेश भुजबळ, शुभम जवंजाळ, बसु महाराज, बंटी रामटेके, प्रशांत देशमुख, अंकित बारजुरकर, मनीष पाटील, वैभव बगणे, नितीन शिरभाते, नजीर खान प्रफुल्ल डोंगरे, प्रशांत गजभिये, अनिल रामटेके, अभिजीत देशमुख सह विविध दल आणि संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हव्याप्र मंडळाच्या १३ जलतरणपटूंची राष्ट्रीय वॉटर पोलो स्पर्धेसाठी निवड

अमरावती/का.प्र.

इंदोर येथे दि. ६ ते १३ सप्टेंबरदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ५२ व्या ज्युनियर राष्ट्रीय वॉटर पोलो स्पर्धेसाठी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या तब्बल १३ जलतरणपटूंची महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे. मुलांच्या तसेच मुलींच्या संघात हव्याप्र मंडळाच्या खेळाडूंना स्थान मिळाल्याने अमरावतीच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.

मुलांच्या संघात आर्यन हिंगमिरे, स्वर्णीचे चीपे, शौर्य गुप्ता, मंथन शिवनीकर, समर्थ महोत्सुरे, कृष्णा सरदार आणि शौर्या साहू यांची निवड झाली आहे. तर मुलींच्या संघात पायोषणी देशमुख, अंजली राऊत, भूमिका गिरी, आर्या बिजवे, रुशादा पाटील आणि अस्मी पोटोडे यांचा समावेश आहे.राष्ट्रीय स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या मुला-मुलींच्या संघाचे प्रशिक्षण पूर्वी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जलतरण तलावावर घेण्यात आले होते. या यशाचे श्रेय खेळाडूंनी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, अमरावती जलतरण संघटनेचे अध्यक्ष बसंतराव हरणे, प्रा. डॉ. टॉमी जोश, प्रा. डॉ. लक्ष्मीकांत खंडागळे, प्रशिक्षक व विभागप्रमुख प्रा. डॉ. योगेश निर्मळ यांना दिले आहे.

प्लास्टिकविरोधात धडक कारवाई; १,८०० किलो प्लास्टिक जप्त

अमरावती/का.प्र.

अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिबंधित प्लास्टिकविरोधात विशेष तपासणी व धडक कारवाई करण्यात आली. दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी MIDC ARCO गॅरेज परिसरात ही कारवाई करण्यात आली.

तपासणीदरम्यान प्रतिबंधित प्लास्टिक कॅरिबॅगचा मोठ्या प्रमाणात साठा आढळून आला. महानगरपालिका पथकाने कारवाई करत तब्बल ६० पोते (कट्टे)

प्रतिबंधित प्लास्टिक जप्त केले. जप्त करण्यात आलेल्या प्लास्टिकचे एकूण वजन १,८०० किलो असून, त्याची अंदाजे किंमत २ लाख ८० हजार इतकी असल्याची माहिती महानगरपालिका प्रशासनाने दिली.

प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर व साठवणूक करणाऱ्यांवर महानगरपालिकेकडून सातत्याने तपासणी व कारवाई करण्यात येत असून, नागरिक व व्यावसायिकांनी शासनाच्या प्लास्टिक बंदी नियमांचे पालन करावे, असे आवाहन महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.या कारवाईदरम्यान स्वच्छ भारत मिशन शहर समन्वयक श्वेता बोके, प्लास्टिक बंदी नोडल अधिकारी ए. के. गोहर, अतिक्रमण विभाग प्रमुख योगेश कोल्हे व अजय बन्सेले, स्वास्थ्य निरीक्षक सचिन सैनी, दर्शन देशमुख व अनिकेत फुके तसेच अतिक्रमण विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेमध्ये शिक्षक दिनानिमित्त

पवित्र पोर्टलद्वारे निवड झालेल्या गणित विभागातील १८ विद्यार्थ्यांचा सत्कार

अमरावती/का.प्र.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावेळी पवित्र पोर्टलच्या माध्यमातून विविध पदांवर निवड झालेल्या संस्थेच्या गणित विभागातील विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या सत्कार सोहळ्यात विपुल जाधव (जि.प. चंद्रपूर), शुभम खोडे (जि.प. यवतमाळ), नौशाद (मनपा नागपूर), सोनाली हिवराळे (कोल्हापूर), प्रिया निकम (जि.प. पालघर), आशिष जावरकर (अम. ट्रायबल), कल्याणी कडू (जि.प. पालघर), केतन मावसकर (अम. ट्रायबल), हरेकलाल जांभेकर (अम. ट्रायबल), साक्षी राऊत (जि.प. अमरावती), मनस्वी बढे (जि.प. नाशिक), हर्षदा कडू (जि.प. वर्धा), उमेश राठोड (जि.प. यवतमाळ), निशा केवटे (जि.प. पालघर), प्रफुल मोहोकार (जि.प. नाशिक), भाग्यश्री दुधे (जि.प. वर्धा), वैभव ठाकरे (जि.प. नाशिक) आणि अक्षय ठाकरे (न.पा. काटोल) यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. अभिजीत मेंढे , सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग यांनी विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीबाबत मार्गदर्शन केले. योग्य नियोजन, नियमित अभ्यास, सातत्य आणि आत्मविश्वास या बाबी यशासाठी महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच डॉ. दुर्गेश बोरसे , शैक्षणिक समन्वयक व सहायक प्राध्यापक, इंग्रजी विभाग यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून स्पर्धात्मक परीक्षांसाठी आवश्यक कौशल्यांवर भर दिला.

शिक्षक दिनानिमित्त डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन चरित्रावर बी.एस्सी. भाग-२ ची विद्यार्थिनी ऐश्वर्या धायगुडे हिने भाषण केले. तसेच एम.एस्सी. भाग-१ ची विद्यार्थिनी बरखा मोहोड हिनेदेखील तिचे विचार मांडून शिक्षक दिनाचे महत्व विषद केले.

यावेळी गणित विभागाचे विभागप्रमुख डॉ. सुमेध थूल यांनी इंडक्शन प्रोग्राम संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयीन जीवनातील शैक्षणिक संधी, विद्यार्थ्यांची भूमिका आणि भविष्यातील करिअरच्या दृष्टीने योग्य दिशादर्शनाचे महत्व त्यांनी स्पष्ट केले.

तसेच प्राध्यापक डॉ. रामकृष्ण धायगुडे यांनी स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवर मार्गदर्शन केले. अभ्यासाचे योग्य नियोजन, नियमित सराव आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविता येते, असे त्यांनी सांगितले. संचालन गणितीय सोसायटीच्या अध्यक्षा अनम फातिमा आणि वर्गप्रतिनिधी नायरीन अंबर यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाच्या शेवटी गायत्री सानप यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.

यावेळी संस्थेचे संचालक माननीय डॉ. केशव तुपे यांनी पवित्र पोर्टलद्वारे निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाची वाटचाल अशीच पुढे सुरू ठेवावी, असेही त्यांनी सांगितले.शिक्षक दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी प्रेरणा मिळाली. पवित्र पोर्टलद्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या यशाचे कौतुक करण्यात आले. या विद्यार्थ्यांचे यश संस्थेतील इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी असून त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी हा कार्यक्रम निश्चितच मार्गदर्शक ठरला.

अग्निकांड प्रकरणात गठीत समितीचा अहवाल द्या - हरमकर

अमरावती/का.प्र.

जिल्हा स्त्री रुग्णालय येथील एनआयसी आयसी मध्ये झालेल्या अग्निकांड प्रकरणी गठीत करण्यात आलेल्या संजय काटकर समितीचा अहवाल व कारवाईची माहिती आठ दिवसात सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. दहा दिवस उलटूनही अहवाल सार्वजनिक नाही झाला आहे म्हणून या अहवालाबाबत आम्हाला माहिती दिल्या जाण्याची मागणी शिवसेना उबाठाच्या वतीने जिल्हाधिकारी ला दिलेल्या निवेदनातून केलेली आहे. अहवाल प्राप्त झाला असल्यास त्यात कोणाला दोषी ठरविण्यात आले आहे व त्यावर कोणती प्रशासकीय कार्य आहे करण्यात आली आहे याची माहिती द्यावी. अहवाल प्रलंबित असल्यास तो किती दिवसात सार्वजनिक करण्यात येणार आहे हे सांगावे. यासह इतर मागण्या करण्यात आलेल्या आहेयावेळी माजी नगरसेवक प्रवीण हरमकर सह इतर कार्यकर्ता उपस्थित होते.

संक्षिप्त

प्लास्टिकमुक्ती व डस्टबिन मोहीम; १० हजारांचा दंड वसूल

अमरावती- महानगरपालिकेच्या झोन क्रमांक १ अंतर्गत रामपुरी कॅम्प ते विलास नगर रोड परिसरात सोमवारी डस्टबिन व प्लास्टिकमुक्त परिसर मोहीम राबविण्यात आली. महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक व उपायुक्त (१) भाग्यश्री बोरेकर यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, स्वास्थ्य अधीक्षक विजय बुरे आणि झोन क्रमांक १ चे सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.मोहिमेदरम्यान प्रतिबंधित सिंगल यूज प्लास्टिकचा वापर, विक्री व साठवणूक तसेच परिसरातील स्वच्छता आणि दुकानदारांकडे दोन डस्टबिनची उपलब्धता व वापर याबाबत तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळून आल्याने उत्तम राठोड यांच्यावर ५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. तसेच दोन डस्टबिनचा वापर आढळून न आल्याने कृष्णा नुक्कड कचोरी, मिरानी किराणा, नारायण मिरानी, संतोष मिरानी आणि महालक्ष्मी डेअरी यांच्यावर प्रत्येकी १ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. या कारवाईतून महानगरपालिकेने एकूण १० हजार रुपयांचा दंड वसूल केला. या मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक राजू ढिक्याव, स्वास्थ्य निरीक्षक सचिन सैनी, इमरान खान, एम. सैय्यद, निखिल खंगाळे आणि मनीष नकवाल यांनी सहभाग घेतला

महानगरपालिकेत राजे उमाजी नाईक जयंती

अमरावती - राजे उमाजी नाईक जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. राजे उमाजी नाईक यांच्या जयंती निमित्य उपमहापौर सचिन भेंडे यांचे हस्ते राजे उमाजी नाईक यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले. यावेळी स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त योगेश पिठे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, सतिश ताथोड, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

राजे उमाजी नाईक जयंतीनिमित्त अभिवादन

अमरावती- राजे उमाजी नाईक यांच्या जयंती दिनानिमित्त

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित अधिकारी कर्मचारी यांनीही राजे उमाजी नाईक यांना पुष्प वाहून अभिवादन केले.

हाजी शकूर उर्दू हायस्कूलमध्ये शिक्षक दिन

शिरजगाव कसबा - येथील हाजी शकूर उर्दू हायस्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहपूर्ण साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वतः पुढाकार घेत कार्यक्रमाचे नियोजन, आयोजन व सूत्रसंचालन करून शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अ. हाफिज, सचिव मोहम्मद सादिक व कोषाध्यक्ष मुस्तफा खान यांच्या वतीने शाळेतील शिक्षकांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. दरम्यान मुख्याध्यापक मजहर अली यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षकांचा आदर, शिस्त, नियमित अभ्यास आणि यशस्वी जीवनासाठी शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे महत्व स्पष्ट केले. कार्यक्रमाला गाझी जाहिरोष, जफर, तारिक, वसीम, सायमा मॅडम, तन्वीर, आकिबा, रहमान व राजिक सर यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि सुंदर नियोजनामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

संदीप सावरकर यांचा सत्कार

अमरावती- भारतीय सैन्य दलातील ५८ आर्मर्ड चिलखती रणगाडा रेजिमेंट मध्ये २२ वर्षे प्रदीर्घकाळ देशसेवा बजावून सेवानिवृत्त झालेले माजी सैनिक संदीप सावरकर व रेखा सावरकर यांचा सपत्नीक गोपाल नगर येथील निवासस्थानी राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.या सत्कार प्रसंगी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे, राज्य कार्यकारिणी सदस्य शामकुमार आकोडे, जिल्हा संपर्कप्रमुख पुरुषोत्तम वनस्कर, ज्येष्ठ मार्गदर्शक भास्करराव भटकर,गठाई कामगार आघाडी जिल्हा अध्यक्ष दिलीप बरजे,जिल्हा कार्यकारिणी सदस्य राजुभाऊ चव्हाण,गठाई कामगार आघाडी शहर अध्यक्ष धनराज मेशकर, अमोल मेसकर,रवी मस्के, रुपेश नांदुरकर, अनिल सावरकर, अरविंद सावरकर, नंदकिशोर हिरपुरकर, प्रकाश पिंडेकर उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अश्लील चाळे आणि उन्मादक इशारे!

जन्माष्टमीला दहीहंडी कार्यक्रमात अश्लील नृत्य (?) करणाऱ्या बायका पोरी नाचवल्या म्हणून अनेकांनी नापसंती व्यक्त केली. गंमत वाटली. कथित धर्ममार्तंड, धर्माचे म्होरके, साधू संन्यासी, वारकरी संप्रदायातले हभप पुढारी, कथित संत, शंकराचार्य, धर्माचा पदर पसरून मते मागणारे धर्माचे कार्ड खेळणारे राजकीय पक्ष, त्यांचे समर्थक, धर्मप्रेमी नागरिक यापैकी कुणी काही बोलत नाही. सुधारणावादी विवेकी लोकांना फार खाज असते, नको तिथे तोंड घालण्याची. ज्यांना दुखले पाहिजे, रुतले पाहिजे ते मिटक्या मारत शांत बसून आहेत! तुम्ही का गळे फाडून घेताय! सो चिल डाऊन! असो.

नाचणाऱ्या बायका मुलींना इथे कोण आणतो आणि त्यांना का आणले जाते, कसे नि कोठून आणले जाते याची एक सुनियोजित यंत्रणा आहे, याचे एक अर्थकारण आहे. ह्यात एक शोषण व्यवस्था आहे. ती अशा स्तराला गेली आहे की तिथून माघारी फिरणे जवळपास अशक्य आहे. डान्सर्स, कॉलगर्ल्स, प्रॉस्टीट्यूट्स यांची झाडाझडती घ्या असं कुणी म्हटलं की लगेच बांगलादेशींचा मुद्दा पुढे केला जातो. हे विषयाला वळण देण्यासाठी केले जाते.

माया मगर नावाची एक डान्सर आहे. तिची महिन्याची कमाई काही लाखांच्यापुढे आहे! ती राहते नेपाळच्या पालपामध्ये. काय आहे हे पालपा? इथे डान्सर मुली अरेंज करून देणारे ऑर्गनायझर्स आहेत. बुटवाल, गंडकी, सिद्धार्थनगर, लुम्बिनी इथे यांच्या चेन्स आहेत. लाखे, सोरटी, कौदा हे इथले स्थानिक नृत्याविष्कार. ह्या डान्सच्या नावाखाली मुलींची जमवाजमव होते आणि त्यांना एस्कॉर्ट केले जाते बिहारमध्ये. तिथून त्या आणल्या जातात उत्तरप्रदेश, बंगाल, झारखंड, हिमाचल, आसाममध्ये. तिथून त्या देशभरात फिरवल्या जातात. त्यात स्थानिक भारतीय मुलींचा भरणा केला जातो. ग्रुप तयार केले जातात. सारा खेळ काराओकेवर असतो. कधीकाळी डान्सबारमध्ये नाचणाऱ्या बायकांना हाताशी धरून यांचे प्रशिक्षण केले जाते. बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बंगालमध्ये रीतसर मुली शिकवल्या जातात. त्याच बरोबर त्यांना अन्य काही कलांमध्ये पारंगत केले जाते.

डीजे, लेसर, प्लास्मा, स्टेज, कराओके, ऑर्केस्ट्रा, बॉडीगार्ड्स, बाउन्सर्स, ट्रान्सपोर्टेशन व्हेईकल्स, पँट्री, मेकअप आर्टिस्ट्स, मॅनेजर्स, दलाल, भडवे, कार्पोरेट डिलर्स, सरकारी कनेक्टर्स, पॉलिटिकल क्रिमिनल नेक्सससाठी हाताशी धरलेले गुंड आणि सरते शेवटी आयोजक अशी एक मोठी साखळी काम करत असते. यांचे प्रत्येकाचे पैसे असतात. कमिशन ठरलेले असते. नाचणाऱ्या पोरींचे शोषण केले जाते तो आणखी वेगळा विषय. कोरी पोरगी आणली जाते तिची चीर काढण्याचे विधिवत काम या गदारोळात केले जाते. हे अगदी पॉईंट टू पॉईंट मॅनेज केलेले असते.

आयोजक पैसा गोळा करतात, कसा गोळा करतात. स्पॉन्सर्स शोधले जातात किंवा त्यांना दम देऊन उभे केले जाते! वर्गण्या गोळा केल्या जातात. ईललीगल धंदे करणाऱ्या एलिमेंट्सकडून खंडणी गोळा केली जाते. बड्या धेंडांकडून प्रोटेक्शन मनी वसूल केला जातो. अवाढव्य स्टेज. भव्य लाईट्स. कानठळ्या बसवणारे डीजे लावले जातात. मुलींना स्पेसिफिक ठिकाणी उतरवले जाते. खाट आणि ताट यांचा मेळ घातला जातो.

इन्स्टा फिन्स्टावर अर्धनागव्या बायका पाहून पिसाळलेले हजारो पोरं कुठेही कधीही जमा होऊ शकतात इतकी आपली लोकसंख्या! हजारो पोरं अधाशागत बाया पाहताच चेकाळू लागतात. बिभत्स हावभाव करू लागतात. कावडयात्रेत लिंगोत्तेजक इशारे करणारी बारकाली पोरं आपण सगळ्यांनी पाहिलीत. कुणी शिकवले त्यांना हे? कुठे पाहिले त्यांनी हे? एक काळ होता की लघवीच्या इंद्रियातून वीर्य येते हे कळायला मिसरूड फुटावे लागायचे! आता पाच सहा वर्षाचे शेम्बडं पोरगं देखील त्याच्या डाव्या हाताच्या अंगठा तर्जनीच्या भोकात उजव्या हाताची तर्जनी घालून आपला विकास झाल्याचे सिद्ध करताना दिसते! हे असले पब्लिक खंडीभर उपलब्ध आहे! त्यांना हवा असतो डीजे, त्यांना हव्या असतात बायका! त्यांना पाहायचे असतात त्यांचे अश्लील चाळे आणि उन्मादक इशारे!

मधल्या तीन दशकात खऱ्या लावणी कलावंतांना पद्धतशीर देशोधडीला लावण्यात आले आणि त्यांची जागा घेतली, बाजारबसव्या कंबरहलव्या बायका पोरींनी! यांनी लावणीच्या अमृतात माती कालवली! एक अख्खी लोककला पांचट केली. दरम्यानच्या काळात लोकनाट्य कला केंद्रे कुत्र्याच्या छत्र्या उगवाव्यात तशा गतीने सगळ्या राज्यात फोफावली. काहींनी खुलेआम धंदा मांडला. कला, नृत्य, नैतिकता, कदर, इमान आदी गोष्टींचे कडबोळे बायकांनी आणि त्यांच्या दलालांनी लिंगपिसाटांच्या शिंगात खोवली, त्यांच्या शेपट्या अशा काही पिरगाळल्या की, आसपास काय घडतेय हे लोकांना कळलेच नाही! लोक खुश राहिले डान्सबार बंद झाले म्हणून पण प्रत्यक्षात डान्स बार तुमच्या आमच्या सगळ्यांच्या दाराशी आणून उभे केले गेले! काहींना वाटेल की ही फुकटची मजा का टाळायची? लोकहो ह्यात तात्काळ आर्थिक झळ बसत नाही, पण ती पोरं वाहवत जातात! ही काय कमी किंमत आहे का?

आता पुन्हा एकदा माया मगरकडे वळूया! आपल्या देशाला डॉक्युमेंटेशनचे वावडे आहे. ब्रिटिश हे काम चोख करायचे. पूर्वी देशभरात

इथे बायका नाचवण्याविषयी तुम्ही निषेध व्यक्त करण्याने आता काहीही होणार नाही! नाचणाऱ्या बायका पोरीत आपल्या जवळची एखादी पोर असू नये, तिथे जाऊन चेकाळणाऱ्या पोरात आपल्या घरचा मुलगा असू नये, इतकी काळजी फारतर घ्यावी!

रेड लाईट एरियात नेपाळी मुली असायच्या. चार दशकापूर्वी त्यात बंगाली मुलींचा भरणा लक्षणीय वाढला. नव्वदच्या दशकात आलेल्या डान्सबारमध्येही बंगाली आणि नेपाळी मुली मोठ्या प्रमाणात होत्या. मात्र दोन दशकापासून यातील नेपाळी बायका गायब होत गेल्या! त्या कुठे गेल्या? २०१७ मध्ये नेपाळने एक कायदा केला की, त्यांच्या देशातील कोणत्याही व्यक्तीला खास करून महिलांना घरगुती कामासाठी आखाती देशात जाता येणार नाही! हा कायदा करण्याचे कारण म्हणजे नेपाळी बायका कुठे गेल्या याचे उत्तर होते! ह्यावरही उत्तर शोधण्यात आले. ज्या बायकांना आखाती देशात पाठवायचे असेल त्यांना आधी बिहारमध्ये पाठवले जाऊ लागले. शंभरातील दहा मुली आखातात आणि नव्वद मुली ऑर्केस्ट्राच्या दलदलीत रुतवल्या जाऊ लागल्या. ह्या मुली स्थानिक मुलींना आपल्या जाळ्यात ओढू लागल्या आणि पाहता पाहता ह्या बिझिनेस मॉडेलचा आता भस्मासुर झालाय!

वाढत्या संख्येतल्या मुलींना काम द्यायचे म्हणजे नवे फंडे अंमलात आणले पाहिजेत! मग मागणी वाढवण्यासाठी गावोगांवच्या यात्रा जत्रेत, धर्मिक सोहळ्यात पोरी नाचवणे सुरू झाले! लग्नकार्यात नाचणाऱ्या पोरींचे हजारो ग्रुप्स बनवले गेले. बारात, हळदी मध्ये नाचणाऱ्या पोरी हे दृश्य नॉर्मल झाले! तिथेही संख्या वाढली तेव्हा पुन्हा मागणीचा परीघ विस्तारला गेला. कावड पासून दहीहंडीपर्यन्त हे पीक आता मुबलक घेतले जाते. बिहारमधील काही ओपन टू ऑल अशा कार्यक्रमात संपूर्ण विवस्त्र बायका नाचवल्या गेल्यात. आपल्याकडेही ती प्रगती होईल. हे आता आऊट ऑफ कंट्रोल गेले आहे.

हे सारे घडत असताना पोलिस परवानग्या घेतलेल्या असतात, त्यांचे शीर्षक असते 'सांस्कृतिक कार्यक्रम'! तुम्ही अन्य हेड बॅनरखाली परवानगी मागितली तर खळखळ केली जाते. ते तर काय करणार! कधीकधी बारीक चिरीमिरी त्यांनाही दिली जाते. डेसिबल कोणाच्या बापाला मोजायचे असतात ! नंगा नाच साजरा होतो. कधी स्टेजवर शिवाजी राजांचे, देवीदेवतांचे पोस्टर्स असतात! कुणालाच काहीच वाटत नाही! खुद्द शिवाजी राजांचे वंशज म्हणवून घेणारे देखील यात सामील दिसतील! माझे म्हणणे पटत नसल्यास शिवेंद्रसिंह राजे, एकनाथ शिंदे, राम कदम यांची दही हंडी पाहून घ्या! अशी किती तरी नावे घेता येतील.

ह्यात आणखी काही धंदे चालत असतात. शोमध्ये आणलेल्या पोरींपैकी एखादी आवडलेली कळी कुणी आपल्या शेतावर ठेवून घेतो आणि इथली एखादी गरजवंताची पोर धुंगरांच्या वाट्याला लावली जाते! हे अतिशय नियोजनपूर्वक होते. मीडियावाले बातम्या लावतात- दणदणाटात गोविंदा बेफाम! ह्या सगळ्या गर्दीत तो बिचारा निरागस बाळकृष्ण सारा भवताल सोडून कधीच निघून गेलेला असतो हे कुणालाच कळत नाही!

काहींना वाटेल की, ह्या दलदलीतून मुली का बाहेर पडत नाहीत? मुलींना आधी फक्त नाचवले जाते, काही दिवसांनी मग झोपवले जाते. १२ ते १६ वयोगटातल्या मुलींना शारिरीक अंगे मोठी दिसावीत म्हणून इंजेक्शन्स दिली जातात. मुलींना अल्पावधीत विकलं जातं. त्यांचा ठावठिकाणा लागू नये म्हणून सातत्याने त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी हलवलं जातं. मुलींसाठी ग्राहक शोधणारे दलाल, त्यांची खरेदी विक्री करणारे बायका पुरुष इतक्या सहज वावरतात, की जणू काही शेळ्यामेंढ्यांचा सौदा केला जातो! जे लोक हमबिस्तर होण्यासाठी येतात त्यांना ते सत्कृत्य तिथेच त्या घरात करावे लागते. मुलगी बाहेर नेता येत नाही. ह्या मुलींना व्यसनेही लावली जातात जेणेकरून त्या परावलंबी होतात. काही वर्षांनी त्या घराचा, नातलगांचा विषय विसरून जातात. ज्या मुली गर्भवती राहतात, त्यांचा गर्भपात केला जात नाही. त्यांची प्रसूती होऊ दिली जाते. ज्याने सलगी दाखवून तिला गर्भार केलेलं असतं, तो मुलं विकणाऱ्या रॅकेटचा घटक असतो. या बाळांना बॉयफ्रेंड बेबी असा कोडवर्ड दिला गेलाय. दशकभरासाठी यांचा वापर झाल्यानंतर त्या गायब होतात. त्यांचे पुढे काय होते, त्यांना कुठे नेले जाते याचा कुणीही शोध घेत नाही. चकचकीत कपडे, खायला प्यायला रगड गोष्टी, टेचात केलेला मेकअप आणि सुरूवातीच्या दिवसांत हाती खेळणारा पैसा या गोष्टींना गरीब भुकेल्या मुली भुलतात आणि कायमच्या हरवून बसतात.

आता उत्सव सण यांच्या दरम्यान आपण जे काही करत आहोत ते धर्माच्या पार्थिव परंपरांवरची बळजोरी आहे! खरा धर्म आणि अध्यात्म अशा सोहळ्यातून कधीच निघून गेला! सबब धर्मभ्रष्ट होत असल्याची ज्यांना वेदना व्हायला पाहिजे ते देखील गपगार पडून आहेत आणि खंत व्यक्त करणाऱ्यानीही हे ध्यानात ठेवावे की, इथे बायका नाचवण्याविषयी तुम्ही निषेध व्यक्त करण्याने आता काहीही होणार नाही! नाचणाऱ्या बायका पोरीत आपल्या जवळची एखादी पोर असू नये, तिथे जाऊन चेकाळणाऱ्या पोरात आपल्या घरचा मुलगा असू नये, इतकी काळजी फारतर घ्यावी!

समीर गायकवाड

कोणाच्याच भावना कशा नाही दुखावल्या हे बघून?

कालच्या दहीहंडीचे हे काही सांस्कृतिक फोटो. आश्चर्याची गोष्ट अशी की प्रखर हिंदुत्वाची जबाबदारी पार पाडणाऱ्या एकाही गणंगाला याविषयी खंत किंवा खेद वाटलेला नाही. अथवा हे बंदच झालं पाहिजे अशी मागणी एकाही गणंगानं केलेली नाही.

व्यक्ती जाऊ द्या. जगभर हिंदूंचा महाप्रचंड कैवार घेणारा संघ, विश्व हिंदू परिषद, व्हॅलेन्टाईन डे ला दांडू घेऊन फिरणारे बजरंग दल यापैकी कुणालाही हिंदू धर्माच्या, भगवान कृष्णाच्या जन्माच्या दिवशी चाललेल्या या सांस्कृतिकतेची लाज वाटलेली नाही. हिंदू धर्म विकृत होत असतांना कुठे आहेत हे हिंदूंचे तथाकथित कैवारी? कुठे आहे त्यांची एरवी दिसणारी आक्रमकता?

आठवा महाराष्ट्रातले चार हिंदू नायक! राणे, जगताप, पडळकर, लांडगे! सकल हिंदू मोर्चा कधी काढणार आहेत हे एरवी वचवच करणारे महाभाग हिंदू धर्माच्या या विकृतीकरणाविरूद्ध? देणार आहेत का घोषणा 'जो हिंदू हित की बात करेगा'! कुठे आहेत संभाजी भिडे? कुठे आहे जाज्वल्य नथुराम? पोंक्षे, कोणत्या बिळात लपून हे विकृतीकरण पहाताय? आफळे, कीर्तनाच्या आख्यानात कधी निषेध करणार तुमच्याच नेत्याचा? आहे का हिंमत? हिंदूंनो उघडा डोळे, बघा नीट! तुमचा धर्म कोणासाठी फक्त एक मोठं भांडवल आहे हा प्रश्न विचारा स्वतःला! एवढं दिवसाढवळ्या दिसत असूनही पुन्हा तेच कैवारी वाटत असतील तर तुमचं काहीच होऊ शकत नाही.

विश्वंभर चौधरी

नास्तिक होणे सोपे नसते!



हा प्रवास खूप कष्टाचा आणि नवे भान स्वतःमध्ये निर्माण करण्याचा असतो!!नास्तिक होण्यासाठी पहिल्यांदा काय करावे लागत असेल तर स्वतःशीच भांडावे लागते. स्वतःच्या विचारांवर वार करावे लागतात. स्वतःलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून पिंजून काढावे लागते.

लहानपणापासून मोठे होईपर्यंत मनात ठेवलेले विचार आणि समजूती यांची झाडाझडती करावी लागते. नास्तिक म्हणजे आपल्याला हे समजणे की आपले विचार आणि आपल्या समजूती या आपण न तपासता आपल्या डोक्यात ठेवून टाकलेल्या आहेत. जेव्हा हे लक्षात येते तेव्हा नास्तिकतेचा दरवाजा उघडतो.

ज्यांना आयुष्यभर असे वाटत राहते की आपलंच बरोबर आहे..आपल्या संस्कृतीचंच बरोबर आहे..तेव्हा आपण प्रश्न विचारायचे सोडून देतो.आणि जैसे थे परिस्थिती आहे ती स्वीकारतो.हे विचारांचा साचलेपण आणि तुंबलेपण म्हणजेच आस्तिकता. जसे की,'अज्ञात शक्ती आहे' असे आजूबाजूचे सर्व म्हणत असतील तर आपणही हो म्हणणे.म्हणजे परंपरेने सांगितलेले ते सर्व सत्य आहे एवढेच डोक्यात ठेवणे असते.

नास्तिकता म्हणजे परंपरेतील शहाणपण आणि वेडेपण दोन्ही तपासून बघणे.आणि वेडेपणावर प्रहार करत आपण ते न स्वीकारणे. नास्तिकता म्हणजे आपणच आपल्याशी भांडत असताना आपले म्हणणे अचूक करण्याचे कौशल्य हस्तगत करणे. आपले म्हणणे आणि आपले विचार चूक की बरोबर हे ठरवण्यासाठी कुठल्यातरी अज्ञात शक्तीची मदत न घेता तर्काची मदत घेणे. म्हणजे आपल्या समजूती घासून पुसून स्वच्छ करणे.त्यातली घाण काढून टाकणे. आणि स्वच्छ केल्यावर कोणीही त्याला प्रतिप्रश्न केला तरीही त्यातील चूक न निघणे. अचूक विचार करणे हे नास्तिकतेचे धन आहे.

नास्तिकता म्हणजे जगाशी उभा दावा करणे!आजूबाजूला सारे जण जेव्हा आपल्या दोष असलेल्या समजूती सोडायला तयार नसतात तेव्हा आपण स्वतः वर्षानुवर्षे बाळगलेल्या समजुती सोडून देण्याचा निश्चय केलेला असतो. आणि या आपल्या निश्चयावर प्रहार करणारे आजूबाजूचे लोक कितीही असले तरी त्यांच्याबरोबर झुंजत राहणे म्हणजे नास्तिकता.

नास्तिक्य हे एका रात्रीत निर्माण होत नाही.कारण दोन्ही पातळ्यांवर सतत संघर्ष करावा लागत असतो. स्वतःशी संघर्ष आणि समाजाशी संघर्ष!! संघर्ष करणे हा नास्तिकतेचा गाभा आहे. म्हणूनच आयुष्यात आलेल्या कोणत्याही कठीण प्रसंगाला तोंड देताना अज्ञात शक्ती आठवत नाही.तर,संघर्षातून आपण शिकलेल्या कौशल्यांचा वापर करणे एवढेच आठवते आणि आपण त्यातून बाहेर पडतो. नास्तिकता ही या संघर्षातून एक गोष्ट आपल्यामध्ये निर्माण करते. ती म्हणजे सहनशीलता. जो लोकशाहीचा गाभा आहे.

लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाला संघर्ष करण्याची सवय लावून घ्यावी लागेल. नाहीतर..'मी म्हणतो तेच खरे' ही हुकूमशाही आपल्यामध्ये रुजेल. सहनशीलता याचा अर्थ आपण सृष्टीचे विचारांचे व्यक्तींचे वैविध्य मान्य करणे आणि त्याचा वास्तवात स्वीकार करून त्याच्यावर काम करणे. यातूनच नम्रपणा व साधेपणा निर्माण होतो.

नास्तिक्याकडे असलेले एकूण हे गुण म्हणूनच ज्यांना आत्मसात करता येत नाहीत ते नास्तिक्याला नष्ट करण्याचे प्रयत्न करतात.पण..अचूक विचार करण्याच्या नास्तिकाच्या गुणांमुळे वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होतो आणि त्यातून विज्ञान सृष्टी!

विज्ञानामध्ये अचूकता असते जी अध्यात्मामध्ये नसते. म्हणूनच नास्तिकांची व नास्तिक्याची सातत्याने हेटाळणी करून नावे ठेवण्यात आलेली आहेत. अचूक विचार जेव्हा निर्माण होतात तेव्हा विवेक आणि नीती याचा सखोल अभ्यास केला जातो आणि ते आत्मसात केले जाते. अज्ञात शक्ती सांगते म्हणून आपण नीट वागायचे असे नास्तिक्य ठरवत नाही.आपल्याला नीटच वागायचे आहे' असे ठरवून नीट वागणे म्हणजे नास्तिक्य. यातूनच जगण्यासाठी कोणती मुल्य आवश्यक आहेत याचे भान येते.म्हणूनच नास्तिक निर्भय बनतो.ही निर्भयता समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता ठेवते. म्हणजेच नास्तिक्य हे सामाजिक प्रश्न आणि समाजाचा विचार आत्मीयतेने करू शकते. आस्तिक्य हे समाजाचा विचार करताना,'देव त्यांचे बघून घेईल'म्हणून सामाजिक प्रश्नांना महत्त्वाचे मानत नाही. किंवा दुर्लक्षित करते. मग ते रस्त्यावरील साधा खड्डा असो नाहीतर परंपरेतील धिंगाणा.

सामाजिक असो वा वैयक्तिक असो, कोणत्या समस्या या चुकीच्या आहेत हे नास्तिक्यामध्ये पटकन लक्षात येते.मग त्या प्रथा असोत वा परंपरा. धर्मग्रंथ असोत वा कर्मकांडे. म्हणूनच नास्तिक हा अचूकतेचा शोध घेणारा प्रत्येक क्षेत्रातला प्रखर विचार आहे आणि प्रकाशमान समजूत आहे. नास्तिक होणे येरागबाळ्याचे काम नव्हे! पण..

येरागबाळ्याने ठरवले तर तो नास्तिक होऊ शकतो!

डॉ.प्रदीप पाटील,
सांगली

'गोकुळ अष्टमीचा गोड काला गोपालकाला'...

अनंत चतुर्दशी नंतर सर्वत्र गणेशाला निरोप देण्यात येतो. अतिशय उत्साहाने, चैतन्याने भारलेले दहा दिवस भरकन सरून जातात ते कळतही नाहीत परंतु काहीतरी राहून गेल्याची पुटपुट पुण्यात आल्यापासून लागून राहत होती,... की राहिला तो 'गोपालकाला'.मागील काही वर्षांपासून म्हणजेच पुण्यात राहायला आल्यापासून मी जर कोणत्या सुखांना दुरावलो असेल तर त्यातील एक महत्त्वपूर्ण म्हणजे'गोपालकाला' होय. विदर्भात सर्वत्र गोपालकाल्याची फार मोठी प्रथा आहे, परंपरा आहे.पण इकडे मात्र ती दिसून आली नाही.सोसायटीतला गणपती विसर्जित होतो.सोसायटीमध्ये अनेक लोकांकडे गणपती, कुठे दीड दिवस, कुठे पाच-सात दिवस,तर कुठे दहा दिवसाच्या गणपतीचे विसर्जनही होते.. परंतु 'काला 'मात्र कुठलाच मिळत नाही.नाही म्हणायला गणपतीच्या दर्शनाला पाच सात ठिकाणी बोलावतात.तेथे प्रसाद म्हणून उकडीचे
मोदक,करंजी,शिरा,रवा
बेसनाचा लाडू,असा प्रसाद मिळतो,पण तो मात्र नाहीच.....

'गोपाल काल्याची'एक वेगळीच चव असते,फार काही नसून, खूप काही असते ! असेही म्हणता येईल.. ज्वारीच्या लाह्या, पोहे, मुरमुरे, शेंगदाणे, ओल्या नारळाचे काप, काकडी, सफरचंदाचे तुकडे, डाळिंबाचे

दाणे, पेरू, चण्याची भिजवलेली डाळ, आंब्याचे लोणचे, लिंबाचे लोणचे व दही याचे संमिश्र मिश्रण म्हणजेच 'गोपालकाला'. 'गोपालकाला' हा वास्तविक गोकुळाष्टमीला केल्या जातो. पण ही परंपरा गणेश विसर्जनालाही पडली. व विदर्भात सर्वत्र 'काला'होऊ लागला. आमच्याकडे लहानपणी आमच्या गावी 'मार्डी 'येथे (यवतमाळ जिल्हा) गोकुळ अष्टमीचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होत असे. त्यानंतर दहीहंडी व नंतर गोपालकाला होत असे. अगदी पोटभर काला मिळायचा, दोन दिवस पर्यंत आम्ही तोच खायचो.त्यानंतर माझ्या चंद्रपूरच्या वास्तव्यात,नेहमी गणेश
विसर्जनानंतर'काला'खायला मिळत होता.

गणपती उत्सवाच्या दहा दिवसात तर काल्याची पर्वणीच असायची.आमच्या सौ. लाही खूप आवडायचा.अनेकदा तर ती संध्याकाळी काला, खाल्ल्यानंतर त्याची चव जाऊ नये म्हणून ती जेवतच नसे. अगदी नवरात्रात किंवा दिवाळीच्या आसपास ती एखाद् कारण शोधून घरी'काला'बनवीत असे, मग त्या रात्री जेवणाला सुट्टी राहत होती.

यावर्षी एक आक्रीतच घडले. वहिनीने गोपालकाल्याचे निमंत्रण दिले. मी, मुलगा व सून आम्ही सर्व लगेच त्या आमंत्रणाचा स्वीकार करून अति उत्साहाने त्यांच्या पुण्यातील मुलाकडे म्हणजेच, बावधन (एरिया चे नाव) येथे गेलो, त्यांनी नेहमीप्रमाणे सुंदर असा काला केला होता, मग काय

आमच्या आनंदाला पारावरच नव्हता. मग मी नुसता कालाच खाल्ला. आणि रात्री जेवलोच नाही. तृप्त मनाने छान झोपी गेलो. त्या काल्याची चव दोन दिवस तरी माझ्या जिभेवर तशीच घोळत होती. त्याचप्रमाणे नागपूरला माझ्या मित्राकडे नागपूरला विसर्जना करीता हजर राहून काला घेतला आहे.

दरवर्षी गणपती उत्सवाची जशी ओढ लागून असते.. तशीच ओढ मला 'गोपालकाल्याची 'ही असते. परंतु मागील काही ३ दिवसांपासून मात्र मी या आनंदापासून वंचित झालो होतो. पण या वेळी मात्र दैवानेच संधी मिळाली.पुन्हा दरवर्षी 'गोपालकाला' मिळेलच या प्रतीक्षेत ...

सुनील देशपांडे
हिंजवडी/पुणे.
मो..९८२२७३७८४१

गुड बाऽऽय डिजे

धार्मिक उत्सव गणरायाचा
गजर व्हावा भक्तिभावाचा
गणरायाचे करता गुणगाण
उचंबळूनी यावे
हृदयी भाव..!

डीजे ने हृदय धडधडे
मनःशांतीला जाती तडे
थरथरती कानाचे पडदे
हे वास्तव नाही का गडे ?..

दुष्परीणामांची ठेवूनी जाण
डीजे लेझर वर बंदी आणा
म्हणती नागरीक सुजाण
त्यास विरोध करणे
हेअज्ञान ष्ठ!

बहूजन हिताय सुखाय
नियम बनविते शासन
समाज हिताची ठेवूनी जाण
करायला हवे
की नाय पालन?..

प्रा.अशोक सारडा
मेहकर
मो.९४२१३९४३३९

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

आडसुळ फाट्यावर धारदार शस्त्रांचा थरार; दोन गटांत तुफान हाणामारी

परस्परविरोधी तक्रारींवरून गुन्हे दाखल; दोन्ही गटांतील एक-एक आरोपी अटकेत

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तालुक्यातील आडसुळ फाटा येथे दोन गटांत धारदार शस्त्रांचा वापर करून तुफान हाणामारी झाल्याची घटना घडली. या घटनेत दोन्ही बाजूंचे व्यक्ती जखमी झाल्याचे समोर आले असून, तेल्हारा पोलिसांनी परस्परविरोधी तक्रारींवरून दोन्ही गटांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

इंदिरा नगर, तेल्हारा येथील अभिजित संजय गोमासे (२७) यांच्या जबानी रिपोर्टवरून तेल्हारा पोलिसांनी गुन्हा क्रमांक ४८८/२०२६ दाखल केला. या प्रकरणात सागर महोकार, हातीक सचिन अवचार (२२), हरीश अवचार, पंकज जिंदे, छोटू बिसे, अदित्य मोरे, शुभम मलीये, यश अवचार यांच्यासह अन्य चार ते पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपी हातीक सचिन अवचार याला पोलिसांनी अटक केली आहे. त्याला न्यायालयाने ९ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

दरम्यान, हातीक सचिन अवचार यांच्या तक्रारीवरून दुसऱ्या गटाविरुद्धही परस्परविरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल घोडे, अभिजित गोमासे, सनी सोनवणे, चेतन खोडे, अजय चिमणकर, राहुल भोंगे, सागर टावरे, अजय भटकळ आणि गजानन वानखेडे, सर्व रा. इंदिरा नगर, तेल्हारा, यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या गुन्ह्यात अभिजित संजय गोमासे याला अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्याला ८ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी मंजूर केली आहे. उर्वरित आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बि. चंद्रकांत रेड्डी, सहायक पोलीस अधीक्षक निखिल पाटील आणि तेल्हारा पोलीस ठाण्याचे निरीक्षक संतोष इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. पो.उपनिरीक्षक निलेश ठाकरे यांच्यासह पोलिस कर्मचारी पुढील तपास करीत आहेत.

संकटग्रस्त शेतकऱ्यांसाठी अकोला जिल्हा काँग्रेस मैदानात

- शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत देण्याची मागणी
- संवैधानिक मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यामध्ये गेल्या ४० दिवसांपासून पावसाचा मोठा खंड पडलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पिके सुकली आहेत. खरिपाचे पीक हातातून गेल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळले असल्याने अकोला जिल्ह्यात तातडीने दुष्काळ निवारण उपाययोजना लागू करण्यात याव्यात, या मागणीसाठी अकोला जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रकाश तायडे यांच्या नेतृत्वात मंगळवारी जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून शासनाला निवेदन देण्यात आले.

अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीद्वारा देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की जिल्ह्यातील शेतकऱ्यांची सध्याची परिस्थिती व आगामी सण, उत्सवांचे दिवस लक्षात घेता अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तातडीने हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत देण्यात यावी. तसेच ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा काढलेला आहे अशा पात्र शेतकऱ्यांना विम्याची २५ अग्रीम रक्कम तातडीने अदा करण्याबाबत संबंधित विमा कंपन्यांना निर्देश देण्यात यावेत. सोबतच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमधून जिल्ह्यातील ज्या महिलांची नावे वगळण्यात आली त्या महिलांच्या कागदपत्रांची व पात्रतेची पुन्हा पडताळणी करून त्यांना योजनेत समाविष्ट करून घेण्यात यावे. तसेच जिल्ह्यातील वगळण्यात आलेल्या महिलांच्या नावांची यादी प्राप्त करून देण्यात यावी. या सर्व मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देऊन जिल्ह्यातील सध्याच्या पीक परिस्थितीबाबत काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.

या परिस्थितीबाबत शासनाला माहिती देऊन शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळवून देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. वरील सर्व मागण्या मान्य होऊन शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळाली नाही तर आठवडाभरानंतर जिल्ह्यात काँग्रेसच्या माध्यमातून संविधानिक मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असे जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रकाश तायडे यांनी सांगितले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन चर्चा करण्यासाठी जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रकाश तायडे यांच्यासह महानगर काँग्रेस कमिटी अध्यक्ष महेंद्र गवई, प्रदेश पदाधिकारी महेश गणगणे, अक्षय राऊत, माजी जिल्हाध्यक्ष अशोक अमानकर, राजेश गावंडे, अतुल अमानकर किसान काँग्रेस कार्याध्यक्ष रवी पाटील अरबट, अध्यक्ष किसान काँग्रेस यांच्यासह विजय देशमुख उगवेकर, अतुल खोटरे, सुनील वानखडे, अतुल काठोळे, भूषण तायडे, देवानंद राठोड, गणपत जाधव, सुरेंद्र उगले, विनोद आंबुसकर प्रकाश राठोड, संदीप राठोड, मांगीलाल पवार, गिरीधर पवार यांच्यासह काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

तेल्हारा तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करा

पावसाची दीर्घ दडी; सोयाबीन पिके धोक्यात, शेतकऱ्यांचे प्रशासनाला निवेदन

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तालुक्यात पावसाने दीर्घ दडी मारल्याने खरीप हंगामातील पिके संकटात सापडली आहेत. विशेषतः सोयाबीन पिकाला पावसाअभावी मोठा फटका बसण्याची शक्यता असून अनेक ठिकाणी जमिनीतील ओलावा कमी झाल्याने पिके कोमेजण्यास सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर तेल्हारा तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने शासकीय मदत द्यावी, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे निवेदन सादर केले.

पेरणीनंतर सुरुवातीला समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी खरीप हंगामातून चांगल्या उत्पादनाची अपेक्षा केली होती. मात्र, त्यानंतर पावसाने पाठ फिरवल्याने उभ्या पिकांवर संकट ओढवले आहे. बियाणे, खते, कीटकनाशके, मशागत आणि मजुरीवर मोठा खर्च करून उभे केलेले पीक आता पावसाअभावी करपण्याच्या मार्गावर आहे. तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून खरीप हंगामाची पेरणी केली आहे. मात्र, पीक हातात येण्यापूर्वीच पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. पाऊस नसल्याने उत्पादन घटण्याची भीती असून कर्जाची परतफेड आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे. पावसाअभावी पिकांची स्थिती गंभीर होत असल्याने प्रशासनाने विलंब न करता तालुक्यातील पिकांची पाहणी करून पंचनामे करावेत. तसेच तेल्हारा तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना दुष्काळी सवलती व आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. 'आम्ही कर्ज काढून पिकात पैसा टाकला. सुरुवातीला पाऊस चांगला झाला म्हणून पीक वाचेल अशी आशा होती. आता पाऊस गायब झाला आहे. पीक करपले तर आमचे कर्ज कोण फेडणार? शासनाने तातडीने पंचनामे करून तेल्हारा तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा आणि प्रत्यक्ष आर्थिक मदत द्यावी,' अशी प्रतिक्रिया युवा शेतकरी रोशन आहेरकर यांनी दिली.

मोफत औषध वितरणाचा शिव भक्तानी लाभ

■ प्रतिनिधी | अकोल ■

सामाजिक व आरोग्य सेवेत सक्रिय सुमिरमा फाउंडेशनच्या वतीने अंतिम श्रावण सोमवारी स्थानीय गांधी चौक परिसरात आयोजित मोफत आरोग्य तपासणी, औषध वितरण व मलम पट्टी शिबिराचा शेकडो शिव भक्तानी लाभ घेतला. खरोटे ज्वेलर्स परिसर कॅम्प गांधी चौक येथे आयोजित या एक दिवसीय शिबिराचा प्रारंभ मानाच्या पालकी पूजनाने झाला.

अकोटमध्ये कावड-पालखी मिरवणुकीचा जल्लोष

२६ मंडळांच्या सहभागाने शहर शिवमय; कडेकोट पोलीस बंदोबस्तात मिरवणूक

■ प्रतिनिधी | अकोट ■

श्रावणमासानिमित्त अकोट शहरात सोमवारी (दि. ७) कावडयात्रा व पालखी मिरवणुकीचा उत्साह पाहायला मिळाला. शहरातील २६ कावड मंडळांच्या सहभागाने निघालेल्या या मिरवणुकीमुळे शहरातील वातावरण भक्तिमय झाले. 'हर हर महादेव'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

सकाळी ८ वाजता मिरवणुकीला प्रारंभ झाला. अकोला नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सोनूशेठ चौक, यात्रा चौक आणि कालंका माता चौक या प्रमुख मार्गांवरून मिरवणूक मार्गक्रमण करीत तपेश्वरी महादेव मंदिराकडे रवाना झाली. सजविलेल्या कावडी, पालख्या, ढोल-ताशांचा गजर तसेच विविध धार्मिक झांकी व देखावे हे मिरवणुकीचे आकर्षण ठरले.

मिरवणुकीच्या मार्गावर विविध सामाजिक, धार्मिक व व्यापारी संस्थांनी स्वागत कमानी उभारल्या होत्या. ठिकठिकाणी शिवभक्तांवर पुष्पवृष्टी करण्यात आली. नागरिकांसाठी पिण्याचे पाणी, सरबत आणि अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

१० अधिकारी, ९० अंमलदार, ५४ होमगार्ड तैनात

मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस प्रशासनाकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला. यासाठी १० पोलीस अधिकारी, ९० पोलीस अंमलदार आणि ५४ होमगार्ड जवान तैनात करण्यात आले होते. प्रमुख चौकांमध्ये वाहतूक वळविण्यात आली असून वाहतूक सुरळीत राहण्यासाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले.

किन्नर समाजाकडून सत्कार

मिरवणुकीदरम्यान किन्नर समाजाच्या वतीने कावड मंडळांच्या अध्यक्षांसह शिवभक्तांचा सत्कार करण्यात आला. या उपक्रमाचे उपस्थित नागरिकांनी स्वागत केले.

पूर्णा नदीच्या जलाने तपेश्वरी महादेवाला जलाभिषेक

कावडयात्रेची सांगता भवानीपुरा येथील पुरातन तपेश्वरी महादेव मंदिरात होणार आहे. गांधीग्राम परिसरातील पूर्णा नदीचे पवित्र जल कावडीतून आणण्यात आले असून, या जलाने तपेश्वरी महादेवाला जलाभिषेक करण्यात येणार आहे. त्यानंतर धार्मिक विधी पार पडणार आहेत. कावड-पालखी मिरवणुकीमुळे अकोट शहरात दिवसभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, मोठ्या संख्येने शिवभक्त व नागरिक या सोहळ्यात सहभागी झाले.

राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा शनिवारी

■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस शिक्षक सेलतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, १२ सप्टेंबर रोजी अंत्री मलकापूर येथील स्वयंभू महादेव रिसॉर्ट येथे दुपारी १२ वाजता हा सोहळा होणार आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमात माजी मंत्री तथा ओबीसी नेते विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्र प्रदेश शिक्षक सेलचे कार्याध्यक्ष तथा अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रकाश तायडे यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासून या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले जात आहे. कार्यक्रमाला आमदार साजिद खान पठाण, पदवीधर मतदारसंघाचे आमदार धीरज लिंगाडे, महाराष्ट्र प्रदेश शिक्षक सेलचे अध्यक्ष प्रकाश सोनवणे, महानगर काँग्रेस अध्यक्ष महेंद्र गवई, बाळापूर तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष सत्यनारायण घाटोळे, जिल्हा महासचिव दीपक पोहरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्याचे आयोजन काँग्रेस शिक्षक सेलचे जिल्हाध्यक्ष संदीप शेवलकर, महानगर काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस प्रा. डॉ. नितीन देऊळकर, तसेच प्रदेश काँग्रेस शिक्षक सेलचे उपाध्यक्ष अमित बोबडे व सचिन दुर्गाडे यांनी केले आहे. पुरस्कार सोहळ्यास जिल्ह्यातील तसेच राज्यातील शिक्षकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन बाळापूर विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष स्वप्निल पाठक व मोरझाडीचे सरपंच दीपक पाटील यांनी केले आहे.

पावसाअभावी खरीप पिके धोक्यात; शेतकऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

सोयाबीनच्या कळ्या, फुले गळून उत्पादनावर संकट

■ प्रतिनिधी | अकोला ■

म्हैसपूर व परिसरात ऑगस्ट महिन्यात पावसाने पाठ फिरवल्याने खरीप हंगाम संकटात सापडला आहे. पावसाअभावी सोयाबीन पिकाच्या कळ्या व फुले गळून पडत असून, अनेक ठिकाणी उभी पिके सुकत चालली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून, उत्पादनावर त्याचा थेट परिणाम होणार असल्याने शेतकरी चिंतेत आहेत. दुसरीकडे शेतीतील रोजगाराची कामेही ठप्प झाल्याने शेतकऱ्यांसोबतच शेतमजुरांसमोरही आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

या गंभीर परिस्थितीची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन शेतकऱ्यांना मदत करावी, या मागणीसाठी

म्हैसपूर परिसरात ऑगस्ट कोरडा

जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच अकोला तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. प्रशासनाने म्हैसपूर व परिसरातील पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानग्रस्त शेतकरी व शेतमजुरांना दिलासा देण्यासाठी तातडीने योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे अकोला जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, माजी नगरसेवक गजानन गवई, सामाजिक कार्यकर्ते दिलीप वानखडे, नारायण पारस्कर, बाळू पाटील, अमोल देहणकर, श्याम शेळके, मनोहरराव रोकडे, गुलाब इंगळे, सुभाष इंगळे यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

जाहीर नोटीस

वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०३३/२०२६ प्रोसेस नं.८५०२/२०२६
चौ.ता. १८/०८/२०२६ दिनांक : ०८/०७/२०२६

अर्जदार : १. हरीदास अजाबराव मालवे रा. गजानन महाराज मंदिराच्या मागे, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. रजनी रमेश सोनोने रा. ओंकारेश्वर मंदिर जवळ, बाजोरीया लेआउट, आनंद नगर, धोबी खदान, अकोला.ता. जि. अकोला. ३. सौ. गायत्री बाळकृष्ण सोळंके रा. गजानन महाराज मंदिराच्या मागे, आनंद नगर, हिंगणा रोड, अकोला. ता. जि. अकोला. ४. सौ. कविता अमरसिंग ठाकूर रा. श्रद्धा ज्ञानदीप कॉन्व्हेंट, जैन नगदा सोसायटी, समता कॉलनी, खामगाव, ता. खामगाव, बुलढाणा. ५ सौ. चेतना अंबरसिंग सोळंके रा. अडगाव, ता. मोर्शी, जि. अमरावती. ६. सौ. वैशाली पांडुरंग सोळंके रा. अकोट रोड, सन सिटी कॉलनी, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : पंचफुलाबाई हरीदास मालवे
पत्ता :- रा. आनंद नगर, गजानन महाराज मंदिर मागे, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत पंचफुलाबाई हरीदास मालवे यांचे दि. ०१/१२/२०२५ रोजी आनंद नगर, हिंगणा रोड, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १४७०/२०२६ प्रोसेस नं.११०३१/२०२६
चौ.ता. १२/१०/२०२६ दिनांक : २८/०८/२०२६

अर्जदार : १. जगदिश पन्नालाल बमण २. भोला पन्नालाल बमण दोघेही रा. बापु नगर, आपातापा रोड, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. लक्ष्मी दशरथ मोदी रा. संजय नगर, कॉलनी गल्ली नं २, भोपाल ता. जि. भोपाल

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : १. पन्नालाल सुखलाल बमण २. रमा पन्नालाल बमण
पत्ता :- रा. व्दारा जगदिश पन्नालाल बमण रा. बापु नगर, आपातापा रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत पन्नालाल सुखलाल बमण यांचे दि. १७/१०/२०२२ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत रमा पन्नालाल बमण यांचे दि. २५/०६/२००४ रोजी मेडिकल कॉलेज हॉस्पिटल, नागपूर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २८/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १४६७/२०२६ प्रोसेस नं.११०३२/२०२६
चौ.ता. १२/१०/२०२६ दिनांक : २८/०८/२०२६

अर्जदार : १. श्रीमती ममता राजेंद्र दंडे २. अदिती राजेंद्र दंडे दोघेही रा. जलाराम शाळा ४ जवळ, निलकमल कॉम्प्लेक्स, मराठा नगर, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : राजेंद्र अनंतराव दंडे
पत्ता :- रा. जलाराम शाळा ४ जवळ, निलकमल कॉम्प्लेक्स, मराठा नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजेंद्र अनंतराव दंडे यांचे दि. २९/०७/२०२६ रोजी पुणे येथे निधन झाले आहे.वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २८/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १४९२/२०२६ प्रोसेस नं.१११९०/२०२६
चौ.ता. १४/१०/२०२६ दिनांक : ०२/०९/२०२६

अर्जदार : १. धर्मपाल तानबाजी घरडे २. सुमीत धर्मपाल घरडे ३. सनी धर्मपाल घरडे सर्व रा. समता नगर, जुना तारफैल, नायगाव रोड, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : सरला धर्मपाल घरडे (लग्नापूर्वीचे नाव सरला वामन वाघमारे)
पत्ता :- रा. समता नगर, जुना तारफैल, नायगाव रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, सरला धर्मपाल घरडे (लग्नापूर्वीचे नाव सरला वाघमारे) यांचे दि. २९/०९/२०२३ रोजी जुना तारफैल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १४/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १५०६/२०२६ प्रोसेस नं.१११८१/२०२६
चौ.ता. २२/१०/२०२६ दिनांक : ०१/०९/२०२६

अर्जदार : १. रामकृष्ण पुंजाजी गवई २. सागर रामकृष्ण गवई ३. दिपक रामकृष्ण गवई ४. राहुल रामकृष्ण गवई सर्व रा. मु. पो. कापशी तलाव, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : गिता रामकृष्ण गवई
पत्ता :- रा. व्दारा रामकृष्ण पुंजाजी गवई रा. मु. पो. कापशी तलाव, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गिता रामकृष्ण गवई यांचे दि. ०१/०७/२०२६ रोजी राहते घरी कापशी तलाव, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

सर्वत्र जनतेस वित्तीय संस्थाना बँकांना या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते कि आमचे पक्षकार पिरामल फायनान्स लि. शाखा- अकोला ता. जि अकोला यांनी ग्राहक नामे सौ. दिशा विशाल इंगळे रा. बेलुरा खु. ता. पातूर जि. अकोला यांनी आमचे पक्षकाराकडे सदरची मिळकत गहाण ठेऊन कर्ज मिळण्या करीता अर्ज केला आहे.

मालमत्तेचे वर्णन : मौजे -बेलुरा खु . मालमत्ता क्र.१०२/३, अनु.क्र.१०६ घर क्र.१०६ क्षेत्रफळ ५४४.५ चौ.फु. त्यावरील बांधकामासह ग्रा. पंचायत बेलुरा खु. हद्दीतील, ता. पातूर जि. अकोला

त्यास चतुर्सिमा : पूर्वेस :- पदमिनी भास्कर इंगळे पश्चिमेस :-मनोहर शंकर इंगळे उत्तर :- मुख्य रस्ता दक्षिण :- काशीराम डी. इंगळे यांचा खुला प्लॉट , वरील सदरहू मालमत्ता हि श्री. विशाल काशीराम इंगळे यांची वडिलोपार्जित मालमत्ता आहे. तरी वरील मालमत्तेवर आज रोजी कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्कसंबंध, खरेदी, गहाण, बोजा व ईसार व इतर काही व्यवहार असल्यास वर दिलेल्या पत्त्यावर ७ दिवसाच्या आत लेखी हरकत नोंदवावी अन्यथा कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नाही. असे समजून आमचे पक्षकार पिरामल फायनान्स लि. शाखा - अकोला वरील मालमत्ता गहाण ठेऊन वरील ग्राहक यांना कर्जाची रक्कम वितरित करतील त्या नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करीता जाहीर नोटीस.

दिनांक : ०८/०९/२०२६
ठिकाण : अकोला

अधिवक्ता रुपेश ना. इस्तापे
(नोटरी भारत सरकार)
ऑफीस: आनंद बेकरी जवळ, रामदास पेठ, अकोला
मो. ९४२३४३०१७१

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २७०
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

एसटी बँकेत ३४ कोटींच्या खरेदीचा 'खेळ'

चंद्रपूरपासून चौकशीला सुरुवात, वर्धा शाखेचीही लवकरच झाडाझडती - श्रीरंग बरगे यांचा गंभीर आरोप

वर्धा/जनमाध्यम

राज्यातील तब्बल ६३ हजार एसटी कर्मचाऱ्यांचे आर्थिक हित जपणाऱ्या स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँकेत तब्बल ३४ कोटी रुपयांच्या कथित खरेदी गैरव्यवहाराने खळबळ उडाली आहे. फर्निचरपासून एसी, सीसीटीव्ही, बायोमेट्रिक यंत्रणा, संगणक, प्रिंटर, स्कॅनर आणि इन्व्हर्टर-बॅटरीपर्यंतच्या खरेदीत नियमांना केराची टोपली दाखवण्यात आल्याचा आरोप महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला. या कथित गैरव्यवहाराची चौकशी सुरू झाली असून चंद्रपूर शाखेपासून तपासाला सुरुवात झाली आहे. वर्धा शाखेतील व्यवहारांचीही लवकरच चौकशी होणार असल्याचा दावा बरगे यांनी केला.बरगे यांनी मंगळवारी वर्धा जिल्ह्यातील एसटीच्या सेवाग्राम आणि एमआयडीसी येथील विभागीय कार्यालयांना भेट देऊन कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी वर्ध्याचे नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांनीही प्रथमच एसटी विभागीय कार्यालयाला भेट दिली. कर्मचाऱ्यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले.

निविदा कागदावर, आगाऊ रक्कम मात्र १०० टक्के

बँकेतील विविध खरेदी प्रक्रियेत वरिष्ठ अधिकारी आणि काही संचालकांनी ठराविक पुरवठादारांशी संगनमत करून निविदा प्रक्रिया राबवल्याचा गंभीर आरोप बरगे यांनी केला. काम पूर्ण झालेले नसतानाही तसेच साहित्याचा पूर्ण पुरवठा झालेला नसतानाही काही कंत्राटदारांना १०० टक्के आगाऊ रक्कम देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. परफॉर्मन्स बँक गॅरंटी न घेता आणि सुरक्षा ठेव न कापताच देयके करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

काही शाखांनी मागणी केलेली नसतानाही साहित्याची खरेदी करण्यात आली. पुरवठा किंवा काम पूर्ण झाल्यानंतर संबंधित शाखांकडून आवश्यक प्रमाणपत्रे घेण्यात आली नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. काही ठिकाणी कामे अपूर्ण असून साहित्याचा दर्जाही निकृष्ट असल्याचे बरगे यांनी म्हटले.

६.५३ कोटींच्या संगणक खरेदीवरही प्रश्नचिन्ह

बरगे यांच्या माहितीनुसार सीसीटीव्ही यंत्रणेसाठी १.१५ कोटी, बायोमेट्रिकसाठी २६.७८ लाख, नोट काउंटिंग मशीनसाठी ११.१३ लाख, डेस्कटॉप, प्रिंटर आणि स्कॅनरसाठी तब्बल ६.५३ कोटी, एसीसाठी ९९.७२ लाख, इन्व्हर्टर-बॅटरीसाठी ६७.६५ लाख आणि ऑफिस खुर्च्यांसाठी ३३.४९ लाख रुपये खर्च करण्यात आले.फर्निचर आणि दुरुस्तीच्या तीन कामांसाठी अनुक्रमे १६.७० कोटी, ३.३४ कोटी आणि ३.९१ कोटी रुपयांचे करार करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

'खरेदी'च्या नावाखाली बँकेच्या पैशांची उधळपट्टी?

मुख्य कार्यालयासह ५० हून अधिक शाखांसाठी झालेल्या खरेदीला आवश्यक इंडेंट किंवा औपचारिक मागणीपत्रेच उपलब्ध नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. बाजारभावाचे योग्य मूल्यमापन न करता फुगवलेल्या दराने खरेदी करण्यात आल्याचे बरगे यांनी म्हटले आहे.पुरवठादार, अधिकारी आणि संचालक यांच्या बँक खात्यांची तसेच आर्थिक व्यवहारांची सखोल तपासणी झाल्यास या कथित गैरव्यवहाराचे आर्थिक धागेदोरे समोर येतील, असा दावा त्यांनी केला. काही संचालकांनी लाखो रुपयांची आगाऊ रक्कम घेऊन ती कोणतेही व्याज न भरता परत जमा केल्याचे पुरावे बँकेच्या दप्तरी असल्याचाही आरोप त्यांनी केला.या संपूर्ण प्रकरणाची ईओडब्ल्यू आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करून दोषी कंत्राटदारांवर गुन्हे दाखल करावेत, त्यांना काळ्या यादीत टाकावे, तसेच दोषी अधिकारी आणि संचालकांवर विभागीय व फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी बरगे यांनी केली. कथित गैरव्यवहारामुळे बँकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधित अधिकारी, संचालक आणि कंत्राटदारांकडून वसूल करावे, अशी मागणीही त्यांनी केली.यावेळी प्रमोद गुंडतवार, पुष्पा तपासे, अल्केश वर्घने, अतुल तेलंग, आशिष कोहळे, हरीश बन्नगरे, प्रीतम कोल्हे, रमेश कांबळे, दिनेश आत्राम, परचाके आदी पदाधिकारी उपस्थित होते.

माणिकवाडा शिवारात अस्वलीचे दर्शन; शेतकऱ्यांमध्ये दहशत

वनविभागाची गस्त वाढली; पाच कर्मचाऱ्यांचे पथक तैनात, कॅमेऱ्यांतून हालचालींवर नजर

आष्टी शहीद/जनमाध्यम

आष्टी तालुक्यातील माणिक वाडा परिसरातील कोल्हा शेत शिवारात अस्वलीचे दर्शन झाल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतीची कामे सुरू असताना वन्यप्राण्याचा वावर आढळल्याने शेतकऱ्यांमध्ये घबराट पसरली आहे.

अस्वलीच्या दर्शनाची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. परिसराची पाहणी करून वन्यप्राण्याच्या हालचालींचा मागोवा घेण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी वनविभागाने गस्त वाढवली असून पाच कर्मचाऱ्यांचे पथक तैनात करण्यात आले आहे. तसेच जागोजागी कॅमेरे लावून अस्वलीच्या हालचालींवर नजर ठेवली जात आहे.

वनपाल देविदास धुर्वे हे पथकासह परिसरातील परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. कापूस आणि सोयाबीनच्या शेतांमध्ये काम सुरू असल्याने शेतकऱ्यांना अस्वलीचा सामना होण्याची भीती आहे. त्यामुळे एकट्याने शेतात जाऊ नये, विशेषत सकाळी आणि सायंकाळी सावधगिरी बाळगावी, असे आवाहन वनविभागाने केले आहे.

आष्टी तालुक्यात यापूर्वी वाघ आणि रानडुक्करांचा वावर वाढल्याने शेतकरी त्रस्त आहेत. त्यातच आता अस्वलीचे दर्शन झाल्याने चिंता आणखी वाढली आहे.

अस्वलीचा वावर नेमका किती परिसरात आहे, याचा शोध वनविभाग घेत असून नागरिकांनी वन्यप्राणी दिसल्यास तातडीने वनविभागाला माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

सण आनंदाचे की ध्वनिप्रदूषणाचे? डिजे-डॉल्बीविरोधात अंनिस आक्रमक

वर्धा/जनमाध्यम

सण उत्सव आनंदाचे असावेत, ध्वनिप्रदूषणाचे नव्हे, अशी ठाम भूमिका घेत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने वर्धा जिल्ह्यात डिजे, डॉल्बी आणि लेझर किरणांच्या वापरावर कायमस्वरूपी बंदी घालण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन देण्यात आले.

काहींच्या आनंदासाठी सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना वेठीस धरणाऱ्या कर्णकर्कश आवाजावर प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी समितीने केली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे उल्लंघन प्रशासनाच्या उपस्थितीत होऊ नये, यासाठी प्रभावी अंमलबजावणीची गरजही व्यक्त करण्यात आली.

पुण्यात डॉल्बीला विरोध करून विवेकी आणि पर्यावरणपूरक भूमिका मांडणारे विद्यानंद बापट यांच्यावर झालेल्या हल्ल्याचाही समितीने तीव्र निषेध केला. विचारांना हिंसेने उत्तर देणे ही लोकशाहीची शोकांतिका असल्याचे समितीने म्हटले.निवेदनावेळी गजेंद्र सुरकार, अशोक हेडावू, दिलीप गुळघाणे, विकास पाटील, बबिता नेगी, चंद्रशेखर कुंभारे, घनश्याम गोखे, दिलीप राईकवार, प्रविण जारी आदी उपस्थित होते.

वर्धा जिल्ह्यात राष्ट्रीय पोषण माह उत्साहात

वर्धा/जनमाध्यम

महिला व बाल विकास विभाग, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांच्या माध्यमातून जिल्ह्यात ९ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर या कालावधीत राष्ट्रीय पोषण माह विविध जनजागृतीपर उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे.

'आमची अंगणवाडी, आमची जबाबदारी' या संकल्पनेच्या माध्यमातून अंगणवाडी केंद्रांमध्ये बालकांचे पोषण, आरोग्य, संगोपन व सर्वांगीण विकास याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

पोषण माहाच्या माध्यमातून कुपोषणमुक्त व सुपोषित वर्धा घडविण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

स्थानिक पौष्टिक आहारावर भर : अंगणवाडी केंद्रांमध्ये उपलब्ध स्थानिक व हंगामी पौष्टिक पदार्थांचा आहारात समावेश करण्याबाबत पालकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. ताजा व गरम शिजविलेला आहार, आहाराची गुणवत्ता, स्वच्छता तसेच आरोग्यदायी आहाराच्या सवयी याबाबत विशेष जनजागृती केली जाणार आहे.

बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी उपक्रम : ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक व सामाजिक विकासासाठी अंगणवाडी केंद्रांमध्ये विविध ईसीडी व पूर्व-प्राथमिक शिक्षणावर आधारित उपक्रम घेण्यात येणार आहेत.

पालकांच्या सहभागातून बालकांच्या विकासासाठी घरच्या घरी करता येणाऱ्या कृतींबाबतही मार्गदर्शन केले जाणार आहे.

पोषण, आरोग्य व स्वच्छतेबाबत जनजागृती : पोषण माहदरम्यान गर्भवती व स्तनदा माता, किशोरवयीन मुली, बालके व पालक यांच्यासाठी पोषण, आरोग्य, स्वच्छता, ॲनिमिया प्रतिबंध, स्तनपान, पूरक आहार व निरोगी जीवनशैली याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका, आरोग्य विभागातील कर्मचारी, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच स्वयंसेवी संस्थांच्या सहभागातून विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

'पोषण ही केवळ एका विभागाची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे' या भावनेतून नागरिकांनी पोषण माहतील उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन महिला व बाल विकास विभागाकडून करण्यात आले आहे.

गर्भलिंग निदान व अवैध गर्भपाताची माहिती देण्याचे आवाहन

वर्धा/जनमाध्यम

पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत बेकायदेशिर गर्भलिंग निदान व अवैध गर्भपात करणे गुन्हा आहे. बेटी बचाव बेटी पढाओ मोहिमेंतर्गत जिल्ह्यामध्ये या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, जनसामान्यांना कायद्याची माहिती होण्याकरीता तसेच जिल्ह्यामध्ये कोठेही बेकायदेशिर गर्भलिंग निदान व अवैध गर्भपात होत असल्याची माहिती असल्यास नागरिकांनी तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.बेकायदेशिर गर्भलिंग निदान व अवैध गर्भपात होत असल्यास त्याबाबतची तक्रार नोंदविण्याकरीता व याकरीता प्रवृत्त करणाऱ्या दोषीवर कायदेशिर कार्यवाही करण्याकरीता व तक्रारीकरीता १८००२३३४४७५, १०४ नि:शुल्क हेल्पलाईन वर तसेच www.amchimulgimaha.in या संकेत स्थळावर तक्रार नोंदवावी. तसेच खबरी योजनेंतर्गत माहिती देणाऱ्या व्यक्तीला सदर बाबतीत न्यायालयात प्रकरण दाखल केल्यानंतर १ लाख रुपयाचे बक्षिस देण्यात येणार येईल, असे जिल्हा शल्य चिकित्सक तथा पीसीपीएनडीटी समुचित प्राधिकरण यांनी कळविले आहे.

सारंगगारात पाणपक्ष्यांचा संसार; ६४६ घरट्यांची नोंद

हिंगणघाट/जनमाध्यम

शहरातील तहसील कार्यालय, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद उपअभियंता कार्यालय परिसरातील ३९ झाडांवर पाणपक्ष्यांनी उभारलेल्या सारंगगारात यंदा सहा प्रजातींची तब्बल ६४६ घरटी आढळली. निसर्गसाथी फाउंडेशन आणि महाराष्ट्र पक्षिमित्र यांच्या संयुक्त विद्यमाने ६ सप्टेंबर रोजी दुसऱ्या टप्प्यात घरटी गणना करण्यात आली.

गाय बगळा १०७, छोटा बगळा ५६, छोटा पानकावळा २७, भारतीय पानकावळा १, रात ढोकरी ४० आणि मोठा बगळा ३ अशी नोंद झाली. यातील २३४ घरटी सक्रिय, तर ४१२ घरटी वापरलेली अथवा निष्क्रिय आढळली. यापूर्वी ७ जून रोजी ४३८ घरटी नोंदली होती. दोन्ही टप्प्यांत मिळून १ हजार ८४ घरट्यांची नोंद झाली आहे.

दरम्यान, नव्याने करंजाच्या झाडाची विणीसाठी निवड करण्यात आली. मात्र परिसरातील अस्वच्छता आणि दुर्गंधीमुळे गणनेत अडथळे आले. पावसाचे प्रमाण कमी असल्याने खाद्यटंचाई निर्माण होऊन पिल्लांच्या मृत्यूचे प्रमाण वाढल्याचे पक्षी अभ्यासकांनी सांगितले. या जैवविविधतेच्या वारशाचे स्वच्छता, संरक्षण आणि संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले.

शेती साहित्य चोरी

समुद्रपूर - शेत परिसरात ठेवण्यात आलेले शेती उपयोगी साहित्य अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या चोरीत दोन जुने वापरातील रोटावेटर, पेरणी यंत्र, पाटी, बेडनेकर आणि नागर यासह सुमारे दीड लाख रुपये किमतीचे साहित्य चोरीला गेले.फिर्यादीच्या तक्रारीनुसार, शेत परिसरात रोटावेटर व इतर शेती साहित्य ठेवण्यात आले होते. काही दिवसांनंतर साहित्याची पाहणी केली असता ते जागेवर आढळून आले नाही. गावात तसेच परिसरात चौकशी केली असता कुणीही साहित्य नेल्याचे समोर आले नाही. त्यामुळे अज्ञात चोरट्यांविरोधात पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी प्रकरणाची नोंद करून तपास सुरू केला असून, चोरीस गेलेल्या साहित्याचा शोध घेतला जात आहे.

दुबई टूरच्या नावाखाली ठकबाजी

वर्धा - दुबईला फिरण्यासाठी विमान तिकिटांचे बुकिंग करून देण्याच्या नावाखाली तरुणाची तब्बल ३ लाख २८ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी रामनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, दुबई सहलीसाठी एजन्सीशी संपर्क साधण्यात आला होता. संबंधितांनी विमान तिकिटांसाठी पैसे मागितल्यानंतर फिर्यादीने विविध ऑनलाइन माध्यमातून रक्कम पाठवली. त्यानंतर तिकिटांच्या तारखेत बदल करावा लागेल, असे सांगण्यात आले. पुढे पैसे परत मागितल्यावर खाते गोठविल्याचे कारण सांगण्यात आले. काही दिवस प्रतीक्षा करूनही पैसे परत मिळाले नाहीत. संबंधितांना फोन केला असता तो बंद आढळून आला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने पोलिसांकडे धाव घेतली. रामनगर पोलिस तपास करीत आहेत.

महिलेची फसवणूक

हिंगणघाट - सोन्याची अंगठी खरेदी करण्याच्या बहाण्याने महिलेची फसवणूक केल्याची घटना हिंगणघाट परिसरात घडली. या प्रकारात सुमारे ४५ हजार रुपये किमतीची लेबल असलेली सोन्याची अंगठी लंपास करण्यात आली.फिर्यादीच्या तक्रारीनुसार, लाल रंगाचे कपडे परिधान केलेली एक महिला सोन्याची अंगठी विकण्याच्या बहाण्याने आली होती. तिने विश्वास संपादन करून अंगठी दाखविली. व्यवहारादरम्यान संबंधित महिलेने अंगठी घेऊन फसवणूक केल्याचे फिर्यादीच्या लक्षात आले. अंगठीची किंमत सुमारे ४५ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकारानंतर पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी तक्रारीवरून प्रकरणाची नोंद करून संबंधित महिलेचा शोध सुरू केला आहे. परिसरातील माहिती आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे तपास केला जात आहे.

वृध्दाला मारहाण

हिंगणघाट - आजाबांना वारंवार मारण्याची धमकी देत असल्याचा जाब विचारल्याने तरुणीला शिवीगाळ करून लाकडी दांड्याने मारहाण केल्याचा प्रकार हिंगणघाट परिसरात घडला. या मारहाणीत फिर्यादीच्या हातापायाला दुखापत झाली असून, पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे.फिर्यादी आपल्या आजोबांना भेटण्यासाठी त्यांच्या घरी गेली होती. यावेळी आजोबांनी आपला नातू नेहमी मारण्याची धमकी देत असल्याचे सांगितले.

त्यानंतर फिर्यादीने संबंधित आरोपीला याबाबत जाब विचारला. यावरून वाद निर्माण झाला. आरोपीने शिवीगाळ करीत हाताने तसेच लाकडी दांड्याने फिर्यादीच्या हातापायावर मारहाण केल्याचा आरोप आहे. एवढेच नव्हे तर केस पकडून खाली पाडल्याचेही तक्रारीत नमूद आहे. घटनेनंतर जखमी महिलेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. पोलिसांनी तक्रारीवरून पुढील तपास सुरू केला आहे.

धमकीप्रकरणी तक्रार

खरांगणा - जुन्या वादाचा राग मनात धरून शिवीगाळ करीत धमकी दिल्याची तक्रार खरांगणा पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. संबंधित व्यक्तीने पूर्वी पोलिसांच्या मदतीने वाहन बोलावल्याच्या कारणावरून फिर्यादीशी वाद घातल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

फिर्यादीच्या म्हणण्या नुसार, आरोपीने त्याला उद्देशून अश्लील भाषेत शिवीगाळ केली. तसेच जुन्या घटनेचा संदर्भ देत पोलिसांत तक्रार करून गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे फिर्यादीने पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तक्रारीची नोंद करून प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

धमकी देण्यामागील कारण तसेच दोन्ही पक्षांतील पूर्वीचा वाद याची माहिती पोलिसांकडून घेतली जात आहे. पुढील कारवाई तपासाअंती केली जाणार आहे.

गॅसचा वनवास संपला

आष्टी शहीद/जनमाध्यम

आष्टी तालुक्यातील गॅस ग्राहकांना तब्बल ४५ दिवसांच्या प्रतीक्षेतून अखेर दिलासा मिळाला आहे. आता ग्राहकांना २५ दिवसांत सिलिंडर बुकिंग व वाटप करण्याचे आदेश संबंधित गॅस एजन्सीला प्राप्त झाले आहेत. त्यामुळे वर्षभरापासून सुरू असलेल्या गॅस टंचाईच्या समस्येला काही प्रमाणात आळा बसण्याची शक्यता आहे.

आष्टी शहरातील अनुसया गॅस एजन्सीशी तालुक्यातील १७ हजारांहून अधिक ग्राहक जोडलेले असून, त्यापैकी सुमारे सात हजार ग्राहक शहरातील आहेत. एवढ्या मोठ्या ग्राहकसंख्येचा भार एका एजन्सीवर असल्याने मागील वर्षभरापासून सिलिंडर बुकिंगसाठी ४५ दिवस प्रतीक्षा करावी लागत होती. त्यानंतरही प्रत्यक्ष सिलिंडर मिळण्यासाठी आठ ते दहा दिवस लागत होते. त्यामुळे ग्राहकांना अतिरिक्त सिलिंडरसाठी दोन हजार रुपयांपर्यंत खर्च करावा लागत होता.गॅसअभावी महिलांचे स्वयंपाकाचे नियोजन कोलमडले होते. ग्राहकांच्या तक्रारीनंतर प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. अखेर ६ सप्टेंबर रोजी २५ दिवसांत सिलिंडर बुकिंग व वितरणाचे आदेश देण्यात आले.

या निर्णयामुळे ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १४ **अंक** - २८३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

भजन-कीर्तनात भक्तिरसाची बरसात; रासगरब्याने रंगला जन्मोत्सव

देवळी/जनमाध्यम

गायत्रीदेवी मोहनलाल अग्रवाल सेवा संस्थेच्या वतीने बसस्थानकासमोरील श्रीराम राधाकृष्ण देवस्थानात भगवान श्रीकृष्ण जन्मोत्सव व नंदोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. भजन-कीर्तन आणि रास गरब्याच्या तालावर भाविक मंत्रमुग्ध झाले.

अरविंद बटाले यांच्या सुर संगम म्युझिकल ग्रुपच्या कलाकारांनी भक्तिगीते व कीर्तन सादर केले. कळंब येथील गायिका दिव्या शेंडे व गायक प्रभाकर वऱ्हाडे यांनी राधा-कृष्ण, राम आणि रामदेव बाबांची सुंदर भजने सादर केली.

त्यांना तबल्यावर प्रशांत खाडे, ऑक्टोपॅडवर श्रीहरी भगत, ऑर्गनवर सतीश खांडेकर व ढोलकवर प्रदीप मैसकर यांनी साथ दिली.मुलींनी सादर केलेल्या राधा-कृष्ण नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. राजस्थानी महिला मंडळाच्या रासगरब्याने कार्यक्रमाला विशेष रंगत आणली. महिलांनीही श्रीकृष्ण जन्माचा आनंद नृत्यातून व्यक्त केला.

नरेश जोशी यांनी सपत्नीक नंदबाबा व यशोदा मैयाची भूमिका साकारली. भजनानंतर आरती, बधाई गीत, झुला दर्शन, प्रसाद व अल्पोपहाराचे वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन व आभार महेश अग्रवाल यांनी मानले. कार्यक्रमासाठी दिनेश अग्रवाल, अरुण सांबरे, नरेश अग्रवाल, नेने महाराज, पवन दुबे, अरविंद बटाले, मनीष अग्रवाल आदींनी सहकार्य केले.

वाघाच्या हल्ल्यात मृत शेतकरी दिनेश आवारे यांच्या वारसाला शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी बच्चू कडूंच्या पाठपुराव्याला यश

कु. विशाखा दिनेशराव आवारे यांना वन विभागाकडून नियुक्ती आदेश; कायमस्वरूपी शासकीय नोकरीसाठी प्रस्ताव

अमरावती - वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या शेतकरी दिनेश शंकरराव आवारे यांच्या कुटुंबातील वारसाला शासकीय नियमानुसार शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी आमदार बच्चू कडू यांनी लावून धरली होती. या मागणीसाठी त्यांनी वनमंत्री श्री. गणेश नाईक यांच्यासोबत वारंवार चर्चा करून सातत्याने पाठपुरावा केला. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांना केवळ आर्थिक मदत न देता वारसाला शासकीय सेवेत सामावून घेण्याची ठोस भूमिका बच्चू कडू यांनी विधानपरिषदेतही मांडली होती. त्याच भूमिकेच्या आधारे दिनेश आवारे यांच्या कुटुंबासाठी त्यांनी वन विभागाकडे पाठपुरावा केला. दिनेश आवारे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबीयांनीही वारसाला शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत लेखी आदेश मिळाल्याशिवाय अंत्यविधी न करण्याची ठाम भूमिका घेतली होती. यावेळी बच्चू कडू यांनी वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधून लेखी आदेश मिळाल्याशिवाय मृतदेह उचलला जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका घेतली. या सर्व पाठपुराव्याला आज यश मिळाले असून, उपवनसंरक्षक, अमरावती वनविभाग यांनी दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी कु. विशाखा दिनेशराव आवारे यांना वन विभागात नियुक्तीचा आदेश दिला आहे. नियुक्ती शासनाचा अंतिम निर्णय होईपर्यंत कंत्राटी तत्वावर करण्यात आली असून, कु. विशाखा आवारे यांना नियमित म्हणजेच कायमस्वरूपी शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी त्यांचे प्रकरण विशेष बाब म्हणून शासनाकडे सादर करण्यात येत आहे.

'वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा जीव जातो, तेव्हा केवळ एक व्यक्ती मृत्युमुखी पडत नाही, तर संपूर्ण कुटुंबाचा आधार हिरावला जातो. अशा कुटुंबांना केवळ मदत देऊन शासनाची जबाबदारी संपत नाही. त्यांच्या वारसाला सन्मानाने उभं करण्यासाठी शासकीय सेवेत सामावून घेणं गरजेचं आहे. दिनेश आवारे यांच्या मुलीला आज मिळालेला नियुक्ती आदेश हा त्याच संघर्षाचा परिणाम आहे. ही नियुक्ती तात्पुरती असली तरी कु. विशाखा आवारे यांना कायमस्वरूपी शासकीय सेवेत सामावून घेण्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत आमचा पाठपुरावा थांबणार नाही. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात उद्ध्वस्त होणाऱ्या प्रत्येक शेतकरी कुटुंबाला न्याय आणि जगण्याचा आधार मिळवून देण्यासाठी माझा संघर्ष सुरूच राहील.' - **आ.बच्चू कडू**

नमस्कारी शेतशिवारात बिबट्याच्या पाऊलखुणा आढळल्याने खळबळ

नागरिकामध्ये भीतीचे वातावरण

तिवसा - मोर्शी व चांदूरबाजार तालुक्यात वाघिणीच्या दहशतीची चर्चा कायम असतांना तिवसा तालुक्यातील नमस्कारी शेत शिवारात बिबट्याच्या पाऊलखुणा आढळून आल्याने एकच खळबळ निर्माण झाली आहे. एकीकडे मोर्शी तालुक्यात वाघाने धुमाकूळ घालून तीन नरबळी घेतले,त्यानंतर वाघाचा मृत्यू झाला असला तरी भारवाडी,वरखेड,तिवसा भागात गेल्या ८ दिवसापासून बिबट्याची दहशत निर्माण झाली आहे. अनेक जणांना रात्रीच्या अंधारात बिबट्या दिसल्याची चर्चा विविध ठिकाणी पाहायला मिळाली.आज पुन्हा नमस्कारी शेत शिवारात येणाऱ्या रामकृष्ण कुयटे यांच्या शेत शिवारात बिबट्या असल्याचे स्पष्ट झाले. सोमवारी रात्री तिवसा तालुक्यातील नमस्कारी, जावरा, फत्तेपुर, बरखेड, वणी ममदापूर भागात जोरदार पाऊस पडला.त्यामुळे आज सकाळी शेतकरी शेतात फेरफटका मारण्यासाठी गेले असता त्यांना मोठमोठ्या पंजाच्या पाऊलखुणा आढळून येतात त्यांनी याबाबत वनविभागाला माहिती दिली असता वनपाल श्री घोरमाडे यांनी सदर पाऊलखुणा ह्या बिबट्याच्या असल्याचे स्पष्ट केले.ज्यामुळे पुन्हा एकदा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने खबरदारी घेण्याचे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

'दृष्टी ते दूरदृष्टी' या प्रेरणादायी संवादातून नव्या पिढीला दिशा

अमरावती - राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा २०२६ निमित्त 'दृष्टी ते दूरदृष्टी' या संकल्पनेतून दिशा एज्युकेशन फाऊंडेशन द्वारे संचालित दिशा इंटरनॅशनल आय बँक यांच्या वतीने नेत्रदाता कुटुंबीयांचा कृतज्ञता व सन्मान सोहळा तसेच प्रेरणादायी संवादाचा विशेष कार्यक्रम अभियंता भवन, शेगाव नाका, अमरावती

येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला माजी राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख; आमदार मा. श्री संजय खोडके; खासदार मा. डॉ. अनिल बोंडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. मान्यवरांनी नेत्रदानाचे महत्त्व अधोरेखित करत या सामाजिक चळवळीला अधिक व्यापक करण्यासाठी सातत्यपूर्ण जनजागृतीची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात दिशा इंटरनॅशनल आय बँके मार्फत नेत्रदान करून समाजातील गरजू व्यक्तींच्या जीवनात प्रकाश निर्माण करणाऱ्या नेत्रदाता कुटुंबीयांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळ्याला विशेष भावनिक आणि प्रेरणादायी स्वरूप लाभले. डॉ. सुनील देशमुख यांच्या मातोश्रीचे, अभिनेता श्री भारत गणेशपुरे यांनी आपल्या आईचे तसेच डॉ. अनिल बोंडे यांच्या वडिलांचे नेत्रदान दिशा इंटरनॅशनल आय बँकेत केले होते. त्यामुळे या मान्यवरांचा नेत्रदाता कुटुंब म्हणून विशेष सन्मान करण्यात आला. या वेळी आमदार मा.श्री संजय खोडके यांनी आपल्या मनोगतात नेत्रदानाचे सामाजिक महत्त्व अधोरेखित केले. अधिकाधिक नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प करून या चळवळीला बळ द्यावे आणि जनजागृतीच्या कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात मित्रम्हणचे संस्थापक श्री. सौमित्र पोटे यांच्या माध्यमातून श्री. प्रद्युम्न ईगळे, Country President & Global Head – Infrastructure, Henkel आणि प्रवासी भारतीय सन्मान पुरस्काराने सन्मानित श्री. अमित वाईकर, President – SEA Region, Momentive यांच्याशी संवादात्मक मुलाखत घेण्यात आली. संवादातून प्रद्युम्न ईगळे आणि अमित वाईकर यांच्या व्यावसायिक प्रवासासोबतच त्यांच्या वैयक्तिक अनुभवांपासून यशापर्यंतचा प्रवास, विविध आव्हाने, आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळविलेली ओळख तसेच विविध पुरस्कारांनी झालेला गौरव याविषयी त्यांनी मनमोकळेपणाने अनुभव व्यक्त केले. या सत्रामुळे उपस्थितांना मान्यवरांच्या जीवनप्रवासाकडे अधिक जवळून पाहण्याची संधी मिळाली. या वेळी श्री. सौमित्र पोटे यांनी १९९३ मध्ये आपल्या मातोश्रीचे नेत्रदान केल्याचा वैयक्तिक अनुभव सांगितला. त्या अनुभवातून मिळालेली प्रेरणा त्यांनी उपस्थितांसोबत शेअर करत, ज्यांनी नेत्रदान केले आहे त्यांनी स्वतःपुरते न थांबता इतरांमध्येही नेत्रदानाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी दिशा एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक श्री. स्वप्नील अरुण गावंडे यांनी दिशाच्या सामाजिक कार्याच्या प्रवासाविषयी मनोगत व्यक्त केले. एका वैयक्तिक अनुभवातून सुरू झालेला नेत्रदान जनजागृतीचा प्रवास पुढे दिशा इंटरनॅशनल आय बँक, नेत्र संकलन केंद्र, फिरते नेत्र चिकित्सालय आणि नेत्रसेवेच्या विविध उपक्रमांपर्यंत पोहोचला आहे. यावेळी त्यांनी नेत्रपेढी चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय सुविधा, प्रशिक्षित कर्मचारी, तांत्रिक व्यवस्था, नेत्र संकलनाची प्रक्रिया तसेच सातत्याने होणारी जनजागृती आणि समाजाचे सहकार्य याबाबत माहिती दिली. नेत्रदानाचा संकल्प करण्यापासून ते दान झालेल्या नेत्रांचे योग्य पद्धतीने संकलन, जतन आणि गरजू व्यक्तीपर्यंत दृष्टी पोहोचविण्यापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया काळजीपूर्वक पार पाडली जाते, असे त्यांनी सांगितले. नेत्रदानाबाबत जनजागृती करण्यापासून सुरू झालेल्या या वाटचालीत आजवर हजारो नागरिकांना नेत्रदानासाठी प्रेरित करण्यात आले असून, ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत नेत्रसेवा पोहोचविण्याचे कार्यही सातत्याने सुरू आहे.

सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे मेट्रो ब्लड बँक व वैद्यकीय उपकरणांसाठी ९ कोटी मंजूर

अमरावता- अमरावती विभागातील पाचही जिल्हातील रुग्णांसाठी आरोग्य वरदान ठरलेल्या विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय,अमरावतीच्या आरोग्य सुविधांमध्ये आता अत्याधुनिक मेट्रो ब्लड बँकेची नव्याने भर पडणार आहे. या संदर्भात अमरावतीच्या आमदार- सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी शासनाकडे पाठपुरावा केल्याने नियोजन विभागाकडून सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, अमरावती मध्ये अत्याधुनिक मेट्रो ब्लड बँकेच्या सुविधेसह इतरही युनिट मधील वैद्यकीय साहित्य व अत्याधुनिक उपकरणांसाठी ९ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. राज्यात अमरावती आणि नाशिक या दोन जिल्ह्यामध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु असून अमरावती मधील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये किडनी रोग, किडनी प्रत्यारोपण, प्लास्टिक सर्जरी, पेडियाट्रिक्स सर्जरी, कार्डियाक युनिक, कॅंसर युनिट व मेंदूरोग सारखे युनिट सुरु आहे. त्यामुळे केवळ अमरावती विभागच नाही तर ग्रामीण भाग, धारणी -मेळघाट सारखा दुर्गम भाग तसेच मध्यप्रदेशाच्या सीमाभागांतून सुद्धा रुग्ण उपचारासाठी दाखल होत असल्याने या ठिकाणी रुग्ण संख्येचा डोलारा दिवसेंदिवस वाढतच आहे. रुग्णसेवेला केंद्रबिंदू मानून व त्यांच्या उपचाराला सर्वोच्च प्राधान्य देऊन रुग्णांना आरोग्याच्या सर्व अत्याधुनिक उपचार सेवा-सुविधा उपलब्ध करण्याला घेऊन आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल प्रशासनासोबत संवाद व समन्वय साधून वारंवार बैठका घेत उपाययोजना करण्यावर भर दिला आहे. दरम्यान सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये जवळपास ७-८ युनिट सुरु असतांना सुद्धा त्या ठिकाणी रक्तपेढी उपलब्ध नसल्याने शल्यक्रिया करतांना रुग्णांकरिता इतर रुग्णालयातील रक्तपेढीतून रक्त उपलब्ध करावे लागत आहे. हि बाबत प्रकर्षाने समोर आल्याने सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक ब्लड बँक स्थापन करण्यासंदर्भात आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांच्या वतीने सूचना करण्यात आली असता रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक - डॉ. अमोल नगेटे यांनी तसा प्रस्ताव जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय,अमरावती मार्फत शासनाकडे पाठविण्यात आला. तदनंतर आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी शासन - प्रशासन स्तरावर पाठपुरावा करून अमरावतीच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये सर्वच प्रकारच्या जटिल व दुर्धर आजारांवर शल्यक्रिया होत असून अतिदक्षतेच्या सुविधा पुरविण्यात येत असतांना त्या ठिकाणी ब्लड बँक स्थापन करण्याची नितांत गरज असल्याबाबत शासन -प्रशासनाला वेळोवेळी अवगत केले. तसेच नियोजन विभागाने एखाद्या आरोग्याच्या लेखा-शीर्षा खाली निधीची तरतूद करून भरीव निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. अशातच आता सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना -सन २०२६-२०२७ योजने अंतर्गत लेखाशिर्ष -२२१० जे ५६४ मधील रुग्णालयासाठी औषधी साठा, साहित्य व वैद्यकीय संसाधने व उपकरणे खरेदी करणे या योजनेतून सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अमरावती येथे ४.९४ कोटी निधीतून अत्याधुनिक व सर्व वैद्यकीय संसाधनांनी परिपूर्ण अशी मेट्रो ब्लड बँक (पॅथॉलॉजी व लॅबोरेटरीसह) साकारण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच याच लेखशीर्षावर वर्ष २०२६-२७ करिता सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील इतर युनिट मध्ये वैद्यकीय साहित्य , संसाधने , उपकरणे व मशीन, सोलर पॅनल, तसेच रुग्णांसाठी चांगल्या उपचार सुविधा निर्माण करणारा च्या दृष्टीने ४.४१ कोटीच्या खर्चास देखील नियोजन विभागाकडून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांच्या पाठपुराव्यामुळे आता सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अमरावती करिता एकंदरीत ९ कोटींचा निधी मंजूर झाल्याने रुग्णालयाला नवी आरोग्य संजीवनी प्रदान झाली आहे.

विदेशी संशोधकाची संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाला भेट

अमरावती - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाला विदेशी संशोधकांनी भेट देऊन विभागातील संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांशी संवाद साधला. यावेळी समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.के.बी. नायक, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. वर्षा नाठार, डॉ.के.सी. मोरे उपस्थित होते.

याप्रसंगी विदेशी संशोधक प्रसार माध्यम एक्सपर्ट जस्मिन सुंग (जर्मनी), मेडिकल एक्सपर्ट ग्रेस एम (युएसए), स्त्री अभ्यास एक्स्पर्ट इस्थरजी (बोस्टन अमेरिका) व वैज्ञानिक मर्षी प्रभुदास (सिंगापूर) यांनी विविध सामाजिक, आर्थिक आणि ग्रामीण प्रश्नांवर समाजशास्त्र विभागातील सर्व संशोधक व पदव्युत्तर विद्यार्थ्यांशी सविस्तर चर्चा केली. या भेटीदरम्यान विदेशी संशोधक एक्सपर्ट यांनी संशोधक विद्यार्थ्यांशी चर्चा करून त्यांच्या संशोधनाविषयी माहिती जाणून घेतली.

यावेळी आदिवासी कुटुंबाच्या समस्यां, शेतक-यांची ग्रामीण व नागरी भागातील सामाजिक आणि आर्थिक समस्यां तसेच भारतीय समाजावर पडलेला आय.सी.टी व सोशल मीडियाचा प्रभाव आदी विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. या संवादामुळे समाजशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना नवीन संशोधन दृष्टिकोन मिळाला. विविध सामाजिक प्रश्नांवर संशोधनाच्या माध्यमातून उपाय शोधण्यासाठी अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय संशोधकांच्या संवादाचे अधिक महत्त्व असून या भेटीमुळे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या संशोधन कार्याला आंतरराष्ट्रीय पातळीवर नवीन दिशा मिळण्यास मदत होणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली. प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ.के.बी. नायक, अतिथींचा परिचय डॉ. वर्षा नाठार, सूत्रसंचालन प्रा.डॉ. रोहिणी देशमुख यांनी, तर आभार डॉ. रोहिणी देशमुख यांनी मानले. या भेटीदरम्यान विभागातील शिक्षक, संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते.

शिराळा परिसरातील पाण्याअभावी पिके संकटात. शेतकरी चिंताग्रस्त खरीप हंगाम हातचा जाण्याची भीती

शिराळा - शिराळा परिसरातील पाण्याअभावी पिके संकटात सापडली आहेत.गेल्या एक महिन्यापासून पाऊस गायब झाला आहे.पिके माना टाकू लागली आहे.त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहे.खरीब हंगाम हातचा जाण्याची भिती शेक-यांनी व्यक्त केली आहे. पावसाने प्रदिर्घ उघाड दिल्याने शिराळा परिसरातील खरीप

पिकाची स्थिती अत्यंत बिकट झाली आहे.पावसा अभावी पिके करपण्याच्या मार्गावर आहेत.एकदोन दिवस एकसारखा पाऊस आल्यास कपासी व तुर पिकांला काही प्रमाणात दिलासा मिळु शकतो.पाऊस गायब झाल्यामुळे पिकेः ऑक्सिजनवर आहे . कापसावर मावा तुडतुडे फुलकिडे पांढरी माशी प्रादुर्भाव दिसत आहे . सोयाबीनवर यलो-मोझॅकचा प्रादुर्भाव दिसत आहे त्यामुळे पावसाअभावी पिकले पडत आहे.महाराष्ट शासनाने शिराळा परिसरातील पिकाचा सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी अशी शिराळा परिसरातील शेतकऱ्यांची मागणी केली आहे.

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.४११/२०२६ ने.सा.०८.१०.२०२६

अर्जदार : १. राधाबाई गजानन ढोमाळे, वय ६७ धंदा - घरकाम
२. भिमराव गजानन ढोमाळे, वय ४७ धंदा - शेती
३. बाबु गजानन ढोमाळे, वय ३७ धंदा - शेती
४. अर्जुन गजाननराव ढोमाळे, वय ३३ धंदा - शेती
सर्व रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार जि.अमरावती
५. जया मारोती महाकर, वय ३८ धंदा - घरकाम
रा.धनगरवाडी, सेवादरनगर, वडेली, ता.वरुड, जि.यवतमाळ
-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक गजानन रौंदू ढोमाळे** यांचा मृत्यू दिनांक २६.०५.२०२६ रोजी रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारसा आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसा नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.४११/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्यांच्याशी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत कोणी आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप एका किंवा कसोलमार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सादर कोर्टाकडून कोणताही आक्षेपाची अथवा तक्रारीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१८.०८.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार

शिक्का

जनमाध्यम जनमाध्यम न्यूज ॲण्ड पब्लिकेशन प्रा.लि. च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र.बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वे पुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ०६
आर.एन.आय.एन.नं. 49763/89 पोस्टल रजिस्ट्रेशन क्र. ATI/RNP/47/2017-2020

मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - १८२३०१६३००,१४२२९५८२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@ymail.com

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७३९/२०२६

Sona Muddasir Anwar Shaikh (Sonali Vasant Gondhalekar) - Vs - Rajesh Vasant Gondhalekar

पुढील ता.०६.१०.२०२६

जाहीरनामा/सावदेशन

अर्जदार : 1. Sana Muddasir Anwar Shaikh (Name before marriage) (Sonali Vasant Gondhalekar), Aged about 32 Yrs. Occu.: Pvt.Job. R/o Tulip T-1101, Phase I Aditya Garden City, Oppo.RMD Singhad Technical Institute, Warje, Pune, Tq. Dist.Pune
-- विरुध्द --

गैरअर्जदार : 1. Rajesh Vasant Gondhalekar, Age 56 Yrs. Occu.: Doctor R/o Near Anant Super Bazar, Second Lane, Radha Nagar, Shivaji Nagar Amravati, Tq. Dist. Amravati

सर्व लोकांस सूचित करण्यात येते की, **कळ** Vasant Narayan Gondhalekar हे दिनांक 11.12.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Sana Muddasir Anwar Shaikh (Name before marriage)(Sonali Vasant Gondhalekar) -Vs-Rajesh Vasant Gondhalekar यांनी वरिष्ठमध्ये या कोर्टात सर्व्हा मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यांचा Sana Muddasir Anwar Shaikh (Name before marriage)(Sonali Vasant Gondhalekar) -Vs-Rajesh Vasant Gondhalekar वरिष्ठमध्ये सर्व्हा मयतांचे वारसाचे म्हणे असे कोणास सदरप्रमाणे प्रसिध्द तर या जाहीरनाम्याची प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांचे या कोर्टात हजर लेखून आपला हरकती कागदपत्रे आणि या संबंधिमध्ये दाखे सादर करावे. जर सर्व्हा मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सर्व्हा कोर्ट अर्जदार यांचे प्रमाणपत्रात तसदीस पुरावा घेतल्या शिवाय सर्व्हा मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २७.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

शिक्का

जाहीर सुचना

सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, **श्रीमती विणा अरुण कावळे** यांचे नांवे असलेले खरेदीखत स.र.कचेरी अमरावती श.वि.नं.२ चे कक्षेतील मनपा अमरावतीचे हद्दीतील मौजे बडनेरा, प्रगणे बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.६/२ मधील प्लॉट क्र.५३ याचे क्षेत्रफळ ३००० चौ.फुट या प्लॉटचे मूळ खरेदीखत क्र.१९१८/१९९६ दिनांक ०७.०६.१९९६ हे मूळ खरेदीखत जुनी वस्ती बडनेरा ते नवी वस्ती बडनेरा या दरम्यान गहाळ / हरविलेले आहे.

तरी सदर मूळ खरेदीखत ज्या कोणा व्यक्तीस सापडल्यास त्यांनी माझे खालील नमुद पत्त्यावर आणून द्यावे, ही विनंती.

दिनांक ०८.०९.२०२६

(ॲड.डी.बी.देशमुख)
प्रबोधन कॉलनी, गणेश विहार
नं.१ जवळ, बडनेरा रोड,
अमरावती-४४४६०७
मो.९८२३८२६४००

कार्यालय अचलपूर नगर परिषद, जि.अमरावती
निविदा सूचना
निविदा क्र. साबावि/११/२०२६-२७

नगर परिषद निधी अंतर्गत विविध ठिकाणी नाली, रपट्याचे बांधकाम करणे व छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या आवार भिंतीला रंगरंगोटी करणे, नगराध्यक्ष यांचे दालनात सी.सी.टी.व्ही. सह मॉनिटर बसविणे, गणपती विसर्जनाकरीता पाच ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे इत्यादी कामे करण्याकरीता ऑफलाईन पध्दतीने निविदा मागवित आहेत. कोरे निविदा प्रपत्र प्राप्त करुन घेण्याचा कालावधी दिनांक १५.०९.२०२६ ते दिनांक १८.०९.२०२६ पर्यंत आहे. व निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक १८.०९.२०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत राहील. शक्य झाल्यास निविदा दिनांक २१.०९.२०२६ रोजी उघडण्यात येईल. निविदेसंबंधी सविस्तर अटी व शर्ती बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत नोटीस बोर्डवर पाहता येईल.

दिनांक ०७.०९.२०२६

(धिरजकुमार गोहाड)
मुख्याधिकारी,
अचलपूर नगर परिषद

नगर परिषद कार्यालय, अचलपूर
जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.संजय पंजाबराव लाडोळे**, पत्ता विठ्ठलवाडी, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.३२ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/18289 अुना मालमत्ता क्र. ३२०००८४४ नझुल शिट क्र.२१ प्लॉट नं.६ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **श्री.बसंत शिवराम** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **श्री.संजय पंजाबराव लाडोळे** नावाने फेरफार घेण्याकरीता/नांव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये-बोजामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, वकीलपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **०८.०९.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
पुर्वेस - प्लॉट नं.५६
पश्चिमेस - प्लॉट नं.५४
दक्षिणेस - रोड
उत्तरेस - खाली जागा

शिक्का

मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

राजकमल चौक हुकूमशाही व्यवस्थेचा बनला आरसा

जनता त्रस्त, व्यापारी हवालदिल आणि व्यवस्था स्वतःच्याच विश्वात मग्न

शहरातील व्यवस्थेबाबत माध्यमांनी उपस्थित केलेला प्रश्न केवळ एका चौकापुरता, एका राजकीय पक्षापुरता किंवा एका घटनेपुरता मर्यादित नाही. हे अशा व्यवस्थेचे चित्र आहे, जिथे सर्वसामान्य माणसाची सोय आणि गैरसोय ही कदाचित सर्वात शेवटची प्राथमिकता बनली आहे.

राजकमल चौक जनतेसाठी एक मार्ग की नेत्यांसाठी एक व्यासपीठ?

राजकमल चौक हे अमरावतीचे हृदय आहे. शहराच्या प्रत्येक भागाला जोडणाऱ्या या चौकातील एक रस्ता बंद पडला आहे आणि संपूर्ण भार इतर तीन रस्त्यांवर पडला आहे. सध्या, हा चौक एक महत्त्वाचा थांबा बनला आहे. लाखो लोकांच्या रोजच्या प्रवासासाठी हा एक अत्यावश्यक मार्ग आहे. रुग्णालयात जाणे असो, शिक्षण असो, व्यवसाय असो किंवा प्रशासकीय काम असो,या चौकातून जाणे ही एक गरज आहे.

पण प्रश्न असा आहे की: हा चौक सामान्य नागरिकांच्या सोयीसाठी योग्य आहे का?

सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या चौकात राजकीय कार्यक्रम, शक्तीप्रदर्शन आणि सार्वजनिक कार्यक्रमांना वारंवार परवानगी देऊन कोणती प्रशासकीय बुद्धिमत्ता दाखवली जात आहे.एकाच कार्यक्रमामुळे हजारो नागरिकांचे किती तास वाया जातील याचा पोलीस प्रशासनाने कधी विचार केला आहे का? किती लिटर पेट्रोल आणि डिझेल विनाकारण वाया जाईल? किती रुग्ण, विद्यार्थी, कर्मचारी आणि व्यावसायिक वाहतूक कोंडीत अडकतील?

प्रशासनासाठी हे सर्व 'सर्वसामान्य' झाले आहे?

राजकमल चौक हा सार्वजनिक रस्ता नसून कोणाची तरी खाजगी मालमत्ता आहे का

कधीकधी, परिस्थिती पाहता असे वाटते की, राजकमल चौक हा आता सार्वजनिक रस्ता राहिलेला नाही, तर त्याचा वापर एखाद्या खाजगी लॉन किंवा लग्न समारंभाच्या कार्यालयासारखा केला जात आहे.

आयोजक अर्ज करतात, परवानगी मिळवतात आणि मग आपल्या सोयीनुसार शहराचा सर्वात महत्त्वाचा वाहतुकीचा मार्ग अडवतात.

आणि याचा त्रास कोणाला होतो?

सामान्य नागरिकाला...!

ज्यांच्या नावावर राजकारण खेळले जाते, त्याच लोकांना तासन्तास वाहतूक कोंडीत उभे करून त्यांची परीक्षा घेतली जाते.

ही कसली लोकसेवा?

हे कसले राजकारण?

आणि ही कसली प्रशासकीय व्यवस्था?

राजकीय शक्तीप्रदर्शनाची किंमत जनतेने का मोजावी

कोणताही राजकीय पक्ष असो जर त्याला आपली ताकद दाखवायची असेल, आपली ओळख प्रस्थापित करायची असेल आणि आपला कार्यक्रम यशस्वी झाल्याचे घोषित करायचे असेल तर राजकमल चौकच का?

शहरातील इतर ठिकाणे संपली आहेत का?

राजकीय कार्यक्रमांसाठी पर्यायी जागा शोधणे ही प्रशासन आणि राजकीय पक्षांची जबाबदारी नाही का?

दुर्दैवाने, राजकारण्यांच्या गर्दीला राजकीय यश मानले जाते आणि त्या गर्दीमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीला सार्वजनिक समस्या समजले जाते.

ही कसली असंवेदनशीलता आहे?

निवडणूक लढवताना राजकीय पक्ष ज्या सामान्य नागरिकांच्या हिताचे रक्षण करण्याचा दावा करतात, त्याच नागरिकाचा वेळ, पैसा, इंधन आणि मानसिक शांती हिरावून घेणे, हा त्यांचा विश्वासघात नाही का

ऑनलाइन बाजारपेठ व्यापाऱ्याचे दुकान बंद पाडत आहे

या समस्येला केवळ वाहतुकीचा प्रश्न मानणे ही एक चूक ठरेल.

राजकमल चौकातील वाहतूक कोंडीचा शहराच्या व्यवसायावर थेट परिणाम होतो. ग्राहकांना बाजारात पोहोचायचे असते, परंतु वाटेत त्यांना वारंवार वाहतूक कोंडी, गोंधळ आणि गैरसोयीचा सामना करावा लागल्यास, ते पर्यायी मार्ग शोधतील.

आज, ऑनलाइन व्यवसाय पारंपरिक बाजारपेठेसाठी आधीच एक मोठे आव्हान बनला आहे.

जेव्हा बाजारात पोहोचणेच अवघड असेल, तेव्हा ग्राहक बाजारात का येतील?

हे लक्षात ठेवले पाहिजे एकदा वाहतूक कोंडी फक्त रस्ता अडवते, पण सततची वाहतूक कोंडी बाजारपेठेचा गळा घोटते.

आज व्यापारी अत्यंत नाजूक परिस्थितीत काम करतो. स्पर्धा शिगेला पोहोचली आहे, ऑनलाइन बाजारपेठ उदयास येत आहे, खर्च वाढत आहे आणि ग्राहकांचे वर्तन झपाट्याने बदलत आहे. अशा वेळी, जर व्यवस्थाच व्यापाऱ्याच्या विरोधात गेली, तर शहरातील व्यवसाय कसा टिकेल?

सरकार म्हणते पेट्रोल वाचवा... पण व्यवस्था पेट्रोल जाळत आहे!

एकीकडे, सरकार नागरिकांना इंधन वाचवण्याचे आणि पर्यावरणाचे रक्षण करण्याचे आवाहन करत आहे.

दुसरीकडे, हजारो वाहने तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून पडतात.

इंजिन चालूच राहतात...!!!

इंधन जळतच राहते....!!!

प्रदूषण वाढतच राहते....!!!

लोकांचा वेळ वाया जातच राहतो....!!!

आणि ही व्यवस्था???

ती हे सर्व शांतपणे पाहत असते...!!!

हा विरोधाभास केवळ हास्यास्पदच नाही, तर चिंताजनकही आहे.

प्रशासनाने ठरवले पाहिजे.जनता अधिक महत्त्वाची की परवानगी?

पोलीस प्रशासनाला हे विचारणे महत्त्वाचे आहे.

कोणत्याही कार्यक्रमाला परवानगी देण्यापूर्वी, सार्वजनिक हित आणि सार्वजनिक सुरक्षेवर होणाऱ्या परिणामांचे वास्तववादी मूल्यांकन केले जाते का?

जर असे असेल, तर शहरातील सर्वात वर्दळीचे चौकच वारंवार का निवडले जातात?आणि जर नसेल, तर यामुळे प्रशासकीय गांभीर्यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होते.प्रशासनाचे काम केवळ परवानगी देणे नाही. सार्वजनिक सुरक्षा सुनिश्चित करणे, वाहतूक सुरळीत ठेवणे आणि शहरात सुव्यवस्था राखणे ही त्याची खरी जबाबदारी आहे.कोणत्याही राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक कार्यक्रमापेक्षा सामान्य नागरिकाचा निर्विघ्न संचार करण्याचा हक्क मोठा आहे.

आता 'माझ्या सोयी'चा नव्हे, तर 'जनतेच्या सोयी'चा विचार करण्याची वेळ आली आहे! माझा एक प्रश्न आहे, विनंती नाही, तर सर्व सत्ताधारी आणि विरोधी राजकीय पक्षांना आणि लोकप्रतिनिधींना सार्वजनिक हितासाठी एक विनंती आहे.

...आपल्या राजकीय कार्यक्रमांसाठी जनतेला त्रास देण्याचा अधिकार आपण स्वतःला देऊ शकतो का?

केवळ राजकमल चौकच नव्हे, तर शहरातील सर्व प्रमुख रस्ते आंदोलने, शक्तीप्रदर्शने किंवा इतर कार्यक्रमांसाठी वारंवार अडवण्याची प्रथा आता गांभीर्याने थांबवली पाहिजे.

राजकारण हे जनतेसाठी आहे.जनता राजकारणासाठी नाही...!!! आणि प्रशासनानेही हा स्पष्ट संदेश दिला पाहिजे की ते कोणत्याही राजकीय कार्यात सहभागी नाही.ते दबाव, प्रभाव किंवा सोयीसाठी नव्हे, तर कायदा आणि सार्वजनिक हितासाठी जबाबदार आहे.

व्यवसाय टिकला, तर शहर टिकेल...

प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी हे मूलभूत तत्त्व समजून घेतले पाहिजे:शहराचा व्यवसाय हा केवळ व्यावसायिकांपुरता मर्यादित नाही.

व्यवसाय भरभराटीला आला, तर रोजगार वाढतो.रोजगार वाढला, तर कुटुंबे समृद्ध होतात.बाजारपेठ भरभराटीला आली, तर अर्थव्यवस्था भरभराटीला येते.अर्थव्यवस्था भरभराटीला आली, तर शहराचा विकास होतो. म्हणून, शहराच्या व्यवसायात व्यत्यय आणणे म्हणजे केवळ व्यावसायिकांना त्रास देणे नव्हे,तर ते संपूर्ण शहराच्या आर्थिक स्पंदनाला कमकुवत करण्यासारखे आहे.

आता, प्रशासनाने केवळ कागदावर नव्हे, तर प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून व्यवस्थेचे वास्तव पाहण्याची गरज आहे.

भटक्या लोकांचा मनमानीपणा असो किंवा राजकीय घटनांमधील गोंधळ असो प्रशासनाने प्रत्येक परिस्थितीत आपली जबाबदारी पार पाडलीच पाहिजे.जनतेने प्रशासनाला व्यवस्थेचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार दिला आहे, स्वतःच्या समस्या वाढवण्याचा नाही.अजूनही वेळ आहे.

विचार करा... समजून घ्या...

आत्मपरीक्षण करा...

आणि इच्छाशक्ती जागृत करा.

संकल्प करा की आपल्या शहरातील लोकांचे यापुढे कोणत्याही स्तरावर शोषण होणार नाही.राजकमल चौक कोणत्याही पक्षासाठी राजकीय प्रयोगशाळा नाही.ती सर्वसामान्य माणसाची जीवनरेखा आहे.तो अडवणे म्हणजे केवळ वाहतूक थांबवणे नव्हे,तर ती शहराची प्रगती थांबवणे आहे.आणि कोणतीही नगरी आपली प्रगती थांबवून पुढे जाऊ शकत नाही.माझे शहर... माझी जबाबदारी! जनतेच्या समस्यांवर व्यवस्थेचे मौन यापुढे सहन केले जाणार नाही...!!!

विनोद कलंत्री
अध्यक्ष, अमरावती चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री
अध्यक्ष, कॅट विदर्भ प्रांत

पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात ऑफलाइन आऊटरीच कार्यक्रम

GATE-२०२७ बद्दल तज्ञांकडून मार्गदर्शन

अमरावती/का.प्र. देशातील प्रतिष्ठित अभियांत्रिकी परीक्षा असलेल्या GATE-२०२७ बाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याबरोबरच उच्च शिक्षण व राष्ट्रीय स्तरावरील करिअरच्या संधींची माहिती देण्यासाठी पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती येथे GATE-२०२७ Offline Outreach Program चे आयोजन करण्यात आले. IIT Bombay यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. IIT Bombayचे गौरव घोष व प्रणव भगत यांनी विद्यार्थ्यांना GATE परीक्षेच्या तयारीसंदर्भात मार्गदर्शन केले.

यावेळी GATE परीक्षेचे स्वरूप, अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिकेची रचना, तयारीचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, प्रभावी अभ्यासपद्धती तसेच परीक्षेतील महत्त्वाच्या बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर IITs, IISc व अन्य उच्च शिक्षण संस्थांमधील पदव्युत्तर शिक्षण, संशोधनाच्या संधी आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधील (PSUs) करिअरच्या संधींबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.GATE ही केवळ प्रवेश परीक्षा नसून विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षण, संशोधन आणि उत्कृष्ट करिअरच्या वाटचालीला दिशा देणारी महत्त्वपूर्ण संधी असल्याचे मार्गदर्शकांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत GAT च्या तयारीबाबत विविध प्रश्न विचारले. मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक परीक्षांसाठी प्रोत्साहन देणे आणि त्यांना योग्य दिशा देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक व समन्वयकांनी सहकार्य केले.

निधन

नामदेवराव सुने

कुऱ्हा- येथील वार्ड नं.१ मधील जेष्ठ वयोवृद्ध नागरिक नामदेवराव बालाजी सुने यांचे वयाच्या ९४ व्या वर्षी रविवार ६ सप्टेंबरला सायंकाळी ७ वा. वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, स्नुषा, नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे. कुऱ्हा व परिसरालील आजारी वसंतराव सुने यांचे वडील होय.यांच्या अत्यविधी करिता सर्वच स्तरावरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते. यावेळी सामूहीक श्रध्दांजली देण्यात आली.

संजय श्रीखंडे

तळेगाव ठाकूर- येथील ज्येष्ठ नागरिक, प्रगतशील शेतकरी व कष्टकरी व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित असलेले संजय नारायण श्रीखंडे (वय ६२ वर्षे) यांचे मंगळवार ८ सप्टेंबर रोजी दुपारी १२.०० वाजता दीर्घ आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात मुले, विवाहित मुली, सुना, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.यांच्या पार्थिवावर हिंदू स्मशानभूमी तळेगाव ठाकूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

टाकरखेडा पूर्णा येथे शिक्षक दिन व दहीहंडी सोहळा

आसेगाव पूर्णा- टाकरखेडा पूर्णा येथील नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिन व दहीहंडी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. शिक्षक दिनानिमित्त विद्यालयात स्वयंशासित शाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका पार पाडत विद्यार्थ्यांना अध्यापन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य शरद नवले होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संजय देशमुख उपस्थित होते. यावेळी उपस्थित शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन तसेच माता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. विद्यालयातील आर. आर. देशमुख, के. ए. वाटाणे, जी. बी. सांगोले, पी. डी. पवार, स्वाती शिरभाते, श्रद्धा ठाकरे, आचल प्रजापती, आचल गावंडे व कल्पना कैथवास यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य शरद नवले यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दरम्यान, जन्माष्टमी व दहीहंडीचा कार्यक्रमही उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता आठवीतील विद्यार्थी कृष्णा प्रजापती याने श्रीकृष्णाची, तर इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी स्नेहल भोनखडे हिने राधेची वेशभूषा साकारली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत दहीहंडी फोडून कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील कर्मचारी सुशील वानखडे, जी. बी. वानखडे, संदीप देवळे, सरिता लव्हाळे व वनिता आमझरे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन इयत्ता दहावीची विद्यार्थिनी मयुरी चव्हाण हिने केले, तर आभार इयत्ता सातवीची विद्यार्थिनी हुमेरा फातिमा हिने मानले.

काटपूर येथील गाव तलाव पाण्याअभावी कोरडा

खानमोडीच्या दिवशी ग्रामस्थांसमोर प्रश्न

काटपूर/वार्ताहर मोर्शी तालुक्यातील ग्राम काटपूर-ममदापूर येथील गावांमध्ये असलेला गाव तलाव यावर्षी पावसाअभावी पूर्णतः कोरडा झालेला आहे. या परिसरात अत्यल्प पाऊस झाल्यामुळे व येणारा प्रत्येक दिवस पावसाअभावी कोरडा गेल्याने परिसरातील गाव तलाव,शेत तलाव व नदी नाले कोरडे झाले आहे.पोळ्याच्या आधी शेतकरी बैलांना गाव तलावावर किंवा नदीवर नेऊन मुक्त संचारपणे आंघोळ घालतात,मात्र यावर्षी गावातील तलाव व नदी नाल्यांचे पात्र कोरडे आहे. त्यामुळे आपल्या बैलांना आंघोळ कुठे घालावी हा प्रश्न गाव परिसरातील शेतकऱ्यांना पडला आहे.

यावर्षी पावसाअभावी दुष्काळाचे चिन्ह गडद होताना दिसत आहे. दुपारच्या सत्रात शेतामध्ये फेरफटका मारला असता सोयाबीन व इतर पिके सुकून माना खाली टाकताना दिसत आहे. सोयाबीन पीक सध्या स्थितीत शेंगा भरणीच्या अवस्थेत असून त्यावर मुबलक पाणी आल्यास शेंगा भरणे व्यवस्थित होऊ शकते. अन्यथा असेच चित्र समोर राहिल्यास यावर्षी सोयाबीन चे पीक पूर्णतः हातचे जाण्याची स्थिती निर्मानाधीन आहे. तसेच विहिरीच्या पाण्याने सुद्धा तळ गाठला असून दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे.पोळ्याच्या सणाच्या निमित्ताने ऋषभ राजाला मुक्त संचार पणे आंघोळ घालण्यासाठी वरून राजाने कृपादृष्टी करून कोरडे झालेले तलाव व नदी नाले पाण्याने भरून काढावे ही आर्तहाक मोर्शी तालुक्यासह काटपूर - ममदापूर येथील शेतकरी करीत आहे.

अमर कॉलनी परिसरात अतिक्रमण

अमरावती- महानगरपालिका पूर्व झोन क्र. ३ अंतर्गत कॅम्प कॉर्नर ते यशोदा नगर रोडमार्गे अमर कॉलनी परिसरात सोमवारी अतिक्रमण विभाग व फ्रेजरपुरा पोलीस विभागाने धडक कारवाई केली. या कारवाईदरम्यान रस्त्यालगत अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या पानटपऱ्या, हातगाड्या, दुचाकी वाहने तसेच मोठे लोखंडी काउंटर हटविण्यात आले.महानगरपालिका अतिक्रमण विभागाने केलेल्या या कारवाईत मोठ्या प्रमाणात साहित्य जप्त करण्यात आले असून, जप्त केलेला माल दोन ट्रक भरून नेण्यात आला. रस्ते व सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणामुळे नागरिकांना होणारा त्रास तसेच वाहतुकीला निर्माण होणारा अडथळा लक्षात घेऊन ही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले.या कारवाईदरम्यान महानगरपालिका अतिक्रमण विभाग आणि फ्रेझरपुरा पोलीस विभागाने संयुक्तपणे मोहीम राबविली. कारवाईमुळे सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणाविरोधात महानगरपालिका प्रशासनाकडून पुढील काळातही कारवाई सुरू राहणार आहे असे यावेळी सांगण्यात आले.

भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात गृहअर्थशास्त्र विभागात अभ्यास मंडळाचे उद्घाटन व विविध उपक्रमांचे आयोजन

परतवाडा- भारतीय विद्यामंदिर अमरावतीद्वारा संचालित भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा येथील गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक सत्र २०२६-२०२७ निमित्त विविध शैक्षणिक व कौशल्याधारित उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये अभ्यास मंडळाचे उद्घाटन, विशेष व्याख्यानाचे आयोजन तसेच डिश डेकोरेशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल एस.खांडेकर उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून पूजा गोतमारे उपस्थित होत्या तसेच गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ दयाश्री वि. कोकाटे ह्या उपस्थित होत्या. प्रथम अभ्यास मंडळाचे उद्घाटन अध्यक्ष व प्रमुख अतिथीच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनामुळे विद्यार्थीनींना वर्षभरातील शैक्षणिक उपक्रमांचे नियोजन, विषयाशी संबंधित विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, व्याख्याने आणि कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध होतील. तसेच पूजा गोतमारे यांनी विद्यार्थिनींना गृहअर्थशास्त्र विषयातील अद्ययावत व उपयुक्त अशी माहिती दिली.याचबरोबर डिश डेकोरेशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून त्यात संपूर्ण उपवासाचे पदार्थ ठेवण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांनी देखील विद्यार्थिनींना आहाराविषयी मार्गदर्शन करून उपवास व उपवासाचे पदार्थ या विषयीही माहिती दिली.

या संपूर्ण कार्यक्रमांचे संचालन प्रा. प्रिती नवरे यांनी केले तसेच कार्यक्रमांची संपूर्ण रूपरेषा व पाहुण्यांचा परिचय म्हणजेच कार्यक्रमांचे प्रास्ताविक गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दयाश्री वि. कोकाटे यांनी केले तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. प्रिया सगणे यांनी केले. या कार्यक्रमाला डॉ. वंदना किल्लेदार, डॉ. शीतल काळे, डॉ. चित्रा परांते डॉ. अपेक्षा दुबे, डॉ. विशाखा पाटील, प्रा. मनीषा भिंगारे, प्रा. पूनम केदार, प्रा. मयुरी ठाकरे, प्रा. ज्योत्स्ना भोयर, प्रियंका देवतळे तसेच संपूर्ण गृहअर्थशास्त्राच्या विद्यार्थीनी कार्यक्रमाला उपस्थित राहून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.

शनिवारी रंगणार 'दे मनाचा रिता कोपरा'

नितीन भट आणि डॉ. उज्वल बारंगे सादर करतील कवितांसह गजल

अमरावती/का.प्र. मराठी कविता, गज़ल, गाणी आणि सोबतीला बहारदार निवेदन असा आगळावेगळा कार्यक्रम 'दे मनाचा रिता कोपरा'च्या रूपाने येत्या शनिवारी १२ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ७ वाजता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सोमेश्वर पुसतकर सभागृहात रंगणार आहे. प्रख्यात गज़लकार आणि निवेदक नितीन भट तसेच कवी, गज़लकार डॉ. उज्वल बारंगे या कार्यक्रमातून आपल्या कविता आणि गज़लांचे वाचन आणि तरन्नुममध्ये सादरीकरण करणार आहेत. अवतीभवतीच्या कल्लोळाच्या वातावरणात शांततेत रममाण करणाऱ्या काही क्षणांची अनुभूती अमरावती रसिकांना देण्याचा प्रयत्न 'दे मनाचा रिता कोपरा' मधून केला

जाणार आहे. काव्याचा आशय अधिक गडद करत रसिकांना एका वेगळ्या ट्रान्समध्ये घेऊन जाण्याचे काम सिंथसायझरवर रामेश्वर काळे, व्हायोलिनवर हरीश लांडगे आणि बासरीवर चेतन वानखडे करणार आहेत. कार्यक्रमाच्या आयोजनात डॉ. वैभव ढवळे, राजेंद्र जवळकर, ओम जवळकर, राणाभाऊ रणनवरे, डॉ. पवन भांदककर आणि अमोल चवणे यांचा मोलाचा सहयोग लाभला आहे. कार्यक्रमाचा आस्वाद घेण्याचे आवाहन आयोजक डॉ. सचिन बगडे, मनीष नांदूरकर आणि सारंग हरणे यांनी केले आहे.

त्या वाघीणचा कार्डिओ रेस्पिरेटरी फेल्युअरमुळे मृत्यू - अंतिम अहवालाची प्रतीक्षा

अवयवांचे नमुने न्यायवैद्यक प्रयोगशाळे कडे रवाना

अमरावती/प्रतिनिधीः - जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून दहशत निर्माण करणाऱ्या आणि चार नागरिकांचा जीव घेणाऱ्या नरभक्षक वाघिणीला अखेर वन विभागाने जेरबंद केले होते. परंतु, सोमवारी सायंकाळी या वाघिणीचा उपचारा दरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. शवविच्छेदनानंतर 'कार्डिओ रेस्पिरेटरी फेल्युअर' मुळे हृदय व श्वासोच्छवास बंद पडल्याने वाघिणीचा मृत्यू झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले असून मृत्यूचे नेमके व अचूक कारण स्पष्ट होण्यासाठी वाघिणीच्या

अवयवांचे नमुने न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आल्याची माहिती, अमरावती प्रादेशिक विभागाचे उपवनसंरक्षक अर्जुना के.आर. यांनी दिली आहे. या वाघिणीला शिरजगाव कसबा परिसरात जेरबंद करण्यात आले होते. चांदूर बाजार तालुक्यातील सोनोरी आणि शिरजगाव कसबा परिसरात या वाघिणीने २४ तासांत दोन जणांवर प्राणघातक हल्ला करून त्यांना ठार केले होते. या घटनेनंतर परिसरात तीव्र संताप व भीतीचे वातावरण होते. वन विभागाच्या विशेष पथकाने सोमवार ७ सप्टेंबर रोजी दुपारच्या सुमारास शिरजगाव कसबा परिसरात राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार गुंगीचे औषध देऊन या वाघिणीला यशस्वीरीत्या जेरबंद केले होते.

परतवाडा येथे झाले शवविच्छेदन- मंगळवारी, ८ सप्टेंबर रोजी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या चमूने 'एनटीसीए'च्या नियमावलीनुसार ☞(पान २ वर)

मोर्शी येथे उपचारादरम्यान मृत्यू

वाघिणीला बेशुद्ध केल्यानंतर तिला नागपूर येथे हलविण्यात येत होते. पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या चमूकडून तिच्यावर तातडीने पुढील औषधोपचार सुरू करण्यात आले होते. मात्र, वाघिणीने या उपचारांना पुरेसा प्रतिसाद दिला नाही. परिणामी, ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी मोर्शी येथे उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

गोपीनाथ रेड्डी कंपनीला मनपाचा स्वच्छता कंत्राट मिळण्याचा मार्ग मोकळा?

कोणार्क कंपनीसोबतचा करार हायकोर्टाने केला रद्द

तीन आठवड्यांत निर्णय घेण्याचे निर्देश

अमरावती/प्रतिनिधीः- महानगर पालिकेच्या शहरातील कचरा संकलन व वाहतूक व्यवस्थेच्या कंत्राटबाबत महत्त्वाचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. न्यायालयाने कोणार्क कंपनी सोबत महानगरपालिकेने केलेला करार रद्द केला असून, पी. गोपीनाथ रेड्डी कंपनीने सादर केलेल्या निविदेवर तीन आठवड्यांच्या आत निर्णय घेण्याचे निर्देश मनपाला दिले आहेत.न्यायमूर्ती अनिल एस. किलोर आणि न्यायमूर्ती रंजीत आर. व्यास यांच्या खंडपीठाने ८ ऑक्टोबर २०२५ रोजी कचरा संकलन आणि परिवहन

निविदा प्रक्रिये संदर्भातील याचिकेवर निकाल दिला.यामुळे आता मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोदावले यावर काय निर्णय घेते याकडे सर्वांच्या नजरा लागलेल्या आहे.रेड्डी कंपनीला स्वच्छतेचा कंत्राट मिळण्याची शक्यता यामुळे निर्माण झाली आहे.या प्रकरणात एड. अश्विन देशपांडे आणि एड. वेदांत पांडे यांनी बाजू मांडली. न्यायालयाचा 'ऑपरेटीव्ह ऑर्डर' समोर आला असून, आदेशाची सविस्तर प्रत मिळण्याची प्रतीक्षा आहे. दरम्यान, रेड्डी कंपनीला कोणत्याही कारणास्तव कंत्राट देता आला नाही, तर मनपाला नव्याने निविदा प्रक्रिया राबवावी लागू शकते. तो पर्यंत शहरातील कचरा संकलन आणि ढुलाईचे काम कोणार्क कंपनी मार्फतच सुरू राहणार आहे.आता रेड्डी कंपनीच्या निविदेवर मनपा प्रशासन काय निर्णय घेते, याकडे शहरवासीयांसह संबंधित कंत्राटदारांचे ☞(पान २ वर)

पिकांचे पंचनामे करा, अन्यथा तीव्र आंदोलन

अमरावती जिल्हा काँग्रेस ग्रामीण व शहर काँग्रेसचे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक आंदोलन

अमरावती/प्रतिनिधीः- जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात बालकांच्या अतिदक्षता विभागातील व्हेंटिलेटर दुर्घटनेचा चौकशी अहवाल तातडीने जाहीर करावा, दोषींवर कठोर कारवाई करावी, पावसाच्या खंडामुळे नुकसान

झालेल्या पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, तसेच वाघिणीच्या हल्ल्यांची स्वतंत्र चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, तसेच कर्जमाफीच्या नावाखाली शेतकऱ्यांना जिल्हा बँकेतून केवळ ५० टक्केच कर्जमाफी दिली जात असल्याचा आरोप करीत काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले. माजी मंत्री यशोमती ठाकूर आणि जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध ऊर्फ बबलू देशमुख यांच्या ☞(पान २ वर)

दोषींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न खपवून घेणार नाही - यशोमती ठाकूर

'जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्घटनेत निष्पाप नवजात बालकांचा जीव गेला. चौकशी अहवाल सात दिवसांत देण्याचे सांगूनही पंधरा दिवस उलटले आहेत. अहवाल जाहीर का केला जात नाही, याचे उत्तर प्रशासनाने द्यावे. दोषींना पाठीशी घालण्याचा कोणताही प्रयत्न काँग्रेस खपवून घेणार नाही.

विभागीय आयुक्तालयावर रविकांत तुपकर यांचे अर्ध नग्न आंदोलन

विदर्भात कोरडा दुष्काळ घोषित करण्यासाठी आक्रोश

अमरावती/प्रतिनिधीः - शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी आज मंगळवार ८ सप्टेंबर रोजी विभागीय आयुक्त कार्यालया समोर कार्यकर्त्यां समवेत अर्धनग्न होत ठिय्या आंदोलन केला. विदर्भात कोरडा दुष्काळ जाहीर करण्याच्या प्रमुख मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले विभागीय आयुक्त यांना सुकलेली सोयाबीनची रोपे भेट देऊन आक्रोश प्रगट करण्यात आले. आंदोलकांनी यावेळी जोरदार घोषणाबाजी केली. आज आम्ही आमच्या अंगावरील कपडे काढून आंदोलन करीत आहोत, उद्या मंत्र्यांच्या अंगावरील कपडे काढू, असा इशारा रविकांत तुपकर यांनी दिला आहे. विभागीय आयुक्त मार्फत ☞(पान २ वर)

७२ किलो गांजा सह तस्कराला रंगेहात पकडले

अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सची यशस्वी कामगिरी

अमरावती/प्रतिनिधीः - शहरात विक्री करिता आणला जात असलेला तब्बल ७२ किलो वजनाचा सुमारे ३६ लाख रुपये किमतीचा गांजा अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स यांच्याकडून जप्त करण्यात आला आहे. आज मंगळवार, ८ सप्टेंबर रोजी दुपारी बडनेरा रेल्वे स्थानका बाहेर ही धडक कारवाई करण्यात आली. माहिती नुसार, मुख्य आरोपी नरेश मोहिते (रा. सेलु, जि. वर्धा) हा नेहमी प्रमाणे ओरिसा येथून गांजाचा मोठा साठा घेऊन मंगळवारी सकाळी बडनेरा रेल्वे ☞(पान २ वर)

विलास नगरमध्ये मध्य प्रदेशातील तरुणाची आत्महत्या

गाडगे नगर पोलीस करत आहे तपास

अमरावती/प्रतिनिधीः- शहरातील गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या विलास नगर गल्ली नंबर ६ मध्ये आज मंगळवार ८ सप्टेंबर च्या सकाळी तेव्हा खळबळ उडाली जेव्हा येथील पंजाबराव लोनारे यांच्या मटण शॉप समोर एक तरुण मृता वस्थेत आढळून आला. माहिती अनुसार मंगळवारी सकाळी दुकान उघडण्याच्या वेळेस ही घटना निदर्शनास आली. घटना समजताच परिसरात नागरिकांची मोठी गर्दी

जमली होती. माहिती मिळताच गाडगे नगर पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून ☞(पान २ वर)

वेतनवाढीच्या मागणीसाठी न्यायिक कर्मचारी आक्रमक

१६ सप्टेंबरला काळी फित लावून काम - बेमुदत संपाचा इशारा

अमरावती/प्रतिनिधीः- महाराष्ट्र न्यायालयीन कर्मचारी मध्यवर्ती संघटनेने पुकारलेल्या राज्यव्यापी आंदोलनाला अमरावती जिल्ह्यातील सर्व न्यायिक कर्मचाऱ्यांनी समर्थन देण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या कर्मचाऱ्यां प्रमाणे समान वेतनमान आणि वेतनवाढ देण्याच्या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. जिल्हा न्यायालयात झालेल्या बैठकीत यावर निर्णय घेण्यात आला. ३१ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्र सरकारला मुंबई उच्च न्यायालयाने पाठवलेल्या ☞(पान २ वर)

दिशा समितीत लोकप्रतिनिधींचा प्रशासनाला दणका!

पीक विम्यापासून महामार्गावरील अपघातांपर्यंत प्रश्नांचा भडिमार

चार तासांच्या बैठकीत अधिकाऱ्यांना कामे तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश

यवतमाळ /प्रतिनिधीः-- केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी झालेल्या दिशा जिल्हा विकास व सनियंत्रण समितीच्या बैठकीत लोकप्रतिनिधींनी प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. शेतकऱ्यांचा पीक विमा, नरेगा, जलजीवन मिशन, वीजपुरवठा, आदिवासी विद्यार्थ्यांचे ऑनलाइन सर्वेक्षण, ग्रामसेवकांचा कथित भ्रष्टाचार आणि राष्ट्रीय महामार्गावरील वाढते अपघात अशा विविध प्रश्नांवर बैठकीत तीव्र चर्चा झाली. खासदार संजय देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषदेच्या स्व. वसंतराव नाईक

सभागृहात तब्बल चार तास बैठक झाली. पीक विम्याच्या प्रश्नावर शेतकऱ्यांनी केवळ ५०० रुपये भरावेत आणि उर्वरित रक्कम शासनामार्फत देण्याच्या भूमिकेवर चर्चा झाली. तसेच पीक नुकसानीची माहिती दिल्यानंतर ७२ तासांत विमा लाभ मिळावा, बंद असलेले किसान कॉल सेंटर सुरू करावे, अशा सूचना देण्यात आल्या. किसान क्रेडिट कार्डचे जिल्ह्यात आतापर्यंत केवळ ५१.६ टक्के वाटप झाल्याचेही बैठकीत समोर आले. आमदार किसन वानखेडे यांनी उमरखेड-महागाव राष्ट्रीय महामार्गावरील रात्रीचा विद्युतपुरवठा बंद असल्याने अपघात वाढत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. दोन दिवसांपूर्वी झालेल्या अपघातात महिलेचा मृत्यू झाल्याचा दाखला देत त्यांनी अधिकाऱ्यांना जबाबदार धरले. चुकीचे दिशादर्शक फलक, रस्त्यावरील अपुऱ्या सूचना आणि कारखान्यांना ☞(पान २ वर)

बडनेरा येथील हरिदास पेठे मध्ये घराला भीषण आग

२.५० लाखांचे नुकसान

अमरावती/प्रतिनिधीः- बडनेरा शहरातील हरिदास पेठ परिसरात सोमवारी, ७ सप्टेंबर रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास शॉर्ट सर्किट मुळे राजू नंदेश्वर यांच्या घराला भीषण आग लागल्याने मोठी खळबळ उडाली. या आगीत घरातील साहित्य जळून अडीच लाखाचे नुकसान झाले आहे. माहिती नुसार, बडनेरा पोलीस स्टेशनच्या मागे असलेल्या हरिदास पेठेत मजुरी करणारे राजू नंदेश्वर यांच्या घराला अचानक आग लागली. आग लागली तेव्हा घरात सर्वत्र धूर पसरला आणि अफरा-तफर माजली.आगीची माहिती मिळताच नंदेश्वर परिवाराने तात्काळ नगरसेवक व बडनेरा झोनचे मिनी महापौर किशोर जाधव यांच्याशी संपर्क साधला.घटनेची माहिती मिळताच नगरसेवक जाधव यांनी एकही क्षण न दवडता अग्निशमन विभाग, ☞(पान २ वर)

हैदरपुरा हत्याकांडातील चार आरोपी ताब्यात

पूर्ववैमनस्यातून तरुणावर चाकू-तलवारीने हल्ला; गुन्हे शाखा युनिट-१ची कौशल्यपूर्ण कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः हैदरपुरा येथील मनपाच्या सरकारी दवाखान्याच्या मैदानात तरुणावर चाकू व तलवारीने प्राणघातक हल्ला करून त्याची हत्या केल्याच्या घटनेनंतर अमरावती शहर गुन्हे शाखेने वेगाने तपासाची चक्रे फिरवत चार आरोपींना अवघ्या काही तासांत ताब्यात घेतले. गुन्हे शाखा युनिट क्रमांक १च्या या कारवाईमुळे हत्याकांडातील आरोपींपर्यंत पोलिसांना तत्काळ पोहोचता आले. सोमवारी, ७ सप्टेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास हैदरपुरा येथील मनपा सरकारी दवाखान्याच्या मैदानात पाच जणांनी शेख राहील उर्फ गणी शेख फारुक (वय २०, रा. कबीर नगर, मुस्तफा नगर) याच्यावर चाकू व तलवारीने हल्ला केला. डोक्यावर, मानेवर आणि छातीवर गंभीर वार झाल्याने राहील याला उपचारासाठी ☞(पान २ वर)

इलेक्ट्रिक वायर चोरी प्रकरणातील सराईत जेरबंद ११ गुन्हे उघड

जाळून काढलेले ६५ हजारांचे तांबे जप्त

राजापेठ पोलिसांची कारवाई;

अमरावती/प्रतिनिधीः- शहरातील सुरू असलेल्या बांधकामांच्या ठिकाणाहून इलेक्ट्रिक वायर चोरी करून त्यातील तांबे काढणाऱ्या सराईत चोराला राजापेठ पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून इलेक्ट्रिक वायर जाळून काढलेले सुमारे ६५ हजार रुपये किमतीचे तांबे जप्त करण्यात आले असून, चौकशीत राजापेठ व गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एकूण ११ वायर चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. अक्षय मनोहर ठाकरे (वय २९, रा. न्यू गणेश कॉलनी) हे दरोगा प्लॉट येथील पल्स मेडिकल कार्डियक सेंटरमध्ये व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. सेंटरचे बांधकाम सुरू असताना ४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते ६ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजेदरम्यान अज्ञात चोरट्याने आर.आर. कंपनीच्या ५१ केबल बंडलची, अंदाजे ७० हजार रुपये ☞(पान २ वर)

अवैध दारू-जुगारावर ग्रामीण पोलिसांची धडक

'ऑपरेशन कवच'अंतर्गत १४ जुगाऱ्यांवर कारवाई; १.२४ लाखांचा मुद्देमाल जप्त

अमरावती/प्रतिनिधीः ग्रामीण पोलिसांनी 'ऑपरेशन कवच'अंतर्गत अवैध दारू आणि जुगाराविरोधात धडक मोहीम राबवून १४ जुगाऱ्यांसह अवैध दारू विक्री करणाऱ्या पाच जणांवर कारवाई केली. या कारवाईत जुगाराच्या साहित्यासह रोख रक्कम असा १ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच विविध कारवाईत देशी दारूचा साठाही जप्त करण्यात आला. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी अमरावती ग्रामीण जिल्ह्यात अवैध दारू व जुगाराच्या धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश सर्व ठाणेदार तसेच स्थानिक गुन्हे शाखेला दिले आहेत. त्यानुसार ७ सप्टेंबर रोजी तळेगाव दशासर, चांदूर रेल्वे, येवदा, मंगरूळ दस्तगीर आणि धारणी पोलिसांनी कारवाई केली. तळेगाव दशासर व ☞(पान २ वर)